# सीलोन

अथवा

# लंकादर्शनम्


लेखक

नारायण गोविंद पिंगळे,

बी. ए.

पंचवटी—नासिक.


किंमत १२ आणे.

ऊ|२८

# सीलोन अथवा लंकादर्शनम्

लेखकः—

नारायण गोविंद पिंगळे, बी. ए.

प्रकाशकः—

देवराम सयाजी वाघ

नासिक.

मुद्रकः—

रामभाऊ गणू देवकर

सुदर्शन इ. प्रिंटिंग अँड लिथो वर्क्स, नासिक.

सन १९३९

# प्रकाशकाची विज्ञप्ति

सीलोनमधून जून १९३३ मध्यें परत आल्यावर सुमारें दोन महिन्याच्या आंतच माझे मित्र श्रीयुत नारायण गोविंद पिंगळे यांनी प्रस्तुत पुस्तक लिहून दिलें. परन्तु अनेक कारणामुळें छपाईचें काम फारच दिरंगाईवर पडलें. पुस्तकाचें छपाईचें काम चाललें असतांना प्रूफें जितकी काळजीनें तपासावयास पाहिजे होती तितकी न तपासली गेल्यामुळें अशुद्धें बरीच राहिलीं आहेत याबद्दल मला अत्यंत वाईट वाटतें. मराठी वाचकवर्ग सूज्ञपणानें मुद्रणदोषाबद्दल क्षमा करील अशी आशा आहे.

सिंहलद्वीपांत प्रेक्षणीय स्थलें पुष्कळच आहेत व त्या सर्वांचें वर्णन दिलें असतें तर पुस्तक फारच मोठें झालें असतें. व्यापारी दृष्टीनें सीलोनचें फारच मोठें महत्व आहे ही गोष्ट विशेषतः लक्षांत यावी याच हेतूनें प्रस्तुत पुस्तक लिहिलें आहे.

कँडी येथील सिंहली राजांचें सिंहासन परत मिळावे म्हणून सिंहली लोकांनीं चळवळ चालविली होती तिला यश येऊन सुमारें दोन महिन्यापूर्वी तें सिंहासन लंडनहून कोलंबो येथें आणून ठेवण्यांत आलें व मुंबई येथील एका विख्यात प्रयोग शाळेंत रासायनिक पध्दतीनें चहा तयार करण्यांत आला अशा दोन महत्वाच्या गोष्टी नुकत्याच घडल्या.

प्रस्तुत पुस्तक वाचकांस पसंत पडल्यास दक्षिण हिंदुस्थान व म्हैसोर येथील सामाजिक, आर्थिक, धार्मिक व शैक्षणिक माहिती देणारीं पुस्तकें प्रसिध्द करण्याचा आमचा विचार आहे.

प्रकाशक

**देवराम सयाजी वाघ**

बिल्डिंग कान्ट्राक्टर, नासिक.

# प्रस्तावना.

डेक्कन कालेजांतील सुप्रसिद्ध संस्कृताध्यापक प्रो. एस्. के. बेलवलकर यांच्या सूचनेवरून मी स. १९११ मध्यें पालीभाषेचा अभ्यास करूं लागलों. पुढें १९१२ सालीं प्रो. धर्मानन्द कोसांबी हे अमेरिकेंतून परत येऊन पुण्यास राहिले. तेव्हां एक दिवस त्यांचेकडे जाऊन त्यांस पाली शिकविण्याबद्दल मी विनंति केली. प्रो. धर्मानंदानीं माझी विनंति अत्यंत आनंदानें मान्य करून शिकविण्यास सुरवात केली. प्रो. धर्मानंद दररोज कांहींतरी उपयुक्त माहिती सांगत व आपण नेपाळ, सीलोन, ब्रह्मदेश इत्यादि ठिकाणीं कसा प्रवास केला याचें अत्यंत रसभरीत वर्णन देत. त्यामुळें आपणही सीलोनला जाऊन ज्ञान संपादन करावें असें माझें मनानें घेतलें; पण त्यावेळीं मी नौकरींत कायमही झालों नव्हतों, त्यामुळें मनांतील विचारांची पूर्तता करणें शक्य नव्हतें. सन १९१४ मध्यें सीलोनमधील जाफना प्रांतांत संस्कृत अध्यापकाची जागा मिळविण्याची खटपट केली पण तींत यश आलें नाहीं.

सन १९१४ मध्यें जागतिक युद्ध सुरूं झाल्यामुळें महर्गता अत्यंत वाढली व त्यामुळें रजा घेऊन जाणें अशक्यच झालें. पुढें अनेक अडचणीमुळें सीलोनला जाण्याचा व अध्ययनाचा विचारच सोडून द्यावा लागला. सन १९३० मध्यें सीलोनच्या सदीप व्याख्यानाकरितां नोटस् ( टिप्पणें ) तयार करण्याचें काम शाळाखात्यानें मजकडे दिलें. हीं टिप्पणें तयार करण्याकरितां जे ग्रंथ मला वाचावे लागले त्यामुळें सीलोनमध्यें जाण्याची पुन्हां तीव्र इच्छा झाली. परन्तु २१ वर्षे प्रत्यक्ष नोकरी (Active Service) झाल्याशिवाय रजा घेऊं नये असें मी ठरविलें होतें. त्यामुळें सन १९३३ पर्यंत मला आपली इच्छा दाबून ठेवावी लागली. सन १९३३ च्या फेब्रुवारींत मी रजेवर गेलों.

नासिक येथील सुप्रसिद्ध कान्ट्रॅक्टर श्रीयुत देवराव सयाजी वाघ. डि. स्कूलबोर्ड मेंबर, यांनीं एकदां सहज विचारलें कीं तुह्मी रजेवर गेल्यावर काय करणार आहांत ? 'मी सीलोनमध्यें जाणार' असें उत्तर देतांच ते ह्मणाले कीं मग मीही तुमचे बरोबर येतो. नासिक डि. स्कूलबोर्ड ॲडमिनिस्ट्रेटिव्ह आफिसरचें मी काम करीत असतांना, श्री. वाघ यांची व माझी बरीच ओळख झालेली होती व एकमेकांना परस्परांच्या स्वभावाची पूर्ण माहिती होती. यामुळें आह्मी बरोबर जाण्याचें ठरविलें. नंतर आम्ही आपली मित्र-मंडळी गोळा केली व दोन मोटारलारी घेऊन निघालो.

मोटारीस मैलीं ४। आणे भाडें देण्याचें आम्ही ठरविलें. भांडीं, दिवे आचारी व औषधें घेऊन ता. ३० मार्च १९३३ रोजीं नासिक सोडून निघालो. आमच्या मंडळींत ब्राह्मण, मराठे, ख्रिस्ति, व मुसलमान अशी सर्व प्रकारची सुमारें ३८ मंडळी होती. दीड दोन वर्षांच्या मुलापासून तो ७५ वर्षांच्या वृद्धापर्यंत लहानथोर अशा ३८ मंडळींचा समूह घेऊन पुणें, पंढरपूर, विजापूर, बेल्लारी, कुंभकोणम्, मद्रास, पांडेचरी, तंजावर, त्रिचनापल्ली व पदुकोटा या मार्गें रामनड येथें गेलों. रामनड येथें मोटारी ठेवून आमच्यापैकीं निमी माणसें रामेश्वरीं जाऊन राहिली व निमी सिलोनमध्यें गेलीं. सीलोनमधून परत आल्यावर सर्वजण रामेश्वरीं एकत्र झालो व तेथून रामनड येथें येऊन पुन्हां आम्ही आपल्या मोटार लारींतून दिंडिगल, कोईमतूर, उटकमंड, ह्मैसोर, बंगलोर, कोलार, भद्रावती वगैरे पाहून हरिहराहून हुबळीस आलो व तेथून बेळगांव, कोल्हापूर, सातारा या मार्गें पुण्याहून नाशिक येथें परत आलो.

आमच्या सर्व प्रवासास माणशीं शंभर रुपये भाडें व भोजन याकरितां खर्च आला. वाटेंत कोणीही आजारी पडले नाहीं. उन्हाळ्याचे दिवस होते तरी उन्हाचा त्रास झाला नाहीं. एकंदर प्रवास अल्प खर्चांत व सुखकर असाच झाला. कोणत्याही गावीं गेल्यावर काय पहावयाचें हें

आमचे ठरलेलें असल्यामुळें निष्कारण वेळ फुकट गेला नाहीं व त्यामुळें थोड्या वेळांत बरींच प्रसिद्ध स्थळें पाहून झालीं.

आह्मी सीलोनमध्यें फारच थोडे दिवस होतो व दहा पंधरा दिवसांच्या कालांत सीलोनची सर्वांगीण माहिती मिळणें अशक्य आहे. तथापि प्रत्यक्ष स्थलदर्शन व ग्रंथावलोकन यांच्या संयोगानें मराठी वाचकांकरितां सीलोनचें वर्णन लिहावेंसें वाटल्यावरून हें लहानसें पुस्तक लिहिलेलें आहे.

आधुनिक लेखकांनीं प्रवास वर्णनांत स्वतःबद्दलची पुष्कळशी माहीती दिलेली असते व ठिकठिकाणीं सृष्टीसौन्दर्याची रम्य वणन दिलेलीं असतात. परन्तु माझा समज असा आहे कीं, लेखकानें आपली बारीकसारीक सुखदुःखें वाचकास सांगून त्याचा वेळ घेऊं नये व सृष्टिसौन्दर्याचा आस्वाद डोळ्यानें घ्यावयाचा असल्यामुळें लेखकानें शब्दसृष्टि उत्पन्न करूं नये. माझी स्वतःची समजूत अशी असल्यामुळें " आमचा सकाळचा चहा कसा झाला होता " " सृष्टिदेवीनें हिरवा शालू परिधान केला आहे असें केव्हां केव्हां वाटलें " हें सांगण्याचें शक्य तितकें टाळलें आहे.

वाचकांना प्रवासांतील अडचणी कळाव्यात; आर्थिक, सामाजिक व धार्मिक स्थितिची कल्पना यावी; प्रमुख अशा दर्शनीय स्थळाबद्दल जरूर ती माहीती मिळावी याच मुख्य हेतूनें प्रस्तुत पुस्तक लिहिलेलें आहे. गेल्या साठ सत्तर वर्षांत पाश्चात्य लोकांनीं चहा, रबर, तेल, कोळसा, कोयनेल, लोखंड वगैरे पदार्थांची निपज वाढविण्याचा दीर्घ प्रयत्न करून विषुवृत्ताजवळील अत्यंत सुपीक असे प्रदेश आपल्या ताब्यांत ठेवलेले आहेत. विषुवृत्त ही पृथ्वीची मेखला असून जावा, सुमात्रा, सीलोन इत्यादि बेटें हीं त्या मेखलेस लटकलेलीं अमूल्य रत्नें आहेत ही कल्पना मनावर ठसावी; चहा, रबर, सिंकोना वगैरे पदार्थांचा व्यापार किती मोठा आहे, तो व्यापार वाढवून आणि आपल्या ताब्यांत ठेवून पाश्चात्य व्यापाऱ्यांनीं कसा अचाट नफा मिळविला याची कल्पना यावी ह्मणून वरील पदार्थाबद्दल वर्णन देतांना ५४ ते ९४ पानांत बराच विस्तार केलेला आहे.

यापुढें हिंदी तरुणांना तीव्रतम असा जीवनकलह करावा लागणार आहे आणि या कलहाकरितां त्यांनीं सुसज्ज असावें म्हणून त्यांना शाळांतून किंवा कॉलेजांतून आज निरनिराळ्या देशांत काय चाललें आहे याचें निदान स्थूलज्ञान मिळालें पाहिजे. पण दुर्दैवानें पुण्यासारख्या ठिकाणीं बऱ्याच हायस्कूलमध्यें " जपानी स्त्री काम करितांना आपले बालक पाठीवर घेते " हें मनावर बिंबविण्याकरितां पाठीवर मूल असलेल्या जपानी स्त्रीचें मोठें चित्र भिंतीवर लावलेलें दिसतें व तसेंच निग्रो लोक झोपडींत राहतात हें शिकविण्याकरितां अगदीं वरच्या वर्गावरील शिक्षक झोपडीचें चित्र फळ्यावर काढण्याचा खटाटोप करितो. खरोखर पाहिलें तर मूल घेऊन काम करावयाचें असेल तर मुलाकरितां मानवी शरीरांत पाठीइतकी सोइस्कर जागाच नाहीं. हिंदुस्थानांतील कामकरी बायाही मुलें पाठीवरच घेतात. तेव्हां अशा प्रकारची चित्रें काढण्यांत आणि पहाण्यांत विद्यार्थ्यांनीं व शिक्षकांनीं आपला वेळ गमावण्याचें कांहीं कारण नाहीं. हिंदी तरुणांचें लक्ष्य यापुढें तरी उद्योग धंद्याची वाढ कशी होत आहे, इतर देशांत निरनिराळ्या मालाची पैदास कशी करीत आहेत याकडे लागलें पाहिजे व त्यानीं आंकडे शास्त्राचा अभ्यास करण्यास शिकलें पाहिजे असें मला वाटतें, व म्हणून चहा, काफी, रबर वगैरेबद्दल माहीती देतांना मी आकड्यांचा जरा जास्त उपयोग केला आहे. प्रस्तुत पुस्तक " हें धड प्रवास वर्णनही नव्हे व धड सीलोनचा भूगोलही नव्हें " असेंहीं कांहीं वाचकांस वाटण्याचा संभव आहे हें मला माहीत आहें, परन्तु केवळ वर्णनात्मक पुस्तक लिहिणें मला पसंत नसल्यामुळें प्रचलित प्रवासवर्णनात्मक पुस्तकांच्या पद्धतीस सोडून हें पुस्तक लिहिलें आहें.

नारायण गोविंद पिंगळे

# अनुक्रमाणिका


| | | |
|---|---|---|
| १ | आमचा सीलोनचा प्रवास | १ |
| २ | सीलोनमध्यें जाण्याचे नियम | २४ |
| ३ | सीलोन | २५ |
| ४ | प्रवासाची साधनें | २९ |
| ५ | रिक्षा व टांगाभाडे | ३१ |
| ६ | सीलोनी नाणें | ३१ |
| ७ | लोक | ३२ |
| ८ | रोडिया | ३४ |
| ९ | सीलोनमधील खेडेगांव | ३४ |
| १० | लोकांचे मुख्य धंदे | ३७ |
| ११ | खनिज संपत्ति | ३८ |
| १२ | राज्य व्यवस्था | ३९ |
| १३ | इतिहास | ४२ |
| १४ | बुद्धधर्म | ४५ |
| १५ | रावणाची राजधानी | ४९ |
| १६ | सीलोनमधील शेतकी | ५३ |
| १७ | नारळ | ५४ |
| १८ | चहा | ५६ |
| १९ | रबर | ६४ |
| २० | सिंकोना | ६८ |
| २१ | कोका | ७३ |
| २२ | सुपारी | ७३ |
| २३ | कॉफी | ७४ |

२४ दालचिनी ... ... ... ... ७५
२५ कोको ... ... ... ... ७६
२६ वेलदोडे ... ... ... ... ७७
२७ पायमारा ताड ... ... ... ... ७८
२८ सिंट्रोनेला ... ... ... ... ७९
२९ शेतकी ... ... ... ... ७९
३० हत्ती ... ... ... ... ८१
३१ मोती ... ... ... ... ८४
३२ रत्नें ... ... ... ... ८८
३३ ग्रॅफाइट किंवा प्लॅंबॅगो ... ... ... ... ९३
३४ शिकार ... ... ... ९४
३५ मजूरांची स्थिति ... ... ... ... ९५
३६ शिक्षण ... ... ... ९८
३७ सिंहलद्वीपांतील प्रसिद्ध शहरें व प्रेक्षणीय स्थळें ... १०२

# आमचा सीलोनचा प्रवास

रामेश्वराचें दर्शनाकरितां हजारो हिंदु दरसाल रामेश्वरास जातात पण तेथून केवळ २२ मैलावर असणाऱ्या या सुंदर बेटांत जाऊन येऊं शकत नाहींत, किंवा जात नाहींत. सीलोन मध्यें हे प्रवासी कां जात नाहींत याचीं कारणेंही निरनिराळी आहेत. कांहींजण केवळ रामेश्वराचें दर्शनास गेलेले असतात ते सीलोनचा विचारही मनांत येऊं देत नाहींत. ज्यांच्या मनांत सीलोनमध्यें जावे असें येते त्यांना विशेष माहीती नसल्यामुळें आपला बेत रहित करावा लागतो.

आह्मी नासिक येथून दक्षिण हिंदुस्थानांत जावयास निघतानांच सीलोनमध्यें जावयाचे ठरविले होते म्हणून तेथें जाण्यास पासपोर्टची जरूरी आहे कीं काय याबद्दलचा तपास कलेक्टरच्या ऑफिसांत जाऊन केला. तेथें पुस्तकें वगैरे चाळून पहातां पासपोर्ट लागत नाहीं असें कळालें म्हणून आम्ही विशेष चिकित्सा न करितां नासिक सोडून निघालो.

पुढें तंजावर येथें गेल्यावर आम्ही सहज एका कुंचे, बुर्णूस वगैरे विकणाराच्या दुकानीं गेलो व मालाचा तपास करूं लागलो. बोलतां बोलतां दुकानदार सीलोनी आहे असें कळालें. त्या दुकानदारानें सीलोनमध्यें जाण्यास परवानगी लागते व ती परवानगी मिळाल्याशिवाय तुम्हांस जातां येणार नाहीं असें सांगितले.

परवानगी मिळविण्याचें दोन मार्ग आहेत. ( १ ) सीलोनमध्यें राहणाऱ्या माणसानें अमुक माणसें माझेकडे येणार आहेत असा अर्ज सीलोन गव्हरमेंटकडे करून पास घेऊन आपणाकडे पाठवावयाचे व ते पास आले ह्मणजे जावयाचे. ( २ ) दुसरा मार्ग असा कीं, माणसी ५० रुपये मंडपम् कँप येथें अनामत ठेवावयाचे व नंतर परवानगी घेऊन जावयाचे.

इतकी माहीती मिळाल्यावर पुढें आम्ही रामनड येथें गेलो.

रामनड येथें आह्मीं सुमारें ७ वाजण्याच्या सुमारास जाऊन पोहोंचलो. रस्ता बराच रेताड होता. रामेश्वर तेथून सुमारें १५ मैलावर होते त्यामुळें मोटारी जातील किंवा नाहीं याची शंका येऊं लागली. गांवाला लागूनच १ फर्लांगावर तळें आहे त्या तळ्याच्या कांठीं बरींच माणसें आह्मास दिसली ह्मणून आह्मी मोटारी थांबवून चौकशी करण्यास सुरवात केली. तेव्हां तेथील एका तरुणानें आह्मांस मोटारी घेऊन जाऊं नका असा सल्ला दिला व आमची उतरण्याची सोय लावून देण्याचें कबूल केलें. सीलोनमध्यें जाण्याचें काय नियम आहेत हें त्यांस नक्की ठाऊक नव्हते ह्मणून गांवांत जाऊन तेथील वकील, डॉक्टर वगैरे मंडळीकडून माहीती मिळवावी ह्मणून आह्मी गांवांत गेलो. आह्मांस भेटलेला तरुण आमच्या बरोबर आला. गांवांत एका प्रसिद्ध वकीलाकडे जाऊन आह्मी माहीती विचारली. वकीलांनीं दर माणसीं ५० रुपये डिपाझिट देऊन सीलोनमध्यें जाण्याची परवानगी मिळवितां येते असें आह्मांस सांगितलें व शेवटीं मंडपम् येथें जाऊन अगोदर पूर्ण माहीती मिळवा असें सुचविलें; तसेंच रामेश्वरचा रस्ता अतिशय रेताड असल्यामुळें मोटारी नेतां येणार नाहींत असेंही सांगितले.

इतकी माहीती मिळाल्यावर आह्मी धर्मशाळेंत जाऊन उतरलो. आह्मांस भेटलेल्या तरुणानें आमची सोय लावून दिली व आह्मी सीलोनहून परत येईपर्यंत आमचे सामान व मोटारी सांभाळण्याचें कबूल केले. रात्रीं फराळ आटोपल्यावर आमचे व्रत सुरू झाले. आह्मी एकंदर जवळ जवळ ४० जण होतो त्यापैकीं सुमारें २० जणांनां सीलोनमध्यें जावयाचे होते. वीस जणाकरितां डिपाझिट कमींत कमी दोन हजार ठेवण्याची पाळी येणार तेव्हां कसें करावें हा प्रश्न उत्पन्न झाला. आह्मांजवळ त्यावेळीं दोन हजार केवळ डिपाझिट ठेवण्याकरितां शिल्लक नव्हती ह्मणून स्त्रियांच्या अंगावर

असलेल्या दागिन्यांची मोजदाद केली व वेळ पडल्यास दागिने मोडून पैसे भरावेत असा निश्चय केला.

दुसरे दिवशीं सकाळीं जेवणें आटोपून आह्मी आपलें सामान व मोटारी आम्हास रामनड येथें भेटलेल्या तरुणाचे स्वाधीन करून सुमारें ११ वाजतां स्टेशनवर गेलो. तेथून सर्व मंडळीस रामेश्वरीं पाठवून मी व श्री. वाघ असे दोघेजण मंडपम् येथें गेलो. तेथें मुख्य ऑफिसरला भेटून आह्मी परवानगीबद्दल व डिपाझिटबद्दल गोष्ट काढली. सुपरिंटेंडेंट फारच सज्जन होते त्यांनीं आमच्याशीं अगदीं मोकळे मनानें बोलून आह्मांस परवानगी देण्याचें कबूल केले व १०० रु. डिपाझिट द्याल कां म्हणून विचारिले. आम्ही शंभरपेक्षां जास्त देऊं शकूं असें म्हणून २५० रु. अनामत ठेवण्याचें कबूल केलें व दुसरें दिवशीं सकाळीं येण्याचें ठरवून परत रामेश्वरीं दुपारीं चार वाजतां जाऊन पोहोंचलो.

मंडपम् येथें सीलोन सरकारचा इमिग्रेशन कँप आहे. तेथें उतरून प्रत्येक उतारूस आपला पास दाखवून प्रकृति चांगली असल्याबद्दलचा डॉक्टरचा पास घ्यावा लागतो. येथें क्वारंटाईन आहे. सीलोनमध्यें जाण्यापूर्वीं येथें १० दिवस क्वारंटाईनमध्ये रहावे लागते. ज्या लोकांच्या जवळ सीलोनमधील रहिवाशांकडून आलेले पास असतील त्यांस क्वारंटाईनमध्यें रहावें लागत नाहीं, पण सीलोनमध्यें गेल्यावर दररोज तेथें मेडिकल ऑफिसर समोर हजर रहावे लागते व आपण निरोगी आहों असें बद्दल दाखला घ्यावा लागतो. ही पद्धति ज्यांना सहज ४।६ दिवस सीलोनमध्यें जावयाचे असेल त्यांना तापदायक अशी आहे. या नियमाचे जर उल्लंघन झालें म्हणजे सीलोनमध्यें गेल्यानंतर डॉक्टर पुढें तपासणीस हजर राहिले नाहीं तर एक हजार रुपये पावेतों दंड होतो.

आम्ही सकाळींच ( म्हणजे रामेश्वराहून पहाटे निघून ) मंडपम येथें गेलो. तेथें गेल्यावर मुखमार्जनादि विधि आटोपलें चहा मिळतो कीं नाहीं

हें आम्ही पाहूं लागलो. इतक्या अवधींत १।२ कारकून मंडळी आली. एका कारकुनानें आमची नांवें, वयें, आम्ही कोणत्या वर्गानें प्रवास करणार इत्यादि माहीती लिहून घेतली. दुसऱ्या कारकुनानें चहा बोलावतो असें सांगून ५ दिडकीस एक कप याप्रमाणें पैसे घेऊन चहा मागविला आम्हांस चहा पाहिजे होता म्हणून किमतीबद्दल आह्मी तक्रार न करितां पैसे दिले.

थोडे वेळानें चहावाला चहा घेऊन आला. त्याचेजवळ चहा देण्याकरितां २।३ च भांडीं होती. चहाकरितां पावडर वाईट वापरलेली, दूध अपुरें, साखर पुरेशी घातलेली नाहीं अशा थाटांत चहा आला. आह्मी २०।२५ कप चहा मागविला होता. तेव्हां वाईट चहा आणल्याबद्दल आणि भांडी पुरेशी नसल्याबद्दल आम्ही रागावलो. 'तुम्ही काय आम्हास कुली समजतां ? आह्मी चहा घेत नाहीं' अशी तक्रार केली. तेव्हां कारकुनाची धांवपळ सुरू झाली तो कंपनीच्या ( चहा व जेवण पुरविणें हें काम स्पेन्सर आणि कंपनी या युरोपियन कंपनीकडे आहे ) युरोपियन मॅनेजरकडे गेला आणि तक्रार उत्पन्न झाल्याचें सांगूं लागला. युरोपियन मॅनेजर आह्मी बसलो होतो तेथें आला मी त्यास चहा अत्यंत वाईट आहे तुम्ही पैसे भरपूर घेतले आहेत तर चांगला चहा देणें तुमचे काम होतें असें म्हणालो पण त्या गृहस्थानें मुकाट्यानें बोलणें ऐकून मात्र घेतले उत्तर कांहींच दिलें नाहीं. दुसरीकडे चहा मिळणें शक्यच नसल्यामुळें तो थंडा व बेचव चहा मंडळीनीं थोडासा घेतला व बाकीचा वाया गेला. आह्मी त्या चहावाल्यास आणि कारकुनास बोलून बोलून रंजीस आणिले.

नंतर कारकुनानें किती लोकांचें जेवण तयार करूं म्हणून विचारलें. आह्मी त्यास सांगितले कीं, तुम्ही अत्यंत वाईट चहा दिलांत तेव्हां आम्ही येथें जेवणार नाहीं. उपाशीच आम्ही प्रवास करूं असें सांगितले. " जेवणाची यवस्था चांगली करूं. पुढें कोठेंही जेवणाची सोय नाहीं. तुमच्या

बरोबरच्या मुलांचे कसें होईल इत्यादि नाना प्रकारच्या गोष्टी बोलून जेवणाची तिकिटें घेण्याबद्दल कारकून आग्रह करूं लागला. आह्मी आपले पहिले बोलणें कायमच ठेविलें. शेवटीं त्यानें दुसऱ्या एका गृहस्थास बोलाविले व आह्मांस जेवणाची तिकिटें घेण्याबद्दल आग्रह पुढें चालूच ठेविला. आह्मी सुमारें २ तासपर्यंत या ह्मणण्याकडे लक्ष्य दिलें नाहीं. कारकून १५।२० मिनिटांनीं पुन्हां येई. भाजी चांगली करितो. तुह्माकरितां कच्चा तांदूळ- आपल्या इकडे जसा गिरणींतून सडून येतो तसा—घेतो असेंही सांगितले. कारकून अनेकवार आल्यावर आम्ही १५ जेवणें तयार करण्यास सांगितले. जेवणाचा दर प्रत्येक वेळेस ५ आणेप्रमाणें होता. लहान मुलांसही येथें ५ आणे आकारण्याची चाल आहे असें दिसतें पण दोन मुलांस ५ आणे आकारण्याचे कबूल केल्यावर मुलांचीही तिकिटेंही आह्मी काढली. कदाचित् मुलांचा ५ आणे आकार घेतला जातो अशी थापही आह्मास दिली असावी.

सुमारें ८–८॥ वाजतां डाक्टर येऊन तपासणीस सुरवात झाली. तपासणींस देवी आल्यांत कीं नाहीं एवढेंच सामान्यतः तपासीत. मी स्वतः डाक्टरचे जवळ बराच वेळ होतो पण कोणी क्षयी आहे कीं काय हें पहाण्याकरितां टीथास्कोपचा त्यानें कधींच उपयोग गेला नाहीं. उपदंशाबद्दलही कांहींच चौकशी होत नाहींसे दिसले. डाक्टरनें चौकशी करून सर्व लोकांस पटांगणांत जाण्यास सांगितले. तेथें सर्व लोकांचें कपडे घेऊन वाफ देण्याकरितां गोळे केले व कपडे निर्जन्तुक होण्याकरितां यंत्रांत जाऊन बसले. मंडपम् कँपमध्यें रोगजंतू फक्त कापसाच्या कपड्यांत राहतात. असें मला आढळून आले. कारण डाक्टर लोकांनीं कापसाचे कपडे तेवढें नेलें. लोकरीचे व रेशमाचे मात्र आमचे जवळून राहूं दिले. माझ्याजवळ लोकरीचा भला दांडगा केसाळ कोट होता. रोज जन्तूंनीं जर त्यांत रहावयाचें मनांत आणिले तर नाना तऱ्हेच्या रोगांचे कोट्यवधि जन्तूना सुखानें राहतां येयेल असा माझा

कोट होता पण त्याचे नशीब दांडगे, मंडपम्च्या शास्त्रीय ज्ञानाची आंच त्याला लागली नाहीं; पण कोठें कोणास भेटावयास जावयाचे झाल्यास स्वच्छ पोशाख असावा या हेतूनें परिटाकडून स्वच्छधुवून आणिलेला पांढरा शुभ्रकोट, शर्ट व डोक्याचा रुमाल यांना शास्त्रीय ज्ञानाची इतकी आंच लागली कीं ते पूर्वीं कधीं धुतले होते की नाहीं याबद्दल माझी मलाच शंका येऊं लागली.

मुलांच्या करितां कांहीं खाण्याचे पदार्थ आम्ही बरोबर घेतले होते ते खाऊन टाका, बरोबर नेऊं नका, त्यानें तुह्मास रोग होईल असें एक-जण सांगूं लागला. मला या ज्ञानाचा रागही आला आणि हसूंही आलें. पहिली गोष्ट अशी कीं नाशिक सोडून आह्मी मुलेबाळे घेऊन निघालो तेव्हां कोणीही वाटेंत आजारी पडूं नये प्रवास निर्विघ्न झाला पाहिजे याची आ-ह्माला काळजी विशेष. मंडपम् कँप वाल्यांना आमच्या आरोग्याबद्दल काय काळजी ? दुसरी गोष्ट अशीं कीं बोटीवर चढल्यानंतर बरोबर घेतलेले पदार्थ खाल्ले तर आह्मी आजारी पडणार पण कँपमध्यें दोन तीन तास अगोदर खाल्ले तर मात्र आजारी पडणार नाहीं ते खाऊन टाका असा आग्रह. तेव्हां हें विलक्षण तर्कशास्त्र किंवा शास्त्रीय ज्ञानाला लागलेली आग पाहून मला गप्प बसवेना. मी उठून मुख्य डाक्टरकडे गेलो व तेथील तर्कशास्त्र असें उलटे कसे याबद्दल विचारणा केली. डाक्टर जरा सूज्ञ दिसला त्याला माझें ह्मणणें पटले व त्यानें ते पदार्थ बरोबर नेण्यास परवानगी दिली.

नंतर आमची शरीरें निर्जन्तुक व्हावीत ह्मणून स्नानगृहांत आम्हांस सोडण्यांत आले. स्नानगृहें प्रशस्त असून डोक्यावर पाण्याचे फवारे येतील अशी रचना आहे. पाणी थंड होते व थोडे खारट होते मला वाटते तें समुद्राचें पाणी असावे. स्त्रियांच्या केसांतून सीलोनमध्यें जन्तु जाऊं नयेत म्हणून त्यांना डोक्यावरून केस धुवून स्नान करण्यास सांगितले.

आम्हांस ही सर्व गम्मत आहे असें वाटत होते व कांहीं झाले तरी

सीलोनमध्यें गेल्याशिवाय परत फिरावयाचें नाहीं असें ठरलेलेंच होते. मोठ्या माणसाबद्दल कांहींच फिकीर नव्हती, फक्त लहानमुलें व स्त्रिया यांना हा कार्यक्रम थोडासा जिकीरीचा होता. स्नानें झाल्यावर सर्व मंडळी पुन्हां एकत्र आली. डाक्टरांनीं सर्वांस उभें राहण्यास सांगितलें. नंतर एकजण प्रत्येकाच्या दंडाला देवीची लस लावून गेला. पुढें डाक्टरानें येऊन कांहींनां दोन कांहींनां तीन देवी टोचिल्या. या वेळींहीं डाक्टर बरोबर रीतीनें म्हणजे पूर्ण शास्त्रोय रीतीनें काम करीत नव्हते.

देवी काढण्याचा विधी या प्रमाणें आटोपला. ज्यांना नैसर्गिक देवी येऊन गेल्या होत्या त्यांनाच मात्र देवी काढल्या नाहींत. स्त्रियांना टोचण्याकरितां स्त्री डाक्टरीण होती. अशा तऱ्हेनें हा विधी आटोपल्यावर आमचे कपडे आम्हांस मिळाले ते सर्व ओले झाले होते. वाळविण्यास पुरेशी सोय नव्हती, खाली समुद्राची बारीक रेती असल्यामुळें कपडा थोडा हातांतून सुटला कीं तो रेतीनें भरे. थोड्याच वेळानें आम्ही आपले सामान सुमान गुंडाळले व मग मी पुन्हां डाक्टरकडे गेलो. डाक्टराला भेटून सांगितलें कीं आम्ही ८-४ दिवसां करितां जाणार प्रत्येक दिवशीं शक्यतर दुसऱ्या गावीं जाणार तेव्हां आम्ही सहज चैनी करितां जाणार असल्यामुळें दररोज डाक्टरकडे जाणें आम्हांस त्रास दायक होईल व आमचा वेळही बराच फुकट जात जाईल. आमच्या या म्हणण्याचा विचार करून डाक्टरनें आमच्या पासपोर्ट वर " परत येताना तालेमनारवर पोर्टसर्जनकडे आपण परत जात आहों असा रिपोर्ट करावा " असें लिहून दिलें. यामुळें आमच्या भागची दररोज डाक्टरकडे जाण्याची दगदग टळाली.

देवी काढण्याबद्दचे इतके कडक नियमकां असें मी विचारलें असतांनां डाक्टर म्हणाले कीं लाहोर येथें देवीनें प्रळय केला, मुंबईतही पुष्कळ लोक मेले गरीब बिचारे सिंहली मरूं नयेत म्हणून हें कडक नियम पाळण्यांत येतात. युरोपियन्स व अँग्लो इंडियन्स ज्यावेळीं सीलोनमध्यें जातात

त्यावेळीं तुम्ही त्यांचें कपडे निर्जन्तुक करितां कां? तसेंच त्यांना देवी काढतां कां असें प्रश्न विचारतांच डाक्टरनें कांहींच उत्तर दिले नाहीं. मीही तो प्रश्न धसास न लावतां परत आलो.

यावेळीं सुमारें १२ वाजले होते. जेवणाचें बोलावणें आले. आमची व्यवस्था ब्राम्हण स्वैंपाक्याकडून केलेली होती. जेवणास केळीची पानें, भात, भाजी, सार, लिंबू, पापड व तूपही बऱ्यापैकीं होतें. हाटेलचे दोन कारकून मुद्दाम तेथें आले. एकजण आमचें सर्व जेवण आटोपे पर्यंत आमच्या व्यवस्थेकरितां उभा होता. युरोपियन सेक्रेटरीही एकदां येऊन गेला. आम्हांस चांगले जेवण मिळावे म्हणून लोकांनीं आपली पराकाष्ठाकेल्याचें दिसले. पण तिकडील तांदुळच बेचव तथापि भूक लागल्यामुळें जेवण बरें झाले.

जेवण झाल्यानंतर तेथें हजर असलेल्या मद्रासी कारकूनास मी म्हणालो "कांहो तुम्ही किती बावळट, या कँपमध्यें तुमच्या मद्रास इलाख्यांतलिच मजूर येतात. त्यांची जेवणाची व चहाची सोय 'स्पेम्सर आणि आणि कंपनी' ही इंग्लिश कंपनी करते. दिडकीचा चहा पाजून सवाआणा चार्ज करिते, तसेंच २-२॥ आणे किमतीचें जेवणाबद्दल ५ आणे घेऊन पैसे मिळविते हे सर्व तुमच्या डोळ्या देखतच नव्हे तर तुमच्या कडून कारकुनी करवून पैसे मिळविते हें कसें काय आहे ? तुम्हां मद्रास्यापैकीं एखाद्यास ही खाणावळसुद्धां चालवितां येऊं नये ? इतकेंसुद्धां तुमच्या लोकांत व्यापारी धाडस नाहीं ? "

तो गृहस्थ हें शब्द ऐकून थोडा स्तंभित झाला व नंतर म्हणाला. आम्ही मद्रासी गरीब आहों. आमच्या लोकांत इतका उरक नाहीं. पूर्वी येथें फारच त्रास असें तुमच्या प्रांतांतील लोक येथें येतात व तक्रारी करतात म्हणून निदान इतपत तरी व्यवस्था होत असते.

नंतर त्या गृहस्थास उगाच दोन चार प्रश्न विचारून आह्मी कँपमध्यें परत आलो. कँपमध्येंच रेल्वेचें तिकिट ऑफिस आहे तेथें तिकिटें काढल्यावर आह्मी सर्वजण स्टेशनवर आलो. सकाळपासून एका तऱ्हेच्या हडेलहप्पीमध्यें वेळ गेला, ऊनही पुष्कळ पडले होते, इकडून तिकडे खेपाही बऱ्याच घालाव्या लागल्या यामुळें बहुतेक मंडळी दमली होती.

कँपपासून स्टेशन १।२ फर्लांग आहे तेथें आह्मी सुमारें ३॥ वाजतां जाऊन पोहोंचलों. लागलींच थोड्या वेळानें गाडी आली. तींत बसून आह्मी धनुष्यकोडीस निघालो. धनुष्यकोडी स्टेशन सुमारें ८ मैल आहे तेथें गेल्यावर गाडी अगदीं धक्यापर्यंत गेली. बोट तयारच होती. तींत जाऊन बसलो. सायंकाळची वेळ होती तरी मनस्वी उकडत होते. बोट चालू होण्यास सुमारें तास दीड तास लागला. नंतर बोट सुटली आणि मग थोडे शांत वारे येऊं लागले. बोट २ तास चालल्यावर तालिमनार बंदरांत आली. धनुष्यकोडी आणि तालिमनार ही दोन्ही बंदरें अगदीं वालुकामय प्रदेशावर आहेत त्यामुळें खाद्यपेय पदार्थ तेथें फारच महाग मिळतात.

तालिमनार येथें पोंहोचल्यावर कस्टम ऑफिसर बोटीवर आले व त्यांच्या तपासणीस सुरवात झाली. गाठोडी, ट्रंका तर बघितल्याच पण जातांना आमच्या बरोबरच्या एका वृद्ध गृहस्थाचे खिसेही तपासले. एका वृद्ध बाईच्या हातांत मनिबॅग होती तिच्या हातास झोंबून काय आहे तें पाहण्याचें धारिष्टही एका बाईनें केले. नंतर बोटीवरील पोलिस अधिकाऱ्यानें आम्हांस युरोपियन सार्जंटकडे नेलें. त्यानें तुम्ही कोठें जाणार, कशाकरितां जाणार, तुमचे कोण लोक सीलोनमध्यें आहेत वगैरे प्रश्न विचारल्यानंतर आम्हास किती पैसे बरोबर आहेत तें दाखवा असें सांगितलें. प्रत्येक माणसाजवळ निदान १०० रु, तरी असावेत असा सामान्यतः नियम आहे. आह्मी आपल्या जवळचे पैसे दाखविले, नियमाप्रमाणें आमच्या

जवळ पैसे नव्हते परन्तु त्याबद्दल सार्जंटानें घिसघिस केली नाहीं.

इतके विधि झाल्यावर आह्मी सीलोनमध्यें फिरण्यास मोकळे झालो. गाडी स्टेशनवर तयार होतीच तींत आह्मी जाऊन बसलो. डबा सर्व मोकळा होता व स्वच्छ होता. एकदां आह्मी आंत जाऊन पथारी टाकून निजल्यावर दुसरें दिवशीं सकाळीं ७॥ वाजतां कोलंबोला जाईपर्यंत आमच्या डब्यांत एकही पॅसेंजर आला नाहीं. गाडी स्टेशनवर थांबली कीं केहेलगेडी ( केळी ); कुरुंबा ( शहाळे ), देवातुरा ( चहाचे पाणी ), बुलत (पानपट्टी) अशा आरोळ्या ऐकूं येत असत.

रात्रभर पाऊस पडत होता. थंडीही वाजत होती. मधून सहज डोकावून पाहिले तर झाडांची गर्दी दिसे. पहाटे ५ वाजतां बहुतेक सर्व-जण खिडकीशीं बसून शोभा पाहूं लागले. जिकडे तिकडे हिरवीगार भाताची शेतें होती. नारळी, पोफळी यांची गर्दी दिसे. पाण्याचे सुंदर प्रवाह जिकडे तिकडे वहात होते. आह्मी सर्वजण रुक्ष प्रदेशांतून तिकडे गेलो होतो एप्रिलमध्यें आमच्याकडे कडक उन्हाळा, जिकडे तिकडे शेतांत काळीभोर जमीन दिसावयाची आणि सीलोनमध्यें पहावे तर श्रावण महिन्या प्रमाणें वनश्री याचे आमच्या बरोबरीच्या शेतकरी बंधूस फारच आश्चर्य वाटले. आह्मी ज्या भागांतून चालला होतो तो भाग समुद्रसपाटीपासून फारच थोडा उंच होता. रेल्वेकडेला कित्येक ठिकाणीं समुद्रसपाटीपासून उंची फक्त १५ फूट आहे असें दाखविणाऱ्या पाट्या होत्या.

सकाळीं ७॥-८ वाजतां कोलंबोच्या स्टेशनवर आह्मी आलों. आमचा नेहमींचा शिरस्ता म्हणजे कोणत्याही गांवीं गेल्यानंतर मुक्कामाची जागा शोधून काढावयाची अगाऊ तयारी करावयाची नाहीं. कोलंबो हें अगदींच निराळें ठिकाण जावें कोठें ही पंचाईत पडली. निरनिराळे हॉटेलवाले आमचेकडे आले पण रोजीं २॥-३ रु. देऊन हॉटेलांत राहण्याची आमची तयारी नव्हती. एक सिंहली माणूस सुमारें २०।२२ वयाचा आमच्याकडे

आला व मी तुमची राहण्याची सोय लावतो असें म्हणूं लागला. तो विश्वासास पात्र असा दिसेना ह्मणून मि. वाघ यांनीं त्यास आम्हाला तुझी गरज नाहीं आह्मी तुझ्याबरोबर येत नाहीं असें निक्षून सांगितलें पण तो जाईना. सारखा आमच्या मागें लागला. शेवटीं त्यास दरडावून हांकून लावावें लागले.

वेलावटि येथें कापडाच्या गिरणींत श्री. माधव गोपाळ कारखाननीस नांवाचें महाराष्ट्रीय गृहस्थ हेडक्लार्क आहेत असें आह्मांस रामेश्वरीं कळाले होते. तेव्हां सर्व मंडळीस स्टेशनवर सोडून मी व मि. वाघ वेलावटीकडे निघालों. वेलावटी कोणीकडे आहे याचा तपास करून मोटारींतून वेलावटीस गेलो. मोटारींतून उतरून गिरणीचा तपास करूं लागलो. ऊन बरेंच होते. रात्रीं प्रवास झालेला, अंगांत जाड कोट यामुळें मला चालवेना. आशाळभूतपणानें चोहोंकडे टांगा पाहूं लागलो पण जेथें टांगा नाहीं तेथें मिळतो कुठला? मि. वाघ जलदीनें चालत मी मागें रेंगाळे असें करितां करितां गिरणी सांपडली पण हेडक्लार्क आजारी असल्यामुळें घरीं होते. पुन्हां त्यांच्या घराचा तपास करीत त्यांचेकडे गेलो. पायाचे तुकडे पडले. श्रीयुत कारखाननीस घरींच होते त्यांनीं चहा व धिरडीं दिली. फराळ झाल्यावर जरा बरें वाटले. नंतर त्यांनीं आम्हांस एक टूरिंग मोटार व एक मनुष्य बरोबर दिला व त्यांस आम्हांला खानावळ व धर्मशाळा दाखविण्यास सांगितले. मोटार घेऊन आह्मी धर्मशाळेकडे गेलो. मी खाणावळवाल्यास जेवण तयार करण्यास सांगितले. श्री. वाघ स्टेशनवर गेले व मंडळी घेऊन आले. यावेळीं १ वाजून गेला होता सर्व मंडळी दमली होती पण लागलीच जेवण मिळाल्यामुळें ठीक झाले. जेवणास प्रत्येकीं ३० सेंट दिले.

दुपारीं विसावा घेऊन ५॥ वाजतां बंदरावर गेलो. वाटेंत जव्हेरीच्या दुकानांत शिरून मी खड्याबद्दल ( सीलोनी रत्नें ) तपास केला व केवळ नाद ह्मणून सुमारें ३० रु. खर्च केले. कोलंबो बंदर अगदीं सुरेख आहे.

युरोपियन तरुण आणि तरुणी यांचा घोळका तेथें आलाच होता. एक युवती दोघां तरुणाबरोबर आली होती ती स्वस्थ उभी न राहतां हळूं हळूं नाचूं लागली. आमच्या बरोबरच्या एक दोन लहान मुलांनीं तिचें अनुकरण करण्यास सुरवात केली. इतक्यांत अतिशय जोराचा पाऊस आला. पाऊस थांबेपर्यंत तेथें उभें राहिल्यावर आह्मी मुक्कामास परत आलो. खाणावळींत जाऊन मंडळी जेऊन आली. मी व मि. वाघ पुन्हां मि. कारखाननीस यांचेकडे गेलो. मि. कारखाननीस हे फारच चांगले गृहस्थ आहेत. हिंदुस्थानांतील कोणीही माणूस त्यांचेकडे गेला तर त्याला ते सर्व तऱ्हेने मदत करितात. त्यांनीं आह्मांस मोटार पाहून दिली व त्यांचें एक स्नेही श्रीयुत जयसिंग यांस आह्मांस कोलंबोमधील प्रसिद्ध ठिकाणें दाखविण्यास सांगितले. रात्रीं ११ वाजतां आह्मी परत आलो.

दुसरें दिवशीं गांवांत सकाळीं इकडे तिकडे फिरल्यावर जेवणें आटोपलीं व तीन वाजेपर्यंत विसावा घेऊन तीन वाजतां मोटारींत बसून बाहेर पडलो. सेक्रेटरियेट बिल्डिंगजवळ श्री. जयसिंग आह्मांस येऊन मिळालें त्यांनां त्या दिवशीं शनिवारची दुपारची सुटी होती.

प्रथमत: आह्मी प्राणिसंग्रहालयांत गेलो. तेथें प्रत्येक माणसीं ४ आणे फी द्यावी लागते. हत्ती, सिंह, माकडें, अस्वली, वाघ वगैरे जनावरें तेथें आहेत. मोठमोठ्या सुसरीही आहेत. काळे वाघही २।३ आहेत. एका पेटाऱ्यांत सीलोनमधील सुमारें ४०।५० नाग एका कपाटांत ठेविलेले आहेत. तसेंच एका कपाटांत १८८ पौंड वजनाचा २७ फूट लांबीचा बोआ नांवाचा सर्प आहे. या ठिकाणीं सीलोनमधील रत्नांचें एक दुकान आहे. तेथून आम्ही म्यूझियममध्यें आलो. म्यूझियममध्यें सीलोनी स्त्रियांचे अलंकार, बुद्धाच्या नाना तऱ्हेच्या मूर्ति, ग्रॅफाइटचे नमुनें, सीलोन मध्यें प्राचीन काळीं ज्या भुतांचे व राक्षसांचे अर्चन करीत त्यांच्या मूर्ति, पूर्वीच्या राजवाड्याचे दरवाजे वगैरे वस्तु प्रेक्षणीय आहेत. एका राक्षसानें

मनुष्य हातांत धरला असून तो खाऊन टाकणार आहे असें दाखविलें आहे. पूर्वीच्या दागिन्यावर रत्नें अनेक आहेत. पूर्वीच्या राजाचें एक चुनाळ आहे त्यावर सर्व बाजूंनीं लहान लहान रत्नें बसविलेली आहेत. अशा प्रकारच्या नानाविध वस्तु येथें आहेत. येथें असलेल्या वस्तूवरून सीलोनची संस्कृति समजण्यास सुलभ जाते.

एके ठिकाणीं सीलोनी पूर्वकालीन तोफ आहे. तिची लांबी सरासरी दोन फूट आहे व परिघ ८।१० इंचाचा आहे. ही तोफ पाहून माझ्या मनाला धक्का बसला व सीलोनला आपली रत्नें व आपली संपत्ति कां रक्षण करितां आली नाहीं याचा विचार पुन्हां एकवार मनांत आला.

ज्याचें शस्त्र त्याचें साम्राज्य हा त्रिकालाबाधित सिद्धांत आहे. राष्ट्राची सुधारणा किंवा विज्ञानशास्त्रांतील प्रगति त्याच्या शस्त्रावरून अनुमित होते. राष्ट्राचें शस्त्र ज्या मानानें सुधारलेले असेल त्या मानानें त्या राष्ट्राची आर्थिक सुधारणा होते हा सिद्धांत आहे आणि ह्मणून या म्यूझियममध्यें असलेल्या लहान तोफा पाहिल्यावर सीलोनमधील सर्व संपत्ति परकीयांच्या हातीं सहजासहजीं कां गेली तें चटकन समजते.

कँडीच्या राजाचें सिंहासन ब्रिटिश म्यूझियममध्यें आहे. तें रत्नजडित सिंहासन पुन्हां कोलंबो येथील म्यूझियममध्यें आणून ठेवावें अशी सीलोनी लोक आपल्या कायदे मंडळातर्फे मागणी करीत आहेत असें आह्मांस तेथील सीलोनी गृहस्थानीं सांगितलें. म्यूझियमची इमारत भव्य असून पुढें मोठें पटांगण आहे. पटांगणांत सुरूंची सुंदर झाडें असून त्यांनां खुर्ची, हंडी, पेला अशा प्रकारचे आकार दिलेले आहेत व त्यामुळें ती फारच सुंदर दिसतात.

म्यूझियम मधून निघून आह्मी बुद्ध मंदिराकडे गेलो. तेथें मोठें आवार असून एका व्यासपीठावर बुध्दभिक्षु बसून कांहीं वचनें म्हणत होता. ही वचनें सिंहली भाषेंत असल्यामुळें तो काय ह्मणत होता तें आम्हांस

कळालें नाहीं. पुष्कळ स्त्री पुरुष हे प्रवचन ऐकत होते. नंतर आम्ही मंदिरांत शिरलो. मंदिरांत भव्य अशी बुध्दमूर्ति होती. नाना प्रकारच्या रंगांनीं ही सुशोभित केली होती. मूर्तिच्या चारी बाजूस मूर्ति व भिंतींवर बुध्दचारितांतील निरनिराळे प्रसंग चित्रित केलेले होते.

बुध्दजन्म, त्याची तपःश्चर्या, गृहत्याग वगैरे जातकांतील कथा, बुध्दाचें स्वर्गारोहण व तेथील देवतांस उपदेश, त्याचे अवतरण व पृथ्वीवरील निरनिराळ्या राजांस उपदेश करणें इत्यादि अनेक प्रसंग त्या ठिकाणीं उत्तम रीतीनें चित्रित केलेलें होतें. आम्हांस असें वाटले कीं आह्मीं रंगभूमीवरच उभे आहोत.

नंतर तेथें बुध्दभिक्षु आहेत कीं नाहींत याचा तपास केला. दोन तीन भिक्षु भेटले पण कोणासही इंग्रजी येत नव्हते. नंतर आम्ही दुसऱ्या देवळाकडे गेलो. हें मंदीरही पहिल्या मंदीराप्रमाणेंच चांगले होते. एक नवीन उंच इमारत बांधण्याचें काम चालू होते. तेथें कोणी भिक्षु आहेत कीं नाहीं हें पहाण्यास मी सुरवात केली. एका इसमानें ७।८ भिक्षु बसले होते तेथें नेलें. एका बुध्द भिक्षूस इंग्रजी येत होते तेव्हां आमची बोलण्यास सुरवात झाली. आम्ही कोण कुठले इत्यादि प्रश्न झाल्यावर भिक्षूनें मला विचारलें तुह्मास तुमचा धर्म कसा वाटतो. "आमच्या धर्माची शिकवण अशी आहे कीं देव एक आहे व त्याच्या आज्ञेनुसार ऐहिक गोष्टींत पूर्ण मन घालून आर्थिक उन्नति करावी. देवानें दिलेलें शरीर नीट वर्धन करून त्यास या सृष्टीचा योग्य उपभोग द्यावा व हें सर्व करीत असतांनां नीतीचें नियम पाळून ईश्वरपद मिळवावें." असें मी उत्तर दिलें.

ही माझी विचारसरणीं भिक्षूच्या लक्षांत आली नाहींसे दिसले. माझ्या बोलण्याचा रोख संन्यासदीक्षा व सर्वसंग त्याग या विरुद्ध होता. पण भिक्षूला 'देव एक आहे' या माझ्या ह्मणण्याचें आश्चर्य वाटलें व तो म्हणाला "देव एकच कसा असेल?" मी आपल्या म्हणण्याचें थोडक्यांत

समर्थन केले. भिक्षूनें तो प्रश्न तेवढ्यावरच सोडला तेंव्हां मी विचारले तुमचें ध्येय काय आहे. तो म्हणाला आम्ही देव होऊं इच्छितो. मी विचारले देव होणार म्हणजे काय होणार. भिक्षूनें उत्तर दिलें देव होणार म्हणजे परलोकीं गेल्यावर एथल्या पेक्षां जास्त सुखें व चांगले पदार्थ यांचा उपभोग घेणार. तुह्मांस देव व्हावे असें वाटत नाहीं काय?

मी ह्मणालो स्वर्गांतिल साखर एथल्या साखरे पेक्षां जास्त गोड असते असें कशावरून? स्वर्गातील साखर एथल्या साखरे पेक्षां जास्त गोड असेल तर ती अत्यंत गोड असल्यामुळें रसनेंद्रियाला सहन होणार नाहीं व असें झालें कीं इंद्रिय आणि विषय यांचा हीन योग होऊन सुख कमी होईल. रसनेंद्रियाची विषयग्रहणकरण्याची तीव्रता किंवा शक्ति कमी करावी लागेल. एवंच तुमच्या स्वर्गांत एथल्या पेक्षां जास्त मधुर रसाचा आस्वाद घ्यावयाचा असल्यास रसघेणारें इंद्रिय जास्त स्थूल असले पाहिजे म्हणजे स्वर्गांत गेल्यावर तुमची इंद्रियें कमी कार्यक्षम होतील. शिवाय तेथें कडू रस नसल्यास साखरेच्या गोडीचीही किंमत राहणार नाहीं. येथें असतांनांच काय भोग घ्यावयाचे असतील ते घ्या.

यावर भिक्षूकडून कांहीं विशेष उत्तर येईना. श्रीयुत वाघ यांच्या मनांत हा शुष्क वाद पुढें चालूं नये असें होते ह्मणून त्यानीं परत जाण्या-बद्दल गर्दी केली. बाहेर इतर मंडळीही परत जाण्यास उत्सुक होऊन गर्दी करूं लागली. म्हणून हा वाद टाकून आह्मी बाहेर पडलो.

तेथून सर्वजण श्री. कारखाननीस यांजकडे गेलो. त्यांनीं सर्व मंडळीस चहा, चिवडा, रव्याच्या वड्या इत्यादिकांचा अल्पोहार दिला. त्यांच्या मुलींनीं पेटीवर तामील व तेलगू पद्यें ह्मणून दाखविली. ८-१० वर्षांचीं मुलें चांगलें इंग्रजी बोलतात हें पाहून सर्व लोकांस आश्चर्य वाटलें. मिसेस कारखाननीस यावेळीं अगदीं आसन्न प्रसूत होत्या. एकंदर सर्व कुटुंब अत्यंत प्रेमळ असें असल्यामुळें आमचा तास दीड तास फारच आनंदांत गेला.

दुसरें दिवशीं कँडी व रत्नपुरम्‌च्या बाजूस जाण्याचें ठरविलें. रोजीं ४० रु. भाड्यानें मोटार ठरविली व नंतर मग आम्ही मुक्कामास परत आलों. आह्मी उतरलो होतों, तेथें शेजारींच नाटकगृह होते. नाटकास गर्दी होती. नाटक कंपनी मदुरेहून आलेली असून नाटक तामील होते. तथापि श्रीयुत वाघ यांच्या मनांत नाटक पहावयाचे आले म्हणून नाटकास गेलो. एक रुपया दराचीं तीन तिकीटें काढून श्रीयुत वाघ, मी व एक शिक्षक असे नाटकास गेलो. नाटकगृह चांगले १००-१२५ फूट लांब होते. नाटकगृहास मजला नव्हताच. फक्त मागील बाजूस चढती बाकांची रांग होती. एकामागे एक अशा खुर्च्यांच्या पुष्कळच रांगा असल्यामुळें मागील बाजूच्या लोकांना जरा अडचणच होती. स्त्रिया अगदीं थोड्या आलेल्या होत्या. नट पद्य ह्मणूं लागल्यावर तबलजी किंवा पेटीवाला सूरधरून पद्य ह्मणूं लागे. नाटक आह्मास कळालें नाहीं तेव्हां शेजारी बसलेल्या एका गृहस्थास मि. वाघ यांनीं या नाटकांत काय आहे असा सवाल इंग्रजींत केला. त्या गृहस्थाला मि. वाघ हे काय म्हणतात तें कळेना. तेव्हां मी मि. वाघ यांनां बटलरी इंग्रजीत प्रश्न विचारण्यास सुचविलें व त्या प्रमाणें मि. वाघ यांनीं प्रश्न विचारतांच त्या गृहस्थानें उत्तर दिलें.

कोलंबो येथें ' रीगल थियेटर ' नांवाचें नाट्य मंदीर फारच सुंदर आहे. असो. थोडावेळ नाटक पाहून आह्मी परत आलो व नंतर झोपी गेलो.

दुसरे दिवशीं सकाळीं आह्मी चहा वगैरे घेऊन तयार झालो तों सुमारें ७ वाजतां मोटार आली तींत बसून आम्ही कँडीस निघालो. रस्ता उत्तम होता, जिकडे तिकडे निसर्गाची शोभा फारच सुंदर दिसत होती. वाटेंत एक चहा व रबर फॅक्टरी लागली. तेथें जाऊन चहा व रबर यांजवर कोणते संस्कार करितात तें पाहिले व पुढें प्रवास चालू केला.

कँडी येथें पोहोंचल्यावर एक शाकाहारी लोकांची खाणावळ गांठली व जेवण केले. जेवणानंतर कँडी पासून सुमारें ३ मैलावर " पेराडेनिया " नांवाची बाग आहे, ती जाऊन पाहिली या बागेबद्दल सीलोनी लोकांना फार अभिमान वाटतो. जावा बेटांत " ब्यूटेन झोर्ग " नांवाची जगांत पहिल्यानंबरची बाग आहे. तज्ञांच्या मतें वनस्पतिशास्त्र दृष्टया ब्यूटेनझोर्गची बाग पहिल्यानंबरची असली तरी पेराडेनिया बाग ही सौन्दर्याच्या दृष्टीनें पहिल्या प्रतीची आहे.

ही बाग पाहिल्यानंतर आह्मी बुद्धाच्या दांताच्या देवळाकडे गेलो. तेथें पुराण चाललेले होते. कांहीं स्त्रियांचें श्रवणाबरोबर हातांनीं कांहीं काम करणें चालूंच होतें. बुद्धाचा दांत असलेली खोली त्यावेळीं लावलेली होती. ती खोली उघडून आम्हांस आंत सोडतात कीं नाहीं हें पहावें म्हणून तेथील भिक्षूंकडे आम्ही गेलो व त्यांस आम्हांस आंत सोडा असें विनविलें पण बुद्धभिक्षूंनीं ती विनंति मान्य केली नाहीं.

कँडीमधील प्रेक्षणीय स्थळें पाहिल्यावर तेंथें रात्रीं रहाण्याचा प्रथमतः विचार ठरलेला होता पण कांहीं लोकांनां परत कोलंबोकडे जावेसें वाटलें त्या वरून आम्हीं अगदीं दिवस मावळण्याच्या सुमारास तेथून परत फिरलो. कोलंबोला येई पर्यंत १०॥ वाजून गेले. कोलंबो येथें एका बुद्ध देवळांत ८४ हजार दिवे लावणार आहेत असें आह्मांस कळाले होते म्हणून आम्ही त्या देवळाचा तपास करूं लागलो. बराच तपास केल्यानंतर देऊळ सांपडले. देवळाजवळ गर्दी बरीच होती. आपल्या इकडील प्रमाणेंच देवळाबाहेर खाद्य पेय पदार्थ बिक्रीस मांडलेले होते. त्या पदार्थांत ऊसही होते. आपला चिवडा मात्र आह्माला सीलोनमध्यें कोणत्याहि दुकानांत विक्री करितां दिसला नाहीं.

देवळाच्या भोवती बांबू ठोकून दिवें मांडण्यास जागा केली होती. उभ्या बांबूला अर्धे फोडलेले बांबू आडवे बसवून त्यावर पंथ्या मांडिल्या

होत्या व खोबऱ्याच्या तेलाचें पंथ्यातून दिवे लाविले होते. दिव्यांची संख्या दाखविणारें कागदी तक्ते जाजोजाग लाविले होते. १००—२०० दिव्यावर देखरेख ठेवणारी माणसें आपापली कामें करीत व वाऱ्यानें दिवा विझाल्यास तो पुन्हां लावीत. अशी या दिव्यांची एकच गर्दी होती. हे दिवे पहाण्यास नानाप्रकारचे लोक आले होते. पुष्कळशा बुद्ध-धर्मीय पुरुषांचा व स्त्रियांचा पोशाख ख्रिस्ति लोकांप्रमाणेंच असल्यामुळें ख्रिस्तिलोक व बुद्धलोक ओळखतां येणें पडत असे. टवाळ लोक सर्वत्र असावयाचेंच या नियमानुसार त्या दिव्यांच्या रांगांतून कांहीं मुले व कांहीं मोठे लोकही दिव्यावर देखरेख करणाराची नजर चुकवून दिवे मालवीत व त्या देखरेख करणारांनां पुन्हां दिवे लावावे लागत.

हे दिवे पहाणें झाल्यावर सुमारें रात्रीं १२ वाजतां आह्मी परत मुक्कामाला गेलो व झोंप काढली. दुसरे दिवशीं अनुराधपुरम् येथें जाण्याचे ठरले. सकाळीं उठून आह्मी पुन्हां श्री. कारखाननीस यांचेकडे गेलो. मिसेस कारखाननीस प्रसूत झाल्यामुळें श्री. कारखाननीस त्यांजकडे हॉस्पिटल मध्यें गेले होते. घरीं लहान लहान मुलेंच होती.

आह्मी तेथें स्नानें केली. मुलांनीं चहा केला, आम्हांस सुपारी, पान वगैरे घेण्याबद्दल पुष्कळ आग्रह केला. मुलांची वयें १० वर्षांपेक्षां जास्त नव्हती पण कोणत्याहि तऱ्हेनें न लाजतां अगदीं मोठ्या माणसाप्रमाणें ती आदरातिथ्य करीत.

आम्ही १२—१२॥ वाजे पर्यंत वाट पाहिली पण श्री कारखाननीस यांची भेट झाली नाहीं. तेव्हां मोटार ठरवून आम्ही परत आलो व खाणावळींत जेऊन मुक्कामास परत गेलो.

दुपारीं ४ चे सुमारास मोटार आली व सामान घेऊन आह्मी निघालो. मोटार आस्ट्रेलियन गृहस्थाची होती. रस्ता अडचणीचा ह्मणजे अरण्यांतून जाणारा असल्यामुळें रस्त्यांत रानटी टोणग्यांची व हत्तींची भीति

असते. तेव्हां मालकानें आपला एक नातेवाईक १८—२० वर्षांचा आमचे बरोबर दिला. त्याचे जवळ बंदूक होती. थोड्याच वेळानें अंधार पडला, आकाश भरून आलें, पाऊस येऊं लागला व भयंकर गर्जना होऊं लागली. वीज चमकली म्हणजे जिकडे तिकडे भयानक अरण्य दिसे.

पाऊस जोरानें आला तर ओढ्यांना पाणी येऊन मोटार कोठे तरी अडकून पडेल अशी मनांतले मनांत आम्हांस भीति वाटे. एक दोन माणसें तर इतकी गांगरून गेली कीं ती गप्प बसली. विचारलेल्या प्रश्नाचेंही उत्तर देईनात. बरोबरचा आस्ट्रेलियन तरुण आपली बंदूक घेऊन मडगार्डवर जाऊन बसला. पाऊस फारसा आलाच नाहीं. एखादें जनावर दिसलें कीं आलि शिकार अशी एकच गर्दी लोक करीत. कित्येकदां आम्ही एखादा खेड्या जवळून जातांनां जनावर असल्याची चाहूल लागे. रानटी जनावर खरोखरी भेटलेंच नाहीं. आमच्या बरोबरचा तरुणमात्र गोळी झाडण्याकरितां उत्सुक झालेला होता. परन्तु दरखेपेस आम्ही त्यास परावृत करीत होतो. वाटेंत एक मोठें खेडेगांव लागलें. तेथें चहा, बिस्किट, नारळ व केळी घेतली व शेवटीं रात्रीं १० वाजतां अनुराधपुरास जाऊन पोहोंचलो. तेथेही कांहीं लोकांनीं हाटेलांत चहा वगैरे घेतला.

ती रात्र आम्ही बुद्धमंदिरांत काढली. अनुराधपुरम् येथें शाकाहारी लोकांचें हॉटेल नाहीं हें मला माहित होतें. म्हणून थोडा खजूर व इतर थोडें फराळाचें सामान बरोबर आणिलें होतें. रात्रीं व सकाळी तेथें थोडें दूध मिळालें. सकाळी उठल्यावर स्वयंपाकाकरितां भांडी पहावीत ह्मणून देवळांतील भिक्षूकडे जाऊन भांडी मागितली. त्यानें भांडी देण्याचें कबूल करून एका माणसास मज बरोबर दिलें. त्यानें भांडी दाखविली पण ती सगळी खापराची त्यांत मांसादि नानापदार्थ शिजविल्यामुळें त्यांस दुर्गंधि येत होती. त्यामुळें भांड्याची पंचाईत पडली, व भांडी मिळण्याचें काम चालूंच ठेवलें.

आमचें सामान सुमान व्यवस्थितपणें ठऊन बाहेर जातां यावे ह्मणून मी एक खोली देण्याबद्दल भिक्षूस विनविलें. त्यानें खोली व कुलूप दिलें.

खोली देवळाच्या मागील बाजूस होती. स्वयंपाकास मोकळी जागा, पुढें पटांगण व गोड्यापाण्याची विहीर अशी सर्व सोय होती. आमच्या खोलीच्या शेजारींच एक पंजाबी व्यापारी होता त्याचे जवळ भांडी असून तो स्वयंपाक करीत होता. त्यास स्वयंपाक झाल्यावर ती भांडी आह्मांस देण्याबद्दल मी विनंती केली व ती त्यानें मान्य केली. सदरहू व्यापारी कांहीं तेलें व औषधें विकीत सीलोन मध्यें फिरत होता. भांड्याची सोय लागल्यावर मी पुन्हां भिक्षूकडे गेलो व त्यास बोलतां बोलतां विचारलें कीं भगवान् बुद्धानें '-पाणाति पाता वे-रमाणि ' ( प्राण्यांचा वध करूं नका ) अशी शिक्षा सांगितली असतां तुह्मी भिक्षूलोक सुद्धां मांसासन कसें करितां ? हें कृत्य धर्म विरुद्ध होत नाहीं काय ?

भिक्षूनें गंभीरपणानें उत्तर दिलें. "आह्मी मांस खातो हें खरें आहे पण तें खाण्याला शास्त्राची मनाई नाहीं कारण ' आदिट्ठं, असुतं, अपरिञ्ञातं खादितुमर्हति ' असें शास्त्र वचन आहे. हें ऐकून मला गम्मतच वाटली. आदिट्ठं—जनावर मारतांना आपण पाहिलें नाहीं, असुतं—अमक्या माणसानें अमुक जनावर मारिलें हें ऐकलें नाहीं, अपरिञ्ञातं—जनावर मारलें हें समजलें नाहीं, असें त्रिगुणात्मक रीतीनें जर मांस मिळालें तर खाण्यास हरकत नाहीं असा भिक्षूच्या सांगण्याचा मथितार्थ होता. मांसाशनास मोकळीक मिळविण्या करितां ज्या धर्माचार्यांनीं हें तर्कशास्त्र रचिलें त्याचे कौतुक करीत मी परत फिरलो.

नंतर आह्मी देवळांत फिरून पवित्र पिंपळाचे दर्शन घेतलें. अनेक स्त्रीपुरुष, फळें व फुलें घेऊन देवळांत येत. कांहीं लोक सपत्नीकही येत. त्यांचा पोषाख खिस्ति लोकांसारखा असे. ते हातांतील रुमाल खाली ठेवून त्यावर डोकें व गुडघे टेकून प्रार्थना ह्मणत.

हें देऊळ पाहिल्यावर, ब्रेझन पॅलेस, रेनुवेल्ली पॅगोडा वगैरे पहावयास बाहेर गेलो. बारा वाजेपर्यंत सर्व मुख्य मुख्य स्थानें पाहून परत आलो. रस्त्यानें ठिकठिकाणीं केळी मिळत. चांगली केळीं २ दिडकी डझन मिळत. रस्त्यानें बागाही पुष्कळ होत्या. वाटेंत आह्मीं जेवणाकरितां केळीची पानेही आणिली.

स्नानादि विधि आटोपल्यावर आह्मी स्वयंपाक केला व शाकाहारी लोक एकत्र जेवलो. बाकीचे लोक खाणावळींत जेऊन आले.

जेवणानंतर मी पुन्हां बाहेर पडलो व तेथील ओरिएंटल लायब्ररींतली पुस्तकें पाहिली. पुस्तकांनीं भरलेली फक्त दोनच कपाटें होती व त्यांत तिपिटकें, व त्यावरील टीका हेच मुख्य ग्रंथ होते. तेथें दोन भिक्षु होते त्यांस मी विचारले कीं, तुमचा 'धम्मपदासारखा धार्मिक ग्रंथ जर आह्मी देवनागरी लिपींत लिहून प्रसिध्द करण्याचें मनांत आणिलें तर तुमच्या सीलोनमधलि एखादा गृहस्थ ती प्रत वाचून शुध्द आहे कीं नाहीं हें ठरविण्यास मदत करूं शकेल काय ? भिक्षूंनीं उत्तर दिले कीं, येथीलभिक्षूंपैकीं कोणी हें काम करूं शकणार नाहीं तुह्माला कलकत्याच्या लोकांची मदत घ्यावी लागेल. मला वाटतें कीं माझ्या बोलण्याचा आशयच त्यांस समजला नाहीं किंवा समजला असल्यास निष्कारण वचनबध्द होऊन एकादे श्रमाचें काम करण्याचा प्रसंग येऊं नये असा त्यांचा हेतु असावा कारण त्या दोघांपैकीं एकास देवनागरी वाचतां येत होते.

यानंतर त्यांनां इतर कांहीं माहीती विचारल्यानंतर मी परत आलो. आमच्या बरोबरच्या लोकांनां परत जाण्याची विशेष उत्सुकता वाटत होती. श्रीपाद येथें जावयाचे होते परन्तु पावसास सुरवात झाल्यामुळें तेथें जाणें अत्यंत कठीण होईल असें वाटल्यामुळें अनुराधपुरावरूनच परत हिंदुस्थानांत येण्याचें आह्मी ठरविलें. आमची मोटार सकाळींच कोलंबोला परत गेली

---

* बुद्धधर्मीयांची धर्माची प्रमाणभूत पुस्तके

होती. आस्ट्रेलियन युवकाला वाटेंत शिकार न मिळाल्यामुळें बरें वाटलें नाहीं तेव्हां रात्रीं एक मांजर मारून त्याची शेपटी टोपीला अडकवून तीं आम्हास दाखवून तो आनंदानें परत गेला.

अनुराधपुरम् गांवांपासून स्टेशन सुमारें १॥ मैल लांब आहे. स्टेशनवर जाण्यास येथें छकडे किंवा झटके मिळतात. सूर्यास्तानंतर आह्मी स्टेशनवर येऊन पोहोंचलों. बारा वाजतां कोलंबोहून येणाऱ्या गाडींत बसून आह्मी सकाळीं ७ वाजतां तालिमनार येथें येऊन पोहोंचलो. तेथें सकाळीं ७॥ वाजतां बोटींत बसून धनुष्यकोडीला सुमारें ९ वाजतां आलो. प्रथमतः बोटीवर पोर्ट सर्जनला भेटलो व त्यांस पासपोर्ट दाखवून आह्मी परत जाणार आहोंत असें सांगितलें त्यांनीं सर्व मंडळी मोजून पाहिली व आमच्या पासपोर्टवर सही करून तो परत दिला.

नंतर कस्टम हाऊसमधील अधिकारी बोटीवर चढून प्रत्येक इसमाचें सामान पाहूं लागले. प्रथमतः त्यांनीं फर्स्टक्लास व सेकंडक्लास पॅसेंजरचें सामान पाहिलें व नंतर थर्डक्लासच्या उतारूंचें सामान पाहिलें. या सर्व कामाला सुमारें २॥ ते ३ तास लागले.

यावेळीं स्टेशनवर मेल तयार होती. फर्स्ट आणि सेकंडक्लासचें पॅसेंजरला मेलमधून जाण्यास परवानगी मिळते परन्तु थर्डक्लासच्या पॅसेंजरना मेलची तिकिटें देणें किंवा न देणें हें बोटीवरील अधिकाऱ्यांच्या मर्जीवर अवलंबून असते व यामुळें तिसऱ्या वर्गाच्या उतारूंस वशीला लावावा लागतो व वशील्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात. मेल नंतर सुटणारी पॅसेंजर मंडपम्कडे फार उशीरा जाते म्हणून शक्य तोंवर मेलनें जाण्याचा प्रवाशी प्रयत्न करितात.

आह्मी मेलमधून पंबम् स्टेशनपर्यंत आलो तेथून सर्व मंडळी रामेश्वरास गेली. मी तेथून मंडपम् कँपला गेलो. व तेथील सुपरिंटेंडेंटला भेटलो. त्यांनीं मोठ्या आस्थेनें आमची सफर कशी झाली वगैरे विचारपूस केली व

हिंदुस्थानांतील कोणीही गृहस्थ आले तर त्यांस आम्ही आनंदानें मदत करितो असें सांगितलें. मी त्यांचे आभार मानून सलोनमध्यें जाण्याकरितां आम्ही आमचे तरुण लोकांस उत्तेजन देऊं असें म्हणालो.

नंतर मी ऑफिसमध्यें डिपाझिट ( अनामत ) रक्कम घेण्यास गेलो. मी ऑफिसांत गल्याबरोबर कारकुनानें टाइपरायटरवर पावती तयार करून पैसे दिले. कारकुनानें मला इतक्या लवकर मोकळे केले कीं त्याबद्दल आश्चर्य वाटलें. महाराष्ट्रांतील अनेक ऑफिसांतून मला जाण्याचे प्रसंग आले आहेत पण बहुतेक प्रसंगीं आलेल्या माणसाचे काम चटकन् न उरकतां निष्कारण उशीर करण्याकडेच महाराष्ट्रीयांचा कल असतो असें दिसून आलें.

मंडपम् कँपमधील पोलीस, डॉक्टर, सुपरिंटेंडेंट, क्लार्क वगैरे सर्व मंडळी फारच चांगल्यारीतीनें वागतात असें दिसून आलें. आह्माला प्रथमतः वाईट चहा आला हें खरें पण तो चहा कान्ट्रॅक्ट घेतलेल्या कंपनीचा होता हें लक्षांत घेतले पाहिजे.

प्रत्येक ऑफिसरनें किंवा इतर नोकरानें प्रथमतः आपण नागरीक आहो व आपणाला मिळालेला अधिकार इतरांच्या सुखसोयी व हित पाहण्याकरितां मिळालेला आहे व त्याचा उपयोग आत्महिताकरितां करणें गैर आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

आमच्याशीं निरनिराळे ऑफिसर्स तर चांगल्यारीतीनें वागलेच पण साध्या पोलिस शिपायांनीं, टांगे पाहून देणें, वाट दाखविणें, धर्मशाळेंत नेऊन पोंहोचविणें इत्यादि कामें आनंदानें केली. महाराष्ट्र लागतांच ती मनोवृत्ति मावळलेली दिसली.

माझे स्नेही मि. वाघ एकदां असें ह्मणाले कीं, आपण परप्रांतीं गेलों होतो म्हणून आपल्याशीं लोक जास्त चांगल्यारीतीनें वागले असतील व आपणही परप्रांतीय लोकांशीं चांगले वागत असूं पण त्याची जाणीव आप-

गाला होत नसेल. मी या ह्मणण्याची प्रतीति पहाण्याकरितां पुढें जास्त काळजीनें निरीक्षण करूं लागलो.

एके दिवशीं नाशिकच्या मेनरोडवरील पोलिसास एका गुजराथी गृहस्थानें हा रस्ता स्टेशनकडे जातो कां असें विचारलें तेव्हां शिपाईबाबास घुस्सा येऊन ते ह्मणाले "बेवकूब क्या पूछता है. चलो जाव". ही गोष्ट माझ्या डोळ्यादेखत घडली. एकदां माझ्या स्नेह्यानें ७५ रु. याचा चेक दिला तो घेऊन मी नासिकचे ब्यंकेंत गेलो. तेथील कारकुनानें "तुमच्या स्नेह्याची ७५ रु. देण्याइतकी शिल्लक नाहीं" हें सांगण्यास ४५ मिनिटें लावली. असो असे नाना तऱ्हेचे प्रसंग पाहिल्यामुळें व अनुभविल्यामुळें महाराष्ट्रांतील ऑफिसांतून लहानापासून मोठ्या ऑफिसरापर्यंत सामान्यतः स्वभावाचें मार्दव कमी, क्षुद्र कल्पना काढून एखाद्याची अडचण करण्याची प्रवृत्ति फार असें माझें मत झालेले आहे. माझें हें मत चुकीचें आहे व मी स्वाभिमानशून्य आहे असे सर्व लोक ह्मणतील हें मला माहीत आहे पण मी जें वर विधान केलेलें आहे त्याला मजजवळ भरपूर पुरावा आहे.

असो पैसे परत मिळाल्यावर मी पुढील गाडीला रामेश्वरीं प्रयाण केलें. महाराष्ट्रीय लोकांना सीलोनची सर्वांगीण माहीती मिळावी ह्मणून ती क्रमवार पुढें दिलेली आहे.

## सीलोनमध्यें जाण्याबद्दलचे नियम

सीलोनला जाणारे पॅसेंजर जर निरोगी असतील तर त्यांस क्वारंटाइनमध्यें न ठेवतां पुढील अटीवर जाऊं दिले जाते.

( अ ) ( १ ) पॅसेंजर जवळ चेअरमन बोर्ड ऑफ क्वारंटाइन कोलंबो यांचा पास ( परवाना ) असावा.

( २ ) मँडपम् कँप येथील क्वारंटाइन मेडिकल ऑफिसर यांस अशी मोकळीक देतां येते. त्यांनीं परवानगी दिल्यास

तावडतोब जातां येते.

( ३ ) प्रत्येक पॅसेंजरबद्दल ५० रु. मंडपम् कँपमध्यें अनामत ठेऊन जातां येते. ही रक्कम पॅसेंजरला परत येतांनां मिळते.

बाकीच्यांनां मंडपम् येथें ६ दिवस क्वारंटाइनमध्यें रहावें लागते क्वारंटाइनमध्यें न रहातां ज्यांनां सीलोनमध्यें जाऊं दिले जाते त्यांनीं तेथें गेल्यावर १२ दिवसपर्यंत दररोज मेडिकल ऑफिसरकडे हजर रहावे व आपण निरोगी आहो असा दाखला घ्यावा.

( ब ) देवी टोंचून घेतल्याबद्दल अगदीं अलीकडच्या खुणा नसल्यास देवी टोंचून घ्याव्या लागतात.

( क ) प्रवासी कोणत्याही वर्गानें प्रवास करीत असला तरी देवी टोंचण्याकरितां आणि सर्व सामान निर्जंतुक करण्याकरितां त्यास २४ तासपर्यंत मेडिकल ऑफिसरला थांबवून ठेवितां येते.

( ड ) मुंबईहून किंवा मद्रासहून समुद्रमार्गें प्रवास करणारांनीं प्रथमतः पोर्ट सर्जन कोलंबो यांस लिहून माहीती मागवावी ह्मणजे आयते वेळीं त्रास पडणार नाहीं,

सीलोनमध्यें गेल्यावर तेथील मेडिकल ऑफिसर समोर दररोज हजर राहण्याची अट कधींही मोडूं नये. ही अट मोडल्यास एक हजार रुपये पर्यंत दंड होतो.

# सीलोन

हें लहानसें रमणीय बेट हिंदुस्थानच्या अगदीं जवळ आहे. तथापि हिंदुस्थानांतील आणि सीलोनमधील वनस्पति व प्राणी यांत इतकी भिन्नता

आहे कीं त्यावरून हें बेट हिंदुस्थानापासून कोट्यवधि वर्षांपूर्वी अलग झालेले असावें असें कांहीं शास्त्रज्ञांनां वाटते. कांहीं शास्त्रज्ञ असेंही ह्मणतात कीं, अत्यंत प्राचीन काळीं हिंदुस्थान व सीलोन यांजमध्यें समुद्र नव्हता.


हें बेट रत्नें, मोती, हत्ती, मसाला, रबर, चहा, क्विनीन व कोकेन याकरितां फार प्रसिद्ध आहे. बुद्धधर्माचें प्राबल्य सीलोनमध्यें विशेष असल्यामुळें बुद्धधर्माचा ज्यास काळजीपूर्वक अभ्यास करावयाचा असेल त्यास बुद्धधर्मीयांचे ग्रंथ व त्या ग्रंथांचें अध्ययन केलेले भिक्षु येथें आढळतात.

प्रस्तुतकालीं हिंदुस्थान व सीलोन यांजमध्यें एक लहानसा समुद्राचा भाग आल्यामुळें सलोन हिंदुस्थानपासून वेगळे पडलेले आहे. साउथ इं० रेलवेचें शेवटचें स्टेशन धनुष्कोडी व सीलोन यांमध्यें फक्त २२ मैलांचे अन्तर आहे व धनुष्कोडीहून सीलोनला जाणाऱ्या बोटी दररोज सुटतात व दोन तासांत सीलोनला जाऊन पोहोंचतात.

या बेटाची दक्षिणोत्तर लांबी २७० मैल आहे व पूर्वपश्चिम रुंदी १४० मैल आहे. हें बेट ह्मैसोर किंवा आयर्लंडपेक्षां जरा लहान असून त्याचें क्षेत्रफळ २५४८१ चौरस मैल आहे.

बेटाच्या मध्यभागीं पर्वतश्रेणी आहेत व सर्वांत उंच पर्वत "पेड्रोतालगेला" या नांवाचा आहे. त्याचें अत्युच्चशिखर ८२९६ फूट ऊंच आहे. उत्तर भाग सपाट असून तो अनेक वालुकामय द्वीपकल्पांचा बनलेला आहे. पश्चिम आणि पूर्व किनाऱ्या लगतचा अरुंद पट्टा अतीशय सुपीक आहे.

हें बेट विषुववृत्ताजवळील ६ ते १० अंशांच्यामध्यें असल्यामुळें येथील हवा उष्ण आहे. तथापि कराची, उमरावती, व अकोला या ठिकाणापेक्षां उष्णतामान पुष्कळच कमी असते. चोहोंबाजूंनीं समुद्रावरील शीत वारे वाहात आल्यामुळें उष्णतामान कमी राहते. हिवाळ्यांत व उन्हाळ्यांत अत्युच्च उष्णतामान अनुक्रमें ८० व ८५ अंश असते. रोजच्या अत्युच्च व अतिनीच उष्णता मानांत १० अंशापेक्षां बहुधा जास्त फरक पडत नाहीं.




आंकडे पर्जन्यमान दर्शवितात. (पृ. २७)

सीलोनमध्यें South west नैऋत्येकडून North west वायव्येकडून पर्जन्याचे वारे वहात येतात. S. W. नैरेत्येकडून येणारे वारे अत्यंत नियमित वहातात व त्यायोगें १० ते २० मेपर्यंत पाऊस येतो. मेचे सुमारास सुरू होणारें पावसाचे आरंभीं भयंकर मेघ गर्जना व विजांचा कडकडाट होतो व क्षणार्धांत जिकडे तिकडे पाणीच पाणी होऊन एका घटकेपूर्वी कोरड्या ठणठणीत असणाऱ्या नद्या फों फों वाहूं लागतात.

पश्चिम आणि दक्षिण बाजूस पुष्कळ पाऊस पडतो. मध्यभागीं पर्वत असल्यामुळें पर्जन्याचे वारे अडविले जातात व त्यामुळें तेथेंही पुष्कळच पाऊस पडतो. उत्तरेस आणि पूर्वेस मात्र पर्जन्याचें मान कमी असते.

पर्वतापासून किनारा फार जवळ असल्यामुळें एथें नद्या लहान आहेत व जेव्हां पर्जन्य पडतो त्याचवेळीं मात्र नद्यांनां पाणी असते केळनी गंगा व केलुगंगा या नद्यांचाच काय तो जलमार्ग ह्मणून उपयोग होतो व त्यांच्या मुखांतून ४० ते ५० मैल जहाजे जातात.

सीलोनमधील मुख्य शहरांचे उष्णतामान व पर्जन्यमान पुढीलप्रमाणें आहे.—

| | समुद्र सपाटपासून उंची | वार्षिक सरासरी उष्णतामान डिग्री | सरासरी वार्षिक पर्जन्यमान इंच |
|---|---|---|---|
| कोलंबो | समुद्र सपाटीपासून १० ते ५० फूट | ८० | ८७ |
| जॅफना | | ८१ | ४९ |
| गॉले | | ८० | ९२ |
| केलुतारा | | ८० | १०३ |
| रत्नपुरम् | ८४ फू. | ८१ | १५१ |
| कुरुनेगाला | ३८० | ८१ | ८३ |
| कॅंडी | १६५० | ७६ | ८४ |
| बडुला | २२२५ | ७३ | ७३ |
| हॅटन | ४०४१ | ६६ | १४४ |
| नुवाराएलिया | ६२४० | ५९ | ९३ |

या बेटांत पर्जन्यमान सर्वत्र पुरेसे आहे तथापि शेतकऱ्याला केवळ निसर्गाच्या लहरीवर अवलंबून रहावें लागूं नये ह्मणून पूर्वीच्या राजांनीं जागोजाग लहान मोठे तलाव बांधलेले आहेत. केलवेय्या, पदविय्या, मिनरविय्या, व राक्षसी तलाव हे प्रसिद्ध तळाव आहेत. नुवरकेलविय्या भागांत तर प्रत्येक खेड्याला एक एक तलाव आहे. याप्रमाणें पाण्याची सर्वत्र व्यवस्था असल्यामुळें पर्जन्याभावामुळें पिकाची खराबी सहसा होऊं शकत नाहीं. पूर्वीच्या राजांनीं २० मैल परिघाचा व १२ मैल लांबीचा असा एक तलाव बांधला होता परन्तु कालचक्राच्या गतीनें त्याचें पूर्वकालीन वैभव सध्यां नष्ट झालेलें आहे.

यावरून राजे लोक प्रजेच्या पोटापाण्याची सोय किती तत्परतेनें पहात असत याची कल्पना येते महाराष्ट्रासारख्या प्रांताची दुष्काळामुळें जी दुर्दशा कित्येकवेळां उडते तसा प्रसंग सिलोनमध्यें सुदैवानें केव्हांही येत नाहीं.

नकाशा नंबर १ पहा.

सीलोनमध्यें प्रवास करावयास जून, जूलै आणि आगष्ट हे महिने सर्वतोपरीनें चांगले असतात असें इंग्रज प्रवाशांस वाटतें. जानेवारी, फेब्रुवारी व मार्च महिन्यांत येथें पाऊस फार कमी पडतो व हे उन्हाळ्याचें दिवस आहेत असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

सीलोनमधलि शेतीची किंवा इतर उत्पन्नाची माहीती देणाच्या अगोदर हिंदुस्थान सरकारचे एज्युकेशनल कमिशनर मि. एच्. शार्प यांचे या बेटाबद्दलचे उद्गार वाचनीय आहेत ह्मणून ते येथें प्रथमतः दिल्याशिवाय राहवत नाहीं. शार्पसाहेब ह्मणतात:—

"लंकेत सोन्याच्या विटा ही पौराणिक कल्पना खोटी नाहीं. प्राचीन काळीं ही ह्मण त्या देशाला जशी लागूं असे तशी अद्यापही लावण्यास हरकत नाहीं. रत्नें व मोती यांची निपज विचारांत घेतली नाहीं तरी चहा, रबर, प्लंबॅगो, कोका, सुपारी, नारळ, दालचिनी, किनीन वगैरे पदार्थ ह्मणजे

सीलोनमधील अक्षय्यसंपत्तिचा झरा होय. सीलोनमधील शेतकरी खरोखर भाग्यवान! भू माता त्याचा चरितार्थ सुखानें चालावा ह्मणून अनेक प्रकारची फळें, फुलें व धान्य त्यास सदैव पुरविते. एक एकर नारळाचा बाग असली कीं घरीं बसून निदान १० ते २५ रु. दरमहा मिळतो. १६ ते ५५ वयापर्यंतच्या प्रत्येक पुरुषास दरसाल रु. १-५ आणे पोलटॅक्स् द्यावा लागतो व हाच काय तो प्रत्यक्ष कर. तेथें इन्कमटॅक्स् नाहीं व जमीनसाराही नाहीं. राज्यकारभाराला लागणारा पैसा कस्टमड्यूटि, रेल्वे वगैरे मार्गानें जमविला जातो." मि. शार्प यांनीं सुमारें २० वर्षांपूर्वी सीलोनला भेट दिली त्यावेळीं त्यांनीं वरील उद्गार काढिले आहेत. अलीकडे जमीनीवरील कर व इन्कमटॅक्स असे दोन्ही कर सरकारनें बसविले आहेत.

येथें पर्जन्य पुरेसा पडतो व हवा उष्ण आहे त्यामुळें तांदळाचें पीक मुख्यतः होतें. तथापि तेथील लोकांनां पुरेसा तांदूळ पिकत नाहीं यामुळें मलबार व ब्रह्मदेश येथून पुष्कळसा तांदूळ आयात होतो. अलीकडे ब्रह्मदेशाचा तांदूळ आणणें जास्त स्वस्त पडूं लागल्यामुळें मलबारच्या तांदुळास मागणी फार कमी येऊं लागली आहे.

तांदुळाशिवाय निरनिराळ्या प्रकारची द्विदल धान्यें, गहूं व कापूसही येथें पिकतो. कांहीं भागांत तंबाखूचें पीकही थोडेसे येते.

पोपई, अननस, फणस, केळीं वगैरे अनेक प्रकारची फळें व भाजा यांचे पीक ही चांगले येते. नानाविध प्रकारचीं फुलझाडें सर्वत्र दिसतात व बहुतेक लोकांच्या घरांच्या परड्यांत कॉफी, नारळ व फुलझाडें लाविलेली दिसतात.

## प्रवासाची साधनें

या लहानशा बेटांतून परदेशीं विविध पदार्थ पाठविले जातात तसेंच युरोपियन मळेवालेही पुष्कळ ठिकाणीं आहेत. शिकारीची उत्तम सोय, अप्रतिम नैसर्गीक सौन्दर्य, आल्हादकारक हवा, इंग्लंडसारखी रम्य अशी

शीतस्थलें येथें असल्यामुळें अनेक युरोपियन आफिसर्स व व्यापारी यांची ये जा चाललेली असते यामुळें एथें दळणवळणाचें मार्ग चांगले आहेत.

( १ ) कोलंबो हे ब्राडगेज् रेलवेचे केंद्र आहे. तेथून अनुराधपुरास एक फाटा जातो व तेथून एक ब्रँच लाईन "तालिमनार" या बंदराकडे जाते व मुख्य लाईन जॉफनाकडे जाते.

( २ ) कोलंबोपासून कँडीपर्यंत एक रस्ता जातो.

( ३ ) गॅलीबंदरापासून मातरापर्यंत एक रस्ता जातो.

रेल्वेखेरीज पक्या सडका सर्वत्र आहेत. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, मोठमोठ्या सडका ह्मणजे ७५।१०० मैल लांबीच्या सडका डामरी आहेत त्यामुळें मोटारी, बैलगाड्या वगैरेच्या वाहतुकीस फार सौख्य होते. मुख्य सडकेपासून रबराच्या किंवा चहाच्या मळ्यापर्यंतही सडका नेलेल्या आहेत. आगगाड्यामध्यें विशेष गर्दी नसते. हिंदुस्थानातील रेल्वेचे दरा पेक्षां तेथील दर अधिक आहेत.

कोलंबो हे येथील मुख्य बंदर आहे व येथें आफ्रिका, आस्त्रेलिया, युरोप, चीन व हिंदुस्थान वगैरे बहुतेक देशाची जहाजे कोळसा व पाणी घेण्याकरितां येतात यामुळें या बंदरास आंतरराष्ट्रीय बंदराचें स्वरूप प्राप्त झाले आहे. समुद्रकांठी धक्के बांधल्यामुळें हें बंदर विशेष सुरक्षित झाले आहे.

गॅले हे निसर्ग निर्मित बंदर आहे परंतु बंदरांत शिरण्याचा मार्ग खडकाळ भागांतून जात असल्यामुळें जहाजांच्या अप्रतिहत संचारास धोक्याचे आहे.

ट्रिंकोमाली हें नैसर्गिक असें सुंदर बंदर आहे. येथें डच लोकांनी दोन मजबूत किल्ले बांधले होते व तेथें कित्येक दिवसपर्यंत सैन्य होते सांप्रत तेथील सैन्य काढून घेण्यांत आले आहे.

प्रवाशांच्या सोयीकरितां रेल्वेची स्वस्त दराची तिकिटें मिळतात, २ आठवड्याच्या व महिन्याच्या तिकिटांनां ५० व ७५ रु. अनुक्रमें पडतात.

या तिकिटानें रेल्वेचा वाटेल तितका व वाटेल त्या मार्गानें प्रवास करितां येतो.

शहरांतून फिरण्यास रिक्शा व टांगे मिळतात. टांगे फार थोडे असतात. रिक्शा व टांगा यांना भाडे किती पडते ते पुढें दाखविले आहे.

## रिक्षा व टां ाभाडें

| टांगा | | | ( कोलंबो) | रिक्षा |
|---|---|---|---|---|
| अर्धातास | रु. | सें. ५० | दहा मिनिटें | १५ सें. |
| सहा तास | रु. | ५० | अर्धा तास | ५० |
| | | | एक तास | ३५ |

१ तासापुढें दर अर्ध्या तासास १० सेंट

संध्याकाळीं ७पासून सकाळीं ६पर्यंत वरीलदरापेक्षां ५ सेंट जास्त द्यावे लागतात

| | टांगा | कँडी | रिक्षा दिवस | रात्र |
|---|---|---|---|---|
| सकाळीं ६ ते सायंकाळ ७ | ५ रु. | | | |
| सतत ६ तास | २-५० सें. | पहिला अर्धातास | ३० सें. | ३५ |
| एक तास | १-२० | १ तास | ६० ,, | ७० |
| पुढें दर अर्ध्यातासास | ३० सें. | पुढें दर तासास | १५ ,, | २० |
| अर्धा तास | ६० सें. | | | |

हिंदुस्थानांतून सीलोनमध्यें जाऊं इच्छिणाऱ्या प्रवाशांस वाहनाची स्थूल कल्पना यावी ह्मणून वरील माहिती दिली आहे. पुणें, मुंबई, सातारा, नासिक या शहराप्रमाणें सीलोनमध्यें टांगे वाटे्ल तेथें मिळत नाहींत. बहुतेक रिक्षांतून प्रवास करण्याचा प्रघात फार. टांगे फार थोडे आहेत.

## सीलोनी नाणें

हिंदुस्थानांतील रुपया व सीलोनचा रुपया एकच आहे. हिंदी पावलीही तेथें चालते. सीलोन सरकारच्या १, २, ५, १०, ५०, १००, ५०० व हजार रुपयांच्या नोटा असतात. रुपयाच्या खालील नाणें सेंट हे होय. शंभर सेंटचा एक रुपया होतो. ५, १०, २५ व ५० सेंटची रुप्याची नाणीं असतात. तांब्याचेही सेंटचे नाणें आहे.

हिंदुस्थानांतून जातांनां रुपये किंवा नोटा नेल्या ह्मणजे कांहीं अडचण पडत नाहीं. परत येतांनां जर सिंहली सेंट जवळ असतील तर देऊन टाकून त्याची हिंदी नाणीं करून घ्यावींत. बोटीवरच एक्सृचेंज ऑफिस असते.

सीलोनमध्यें पत्रव्यवहार करण्यास पोस्टाचे दर हिंदुस्थानांतील दरासारखेच आहेत. सीलोनला पत्र पाठवावयाचें असल्यास जास्त पोस्टेज पडत नाहीं.

## लोक

सीलोनची लोकसंख्या सुमारें पन्नास लक्ष आहे. हिंदू, मुसलमान, खिस्ति, बुद्ध, ( सिंहली ) बरगर्स आणि वेद्द अशा लोकांची वस्ति येथें आहे.

सीलोनमधील मूळच्या लोकांस वेद्द असें ह्मणतात. ते अरण्यांत आणि डोंगरांत राहतात. जंगलांतील कंदमुळें व शिकार यांवर ते आपली उपजीविका करतात. हे लोक वर्णाने काळे व ठेंगू असून त्यांचे डोक्यावर लोकरीसारखे दाट केस असतात. त्यांचेपैकीं पुष्कळांना स्नान फारसें ठाऊकच नाहीं, कांहींना वस्त्राचाही उपयोग माहीत नाहीं. हे लोक स्वभावानें थोडे भित्रे आहेत. अस्सल वेद्द पहाणें असल्यास बिंटेन नांवाच्या भागांत जाणें जरूर आहे. या भागांत अरण्य अत्यंत दाट आहे व या अरण्यावरून मनुष्याचा क्रांतिकारक हात अद्याप फिरलेला नाहीं. यामुळें या प्रांतांत प्रवास करणें फार धोक्याचें काम आहे.

कित्येक वेद्द लोकांनीं सिंहली लोकांशीं बेटिव्यवहार केल्यामुळें ते बरेंच सुधारले आहेत. अलीकडे वेद्द लोकांची संख्या फार झपाट्यानें कमी होत चाललेली आहे व कदाचित् थोडेच दिवसांत ते या भूतलावरून पूर्णपणें नष्ट होतीलसें वाटते.

प्राचीनकाळीं विजय नांवाच्या राजपुत्राबरोबर उत्तर हिंदुस्थानांतून जे लोक तेथें गेले त्यांच्या वंशजांस सिंहली असें ह्मणतात.



मिरवणुकीचा देखावा (पृ. ३२)

सिंहली लोक थोडे कृष्ण वर्णाचे, साधारणतः आपल्या इकडील मराठे लोकांसारखेच आहेत. उंची आपल्या महाराष्ट्रीय लोकांसारखीच असून ते हाडापेरानें मध्यम आहेत. मासे, केळी, नारळ हे नित्य खाण्याचे पदार्थ असल्यामुळें ते सशक्त आहेत. तथापि सोलापूर, नासिक, नगर वगैरे प्रांतीं नांगराच्या मागें काम करणारा शेतकरी जसा राकट, मजबूद आणि सोशिक असतो तसा मात्र सिंहिली नाहीं आणि याचें कारण उघडच आहे, कीं तेथील शेतकऱ्यास भारी मेहनतीचीं कामें करण्याचे प्रसंग येत नाहींत.

सिंहली पुरुष कमरेभोंवती धोतर गुंडाळतो, अंगांत जाकीट किंवा सद्रा घालतो, शिरोभूषण किंवा टोपी घालींत नाहीं. डोकीच्या केसावर वाटोळा कंगवा असतो. सिलोनी स्त्रिया अंगांत जाकीट घालून लुगडें नेसतात. खिस्ती लोकांप्रमाणें पेहेराव करण्याकडे सर्वत्र प्रवृत्ति वाढत आहे. सिंहली बुद्धिमान् असून मेहेनती आहेत. आदरातिथ्य करणें त्यांना प्रिय वाटतें. तथापि ते जरा जास्त लवकर रागावतात असें म्हणतात.

पुष्कळसे आरब व्यापारी कित्येक शतकापूर्वी येथें येऊन स्थायिक झाले आहेत. त्यांना मूर असें म्हणतात. मूर लोक व्यापार करितात, कांहीं थोडे शेतीवरही उपजीविका करतात. पोर्तुगीज आणि डच लोकांचा ज्यावेळीं पूर्वेकडील प्रदेशावर अम्मल होता त्यावेळीं आपल्या "जातीचे व वंशाचे लोक असल्याखेरीज आपणांस पूर्वेकडील प्रदेशांवर साम्राज्य चालवितां येणार नाहीं" असें त्यांस वाटूं लागलें होतें व म्हणून त्यांनीं आपल्या ऑफिसर्सना व शिपायांना एतद्देशीय स्त्रियांशीं लग्नें करण्यास उत्तेजन दिलें, यामुळें सिंहली स्त्रिया व पाश्चात्य पुरुष यांपासून झालेली प्रजा सिंहलद्वीपांत बरीच आहे. या मिश्र प्रजेस "बरगर्स" असें ह्मणतात. यूरोपियन्स् व बरगर्स मिळून एकंदर लोकसंख्येच्या एकदशांश आहेत.

प्राचीनकाळीं तामीळ लोकांनीं सीलोनवर स्वाऱ्या केल्या व कांहीं लोकांनीं उत्तर आणि दाक्षिण किनाऱ्यावर कायमची वस्ति केली. चहाच्या

मळ्यांत काम करित असणारे मजूर बहुधा तामीळच असतात. मद्रास इलाख्यांतून मजूरीकरितां आलेल्या तामिळांची संख्या सुमारें ५।६ लाख असते. येथें मुसलमान सुमारें चार लक्ष आहेत. खिस्ती लोकांची संख्या सुमारें पांच लक्ष आहे. सिंहली लोक बहुधा बुध्द धर्माचे आहेत.

## रोडिया

रोडिया ही सीलोनमधील अस्पृश्य जात. रोडियाच्या सावलीचाही अद्याप कित्येकजण विटाळ मानितात. पूर्वी एका राजाला रोडियांनीं मनुष्याचें मांस भक्षण करण्यास दिलें व या अपराधाबद्दल तेव्हांपासून या लोकांस अत्यंत अपवित्र मानण्यांत येऊं लागलें अशी दंतकथा आहे. प्राचीनकाळीं रोडिया स्त्रियांना कमरेच्यावरचा भाग नेहमीं उघडा राखावा लागत असे. हिंदुस्थानांतील अस्पृश्याप्रमाणें रोडियांनां कोणतेही सामाजिक हक्क उपभोगितां आले नाहींत असें दिसतें.

कँडी येथील राजांच्या वेळीं एखाद्या प्रतिष्ठित माणसास भयंकर शिक्षा द्यावयाची झाल्यास त्याच्या बायकोच्या तोंडांत रोडियाच्या तोंडांतील विड्याचा पीक घालीत व अशारीतीनें तिला बाटवीत. पुरुषांसही अशी शिक्षा देत असत.

याप्रमाणें उच्च कुलांतील ज्या स्त्रिया रोडियांच्या ताब्यांत दिल्या त्यांपासून झालेली संतति सुरूप निपजली व यामुळें रोडियांत कित्येक पुरुष व स्त्रिया फार सुंदर आहेत.

## सीलोनमधील खेडेगांव

हिंदुस्थानांतील खेड्यापेक्षां सीलोनमधील खेडीं जास्त शोभिवन्त दिसतात. प्रत्येक घराच्या भोंवतीं नारळी, पोफळी, केळी वगैरे फळझाडें, सुंदर फुलांची झाडें व भाजीपाला यांची बाग असते. घरें हिंदुस्थानांतील घराप्रमाणेंच बहुधा मातीच्या कच्चा विटांचीं असतात. छपरावर नारळाच्या झावळ्या टाकलेल्या असतात.



सीलोन–खेड्यांतील बाजार (पृ. ३५)

खेडेगांवांतील लोकांचा मुख्य धंदा शेतीचा. पण या शेतकऱ्यांना दुष्काळ मुळींच माहीत नाहीं. पीक हमखास ठरलेलें. बैलांच्या जाती हिंदुस्थानांतून नेलेल्या आहेत. म्हशीची जातही हिंदी दिसते. ढोणग्यांचा व बैलांचा शेतीवर उपयोग केला जातो. इंग्लिश लोकांनीं गाई आणिलेल्या आहेत पण त्यांचा प्रसार फारसा झालेला नाहीं.

हिंदुस्थानांतील खेड्याभोंवतीं निवडुंग बहुधा असावयाचा, तसेंच रानांत घाणेरीही असावयाच्याच. सीलोनमध्यें खेड्याभोंवतीं निवडुंग सहसा दिसत नाहीं, व कोणीकडेही दृष्टी टाकली तरी निरुपयोगी झाड दिसत नाहीं. जिकडे दृष्टी टाकावी तिकडे केळीं, नारळी, पोफळी यांची गर्दी दिसते.

शिक्षणाचा प्रसार बराच आहे. सुमारें शेंकडा ६५ ते ७० लोक साक्षर आहेत. त्यामुळें बहुतेक गांवीं प्राथमिक शाळा आहे. हिंदुस्थानांत ब्राह्मण, तेली, मराठे, मांग असे सर्व जातींचे लोक एकाच खेड्यांत राहतात पण या बेटांत 'गत्तरगाम' ज्याला म्हणतात त्यांत सर्व अस्पृश्यवर्गाप्रमाणें अगदीं कनिष्ठ जातीचेच लोक रहातात. 'गहलगामांत' हीन जातीचेच लोक रहातात. मूर गांवांत सर्व मूरच रहातात.

उच्च जातीचा मनुष्य खालच्या जातीच्या हातचें जेवण जेवीत नाहीं, मग विवाहाचें नांवच नको. हिंदु मनुष्य नीच जातींतील व्यक्तीशीं विवाह संबंध करीत नाहीं पण ख्रिस्ती लोकांशीं मात्र करतो. नवरा हिंदु व बायको ख्रिस्ती, किंवा नवरा बुध्द तर स्त्री हिंदु किंवा ख्रिस्ती असे विवाह होतात व विवाहोत्तर स्त्रीस किंवा पुरुषास आपला धर्म बदलावा लागत नाहीं. तसेंच धर्म बदलणेंही फार सोपें आहे. ख्रिस्ती माणसास गंध, भस्म वगैरे धारण करून केव्हांही हिंदु होतां येतें. धर्म हा केवळ विश्वासाचा प्रश्न आहे असें मानलें जातें.

शेती करणारे लोक उच्च जातीय आहेत. वाजंत्री वाजविणारे

हलक्या जातीचे लोक आहेत रोडिया ही तेथील अस्पृश्य जात. सीलोनमध्यें ब्राह्मण नाहींत. इ. स. पूर्वी ५४३ सालीं जेव्हां विजय तेथें गेला तेव्हां त्याचेबरोबर ब्राह्मण सीलोनमध्यें गेले नाहींत कारण त्यावेळीं बंगालच्या बाजूस ब्राह्मणीधर्मानें पुरेसा प्रवेश केलेला नव्हता.

इ. स. पूर्वी २५० सालीं महेंद्र सीलोन येथें गेला व त्यानें बुद्ध धर्माचा प्रसार केला पण त्या वेळींहीं ब्राम्हण किंवा ब्राम्हणी धर्म तेथें गेला नाहीं.

सीलोन हिंदुस्थानच्या अगदीं जवळ असूनही तेथें ब्राह्मणांचा प्रवेश झाला नाहीं. ब्राम्हण धर्मानें जातिसंस्था उत्पन्न केली व अस्पृश्यता उत्पन्न केली असे जे लोक म्हणतात किंवा बुद्धानें जातिसंस्था नष्ट केली असें जे म्हणतात त्यांनीं सीलोनच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास केल्यास तो फलदायी झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

खेडेगांवांत व सामान्य लोकांत धर्मभोळेपणाही बराच आहे. कोणतेंही शुभकार्य करण्यास ' नखतराल ' ज्योतिषी बुवांची सल्ला घेतली जाते. मृतांच्या आत्म्यांची ( यक्षांची ) भीति सर्व लोकांस वाटते व त्यांची शान्ति करण्यास नाना तऱ्हेचे उपाय योजितात. रस्त्याचे कडेनें रोवलेले पांढरे दगड असतात व त्यास " स्वामि " असें म्हणतात. हे स्वामि बहुधा पिंपळाच्या झाडाखालीं असतात व त्या झाडासही स्वामि असें म्हणतात. येथें बौद्ध आणि हिंदु अर्चन पद्धतींचें मिश्रण दिसून येतें. तामील लोक या स्वामीपुढें बोकड व कोंबडा यांचा बळी देतात.

जन्म, विवाह व मृत्यु या सर्व प्रसंगीं सिंहली लोकांत कांहीं धार्मिक विधि करितात. कँडी प्रांतांतील सिंहली लोकांत विवाहाचे दोन प्रकार आहेत " बिन्न " नांवाच्या विवाहांत वर हा वधूच्या घरीं रहावयास जातो व ' डिग ' विवाहांत वधू वराच्या घरीं जाते. सिंहली लोकांत घटस्फोट रूढ आहे. व्यभिचार, त्याग, किंवा वर व वधू यांची समति ही कारणें घट-

* नक्षत्रराज—या शब्दाचा अपभ्रंश

स्फोटास पुरेशी होतात.

ईश्वरप्रातिकरितां किंवा देवास संतुष्ट करण्याकरितां देहदंड करण्याची फार चाल आहे. ता. ३ से १९३३ च्या टाइम्स्च्या अंकांत या देहदंड करणारांचें उत्तम चित्र दिलेलें आहे. गालांत, पाठींत वगैरे शरीराच्या निरनिराळ्या भागांत खिळे टोंचून घेतात. ही देहदंडाची चाल दक्षिण हिंदुस्थानांत फार प्रचलीत आहे. या देहदंडाच्या चालीस ' अलगुगुथल ' असें म्हणतात.

आम्ही सीलोनमध्यें फारच थोडे दिवस होतों. त्यामुळें आम्हांला जिभेंत, पाठींत किंवा गालांत खिळे व सुऱ्या टोंचून घेणारे लोक भेटले नाहींत. गालांत किंवा जिभेंत सुऱ्या टोंचिल्यानंतर रक्ताचा थेंबही बाहेर येत नाहीं हें आपण प्रत्यक्ष पाहिलें आहें असें कित्येक इंग्रज लेखकांनीं लिहिलेलें आहे.

## लोकांचे मुख्य धंदे

हिंदुस्थानप्रमाणें येथील लोक मुख्यतः शेतीवर आपली उपजीविका चालवितात. सर्वत्र भातजमीनी व फळबागा आढळून येतात. सुपारी व नारळ हे येथील अत्यंत महत्वाचें पीक आहे.

मासळी पकडण्याचें काम किनाऱ्यालगत पुष्कळ मोठ्या प्रमाणावर चालतें व हें काम करणारे कोळी बहुधा रोमनकॅथालिक पंथाचे आहेत. सीलोनच्या किनाऱ्यावर मासेही नानातऱ्हेचे आहेत. " गाणारा मासा " या नांवाचा एक मासा आहे. तो एक प्रकारचा आवाज काढूं शकतो. एखादे तंतुवाद्य वाजविल्याप्रमाणें त्याचा आवाज असतो. चढणारे मासे पाण्याबाहेर पडून खडकावर इकडे तिकडे फिरतात. एखाद्या तलावांतील

पाणी कमी झालें म्हणजे अगदीं दिवसा १०-१२ वाजतां ते दुसऱ्या तळ्याकडे जातांना दिसतात. कित्येक जातींच्या माशांना चिखलांत पुरून घेण्याची शक्ति आहे. या बेटांत बुद्ध धर्मांचे जरी लोक आहेत तरी त्यांच्या जेवणांत बहुधा मासा हा असतोच. बुद्ध देवानें एका बाईच्या घरीं जाऊन मांस भक्षण केलें होतें असा "महापनिब्बान" सुत्तांत उल्लेख आहे.

प्लंबॅगो धातूच्या व रत्नांच्या लहान मोठ्या खाणी पुष्कळच आहेत. पेरहेरा नांवाच्या बौद्ध धर्मीय उत्सवाच्यावेळीं ॲडम्स् पीक नांवाच्या डोंगराजवळ असलेल्या रत्नपुरम् या गांवीं दरसाल रत्नांचा बाजार भरतो.

प्लंबॅगोच्या खाणी फारशा खोल नाहींत. धातु शोधण्याचें काम गवती छपर असलेल्या इमारतींत चालतें. या कारखान्यांना कौलें घातलीं तर कौलांच्या फटींत या धातूचे बुळबुळीत कण सांचल्यावर कौले घसरून खालीं येतात व फुटतात.

रबर, चहा व नारळ यांचे सुमारें १२०० कारखाने आहेत. जंगलांत उत्तम इमारती लांकूडही पैदा होतें. एबोनी व साटीन या झाडाबद्दल सीलोनची फार प्रसिद्धि आहे. उत्तम सागवानही बरेंच आहे. बांबूचे नानाविध पदार्थ करून कांहीं लोक पोट भरतात. बांबूची वाढ या देशांत विलक्षण होते. कित्येक बांबू १०० फूट उंच वाढतात व त्यांचा बुंधा कापला तर पाणी भरण्याचें मोठें बकेट तयार होतें.

## खनिज संपत्ति

पेन्सिल तयार करावयास लागणारा प्लंबॅगो नांवाचा धातु या बेटांत विशेष सांपडतो. येथें १८६ खाणी चालू आहेत. आणि दरसाल १५४५०० टन धातु परदेशीं पाठविला जातो. मुशी करितां, कोरडे घणाकरितां व पेन्सिली करितां या धातूचा सध्यांच्या यांत्रिक युगांत फ

उपयोग होतो. हिंदुस्थानांत यांत्रिक प्रगति बहुतेक नसल्यामुळें या धातूला यूरोप व जपान मधून विशेषतः मागणी येते.

या बेटाच्या दक्षिण व मध्यभागीं लोखंड विपुल आहे. कित्येकदां अगदीं जमीनीजवळ उत्तम शुद्ध स्थितींत तें सांपडतें. स्वीडनमधील उत्तम तऱ्हेनें तयार केलेल्या लोखंडासारखें सीलोनमधील अर्धवट तयार केलेलें लोखंड असते.

ईशान्यदिशेस हंबतोला जवळ हजारों टन मीठ तयार होतें. कोलंबो जवळ पारा सांपडतो. डच लोकांच्या ताब्यांत हें बेट असतांना येथून पुष्कळसा पारा यूरोपमध्यें जात असे. सध्यां, येथून फारसा पारा काढीत नाहींत.

सोनें व रुपें मात्र अगदीं थोडें व क्वचित् सांपडतें. सीलोनमध्यें तेल व कोळसा सांपडत नाहीं हाच काय तो मोठा दोष आहे. हे पदार्थ जर येथें सांपडते तर सीलोनची बरोबरी कोणत्याही देशास करितां आली नसती.

## राज्यव्यवस्था

सीलोनही क्राऊन कालनी ( बादशाही वसाहत ) आहे. येथील गव्हरनरला सेक्रेटरी आफ स्टेट आफ कालनीज् यांचे हुकमती खालीं काम करावें लागतें. गव्हरनरच्या मदतीस एक्झिक्यूटिव्ह कौन्सिल आहे. मुंबई इलाख्याप्रमाणें लोकनियुक्त अशा मंडळींचें कौन्सिल आहे. प्रधान मंडळही आहे. बेटाचे पांच भाग केले असून प्रत्येक भागावर इकडील कलेक्टर व अ. कलेक्टर यांच्या दर्जाचे अधिकारी आहेत.

प्रस्तुतची राज्यघटना डुनोमोर कमिशनच्या शिफारशी प्रमाणें २० मार्च सन १९३१ रोजीं अमलांत आली. हिंदुस्थानास देऊं केलेल्या सुधारणा व सीलोनची प्रचालित पद्धति यांत पुष्कळच साम्य आहे. प्रधान मंडळाचा आफिसर्स आफ स्टेट ( अधिकारी ) यांवर ताबा नाहीं. प्रधान

मंडळाचा अधिकाऱ्यांच्या बढतीवर ताबा नाहीं. अधिकारी प्रधान मंडळास जबाबदार नसून ते गव्हरनरला जबाबदार आहेत. गव्हरनरलाही खास असे अधिकार दिलेले आहेत.

एकंदर सामान्य व्यवस्था हिंदुस्थानसारखीच आहे. वयांत आलेल्या प्रत्येक व्यक्तीस मतदानाचा हक्क आहे. लोक राज्यकारभारांत विशेष लक्ष घालतात व याचीं कारणेंही कांहीं विशेष अशीं आहेत. हिंदुस्थानांत पुनर्विवाह व प्रौढविवाह नाहीं तेव्हां ह्या सामाजिक गोष्टींत बरेंच लक्ष कांहीं लोक घालतात. सीलोनमध्यें हे प्रश्नच नसल्यामुळें कोणालाही पुनर्विवाह व प्रौढविवाह यांचा विचार करण्यांत वेळ घालवावा लागत नाहीं. सीलोनमध्यें ब्राह्मण नसल्यामुळें भटांचें सोवळें ओवळें व भटशाही याबद्दल विद्वत्ताप्रचुर व मार्मिक लेख लिहून वृत्तपत्रकारांनां पोट भरतां येत नाहीं किंवा या विषयावर कौन्सिलमध्यें कोणाला चटकदार भाषण करून आपला लौकिक वाढवितां येत नाहीं. यामुळें होतकरू व बुध्दिमान् मनुष्यास राजकारणांतच मन घालावें लागतें.

सामान्य सिंहली मनुष्य हिंदुस्थानांतील सामान्य माणसापेक्षां जास्त ज्ञानवान् व देशांतील घडामोडींची जास्त माहीती असलेला असा आहे. एकदां तंजावर येथें कुंचे, ब्रश, वगैरे विकणाऱ्या सिंहली दुकानदाराकडे आह्मी गेलों होतों. तेव्हां त्या दुकानदारानें निरनिराळ्या वेळीं कोणकोणती कमिशनें बसली, त्यांनीं राजकीय सुधारणेबद्दल काय काय रिपोर्टस् केले, शाळाखाते कसें चालतें वगैरेबद्दल आह्मांस अगदी बारीकसारीक माहीती सांगितली. 'सिंहलद्वीप सिंहली लोकांकरितां आहे' अशी सिंहली लोकांची घोषणा आहे व त्यामुळें ते हिंदुस्थानांतील लोकांचा द्वेष करितात. अलीकडे तर हिंदी लोकांवर बहिष्कार घालण्याची चळवळ चालू आहे. हिंदुस्थान आणि सीलोन ही अंगण आणि ओसरी याप्रमाणें अगदीं एकास एक जोडून आहेत तथापि तेथेंही हिंदूंचा द्वेष होतो.

हिंदु लोक हिंदुस्थानाबाहेरील लोकांचा व्देष करीत नाहींत याबद्दल सिंहली हिंदूंस दोषही देतात. याप्रकारची एक फार मजेदार हकीकत घडली ती पुढील प्रमाणें. एके दिवशीं रात्रीं सुमारें ११ वाजतां मी व श्री. वाघ कोलंबो येथें वेलावटीकडून सीसाइडकडे मोटारीनें जावयास निघालों. मोटारींत २।४च माणसे होती, मोटार ड्रायव्हरनें आम्हांस विचारलें तुह्मी गांधिजींचे लोक आहांत काय? असा प्रश्न ठिकठिकाणी लोक आम्हांस विचारीत असत व हिंदुस्थानांतील राजकीय चळवळीबद्दल माहीती पुसत असत. आह्मी उत्तर दिलें कीं, "आह्मी गांधिजींचे अनुयायी नाहीं. आह्मास गांधिजी माहीती आहेत. सरकारनें फार कडक कायदे केल्यामुळें गांधिजींच्या चळवळीचा जोर कमी झाला आहे." मोटार ड्रायव्हर उसळून ह्मणाला सरकारला कांहीं करितां येणार नाहीं पण तुह्मी नेटानें काम करीत नाहीं.

हिंदुस्थान हा हिंदूकरितां आहे हें तुम्हांस कळत नाहीं. तुमच्या देशांत कोणी परकी मनुष्य आला व पैसे मिळवूं लागला तर तुह्मांस त्याबद्दल कांहींच वाटत नाहीं. आमच्या शेजारीं एक मलबारी बसला होता त्याकडे बोट करून ड्रायव्हर पुढें बोलूं लागला. मी या मलबाऱ्याचा व्देष करितो कां तर तो येथें काम करून पैसे मिळवितो व ते सर्व मलबारला पाठवितो. मी एथें काम करितो. पैसे मिळविल्यावर चैन केली तरी माझा पैसा एथेंच राहतो व मी मेल्यावर माझा पैसा माझ्याच देशांत राहील. तुह्मी आमच्याप्रमाणें परक्यांचा व्देष करण्यास शिका म्हणजे आम्ही सिंहली तुह्मांस मदत करूं.

या ड्रायव्हरच्या बोलण्यावरून सर्व साधारण सिंहली माणसाची विचारसरणी कोणत्या प्रकारची होत चालली आहे आणि भविष्यकाळीं सिंहलव्दीपांत हिंदी लोकांची संभावना कशी केली जाणार आहे याची कल्पना येते.

## इतिहास


सीलोनचा पूर्वेतिहास दंतकथांनीं विशेषतः भरलेला आहे. अलीकडे प्राक्कालिन विषयांचा अभ्यास करणारांनीं शिलालेख, नाणीं, जुने अवशेष, सीलोनी बखरी इत्यादिकांच्या साह्यानें पुष्कळशी ऐतिहासिक माहीती गोळा करून इतिहास लिहिला आहे. त्याला अनुसरून सामान्य वाचकाकरितां पुढील माहीती दिली आहे.

महावंश नांवाच्या जुन्या सिंहली बखरींत असें वर्णन दिलेलें आहे कीं, बंगालमधील एका बंगाली कन्यकेला सिंहापासून गर्भ राहिला व पुढें जो मुलगा झाला त्याचें नांव सिंहल असें ठेविलें. या सिंहलनें प्रस्तुतच्या बेटांत जाऊन वसाहत केली व सिंहलच्या नांवावरून या बेटास सिंहलद्वीप असें नांव पडलें.

ही गोष्ट रोमच्या इतिहासांतील राम्युलस् आणि रीमस् यांच्या गोष्टी सारखी आहे. तथापि एवढें खरें कीं खिस्तशकापूर्वी कांहीं शतकें येथें वसाहत झाली होती. गंगा नदीच्या खोऱ्यांतलि विजय नांवाचा राजपुत्र खिस्तपूर्व ५४३ सालीं सीलोनमध्यें गेला व तेथें त्यानें राज्य स्थापिलें. तद्देशीय लोकांशीं स्नेहाचे संबंध रहावेत म्हणून विजयानें सीलोनमधील एका सरदाराचे मुलीशीं लग्न केले. विजयाबरोबर सीलोनमध्यें हिंदुधर्म गेला परन्तु विजयाच्या वेळीं, बंगालच्या बाजूस ब्राम्हणीधर्म व ब्राम्हणी वाङ्मय यांचा विशेष प्रसार झालेला नसल्यामुळें सीलोनमध्यें ब्राह्मण किंवा त्यांचा धर्म प्रसार पावूं शकला नाहीं.

विजयानंतर दक्षिण हिंदुस्थानांतील तामिळांनीं सीलोनवर अनेक स्वाऱ्या केल्या व सिंहली राजांनां आपली राजधानी कमींतकमीं पांच वेळां बदलावी लागली.

बुद्धधर्माचा पुरस्कर्ता अशोक यानें आपल्या लोकांस बुद्धधर्मांचा



राजपुत्र विजय सीलोनमध्यें जात आहे. खि. पूर्व ५४३ (पृ. ४२)

प्रसार करण्याकरितां सीलोनमध्यें पाठविले. त्यांत अशोकाचा भाऊ महींद्र हा होता. सीलोनचा राजा तिस्स यानें बुद्धधर्माचा स्वीकार केला व तेव्हां पासून बुद्धधर्म हा राष्ट्रीय धर्म झाला. महींद्र सीलोनमध्यें खिस्तपूर्व २०४ सालीं दिवंगत्त झाला.

सिंहली राजे धर्मनिष्ठ, उदार व शूर असे असत, धर्माची अभिवृद्धि व्हावी म्हणून कित्येक राजांनीं बुद्धभिक्षूंनां आश्रय दिला, मोठमोठाले धर्म-मठ स्थापन केले व प्रजेसही चांगल्या रीतीनें वागविले. अपवाद म्हणून एखादा राजा अगदीं कमी दर्जाचाही निघे. तथापि एकंदरींत सिंहली राजे चांगले होते असे म्हणावयास हरकत नाहीं. या प्राचीन राजांत चलंगवाहु व दत्तगामिनी या राजांनीं फारच चांगली कीर्ति मिळवली. तथापि हे राजे परकीय स्वाऱ्यावद्दल थोडेसे बेफिकीरच असत.

उत्तम रीतीनें अरमार वाढवून आपल्या बेटाचें संरक्षण त्यांस करितां आले नाहीं. इत्तर ठिकाणीं ज्या प्रमाणें पाश्चात्यांच्या धाडी गेल्या त्याप्रमाणें पोर्टुगीजांची १५०६ सालीं धाड येऊन त्यांनीं समुद्रा लगतचा भाग घेतला. समुद्रकांठ परकीयांच्या ताब्यांत गेला याचा सरळ अर्थ असा कीं सीलोनच्या कंठास गळफास बसला सिंहली राजे बेटाच्या मध्यमार्गी जाऊन आपला कारभार पाहूं लागले. समुद्र कांठ शत्रूच्या ताब्यांत गेल्यावर पारतंत्र्याचा फास जास्त घट्ट होऊन आंतील राजे गुदमरून मरणार हें इ. स. १५०६ मध्येंच निश्चित झालें.

पोर्टूगीज लोकांनी खिस्तधर्माचा प्रसार करण्याकरितां हिंदुस्थानांत ज्याप्रमाणें जुलूम केला त्याप्रमाणें सीलोन मध्येंही जुलूम केला. आपली लोकसंख्या वाढावी म्हणून तद्देशीय स्त्रियांशीं लग्नें केली. सीलोनी स्त्रियांशीं लग्न लावणारास नौकरींत बढती मिळणें वगैरे नाना प्रकारची आमिषें असत.

पोर्तुगीज लोकांशीं डचलोक स्पर्धा करूं लागल्यानंतर डच लोकांनीं पोर्तुगीजांस सन १६५६ मध्यें हांकून लावून सीलोनमध्यें आपली सत्ता स्थापन केली. डच लोकांनीं खिस्ति धर्माचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला. परन्तु डच लोक पोर्तुगीजा इतके जुलमी नव्हते.

डच लोकांच्या अमदानींत दालचिनीची लागवड करण्याचा मक्ता सरकारडे असे सरकारी परवानगीवांचून थोडीशी जरी दालचिनी विकली, परदेशी पाठविली किंवा एखाद्या झाडास जाणून बुजून इजा केली तर त्या अपराधाबद्दल मृत्यूची शिक्षा मिळत असे.

इंग्लिश लोकांनीं डच लोकांचा इ. स. १७९७ मध्यें पराभव करून तेथें आपली सत्ता स्थापिली. सन १८०२ सालीं इंग्लिश लोकांनीं कँडीवर स्वारी केली पण तींत यश आलें नाहीं. कँडीचा राजा जुलमी होता त्याचे व त्याच्या प्रजेचें भांडण होऊन इंग्लिशांचा आश्रय केला व त्यानें त्यास राज्य त्याग करून दक्षिण हिंदुस्थानचा आश्रय करावा लागला व सन १८१५ सालीं इंग्लिशांची सत्ता चिरस्थायी झाली.

इंग्लिश लोकांचें नशीबच उत्तम. त्यांची सत्ता वाढावयाची असली म्हणजे कोणीतरी जुलमी राजा उत्पन्न होतो व मग प्रजेच्या न्याय्य हक्काकरितां त्यांनां युद्धांत पडावे लागते. १७ च्या व १८ व्या शतकांचा इतिहास जर काळजीनें वाचला तर इंग्लिश लोकांनीं राज्यापहार करण्याकरितां युद्धें केलीं नाहींत त्यांना केवळ लोकांच्या न्याय्य हक्कांचे रक्षण करण्याकरितांच युद्धांत पडावे लागले असें दिसून येईल. सन १८१५ पासून सीलोन ब्रिटिशांच्या ताब्यांत आहे व तेथें कलोनियल गव्हरमेंट आहे.

इंग्लिशांच्या ताब्यांत हें बेट आल्यापासून तेथील व्यापार व उद्योग धंदे यांस चालना मिळाली. सन १८४२ मध्यें चहाच्या लागवडीस सुरवात झाली; काफीचें पीक येथें फार येत असे पण सन १८७९ मध्यें काफीवर एक प्रकारचा रोग पडून त्याचा नाश झाला व तेव्हां पासून का-

फीची पैदासच कमी झाली. रबराची लागवड होऊन सन १८८१ सालीं रबराचें पहिलें पीक आलें. सिंकोनाची लागवड १८६० सालीं झाली व कोयनेल तयार होऊं लागलें.

अशा रीतीनें ब्रिटिश अमदानींत रबर, चहा, कोको, नारळ, प्लंबॅगो वगैरेचा व्यापार पुष्कळच वाढला.

सीलोनच्या इतिहासांत पुढील वर्षें विशेष लक्षांत ठेवण्या सारखी आहेत.

खि. पूर्व स. ५४३ विजय सीलोनमध्यें गेला व त्यानें राज्य मिळविलें.
,, २५० तिस्स राजानें बुद्ध धर्माची दीक्षा घेतली.
,, २०४ महेंद्राचा मृत्यु.
इ. स. १५०६ पोर्टुगीज लोकांनीं आपली सत्ता स्थापली.
,, १६५६ डच लोकांनीं पोर्टुगीजांस हांकून लाविलें.
,, १७९७ इंग्लिश लोकांनीं डचांचा पराभव केला.
,, १८०२ इंग्लिश लोकांनीं कँडीवर चाल केली.
,, १८१५ सिंहली राजांचा शेवट.
,, १८४२ चहाच्या लागवडीस सुरवात.
,, १८६० सिंकोनाची लागवड.
,, १८७९ काफीचा रोगानें नाश.
,, १८८१ रबराचें पहिलें पीक.

## बुध्दधर्म

सिंहलद्वीपामध्यें बुद्धधर्मीयांचा भरणा विशेष आहे. बुद्धधर्मीयांचा धर्म गोतमबुद्धानें स्थापन केला व बुध्दानें अहिंसा मताचा पुरस्कार केला यापेक्षां बुध्दधर्माची जास्त माहीती आपल्या इकडील फारच थोड्या सुशिक्षितांस आहे. ह्मणून बुध्दधर्माची थोडी माहीती दिली आहे.

गोतम नेपाळच्या दाक्षिण प्रांतीं खिस्तसनापूर्वी ५५७ सालीं कपिल-वस्तु येथें जन्मला. हा तेथील शुध्दोदन नांवाच्या राजाचा मुलगा. जगाचा वीट आल्यामुळें बायकोचा त्याग करून तो काशीस जाऊन संन्याशांच्या सान्निध्यांत राहिला. पण त्याचें समाधान होईना. नंतर त्यानें उपोषणें करण्यास सुरवात केली पण शांति मिळेना ह्मणून त्यानें उपवास सोडिले. गोतमानें व्रत भंग केला ह्मणून त्याचे मित्र त्यास सोडून गेले. नंतर निरंजना नदीचे काठीं पिंपळाचें झाडाखालीं ध्यानस्थ बसला असतां त्यास ज्ञान प्राप्त झालें.

यानंतर त्यानें आपल्या धर्माचा प्रसार केला. तिपिटक ( तीन टोपल्या ) नांवाच्या ग्रंथांत बुध्दधर्माची वाढ कशी होत गेली व त्यांतील मुख्य तत्वें काय आहेत तें पहावयास सांपडतें.

ईश्वर आहे कीं नाहीं, तो जगाचा उत्पत्तिकर्ता आहे कीं नाहीं या-बद्दल बुध्दानें निश्चयात्मक मत कधींच दिलें नाहीं. बुध्दाच्या धर्मास "मध्यम प्रतिपदा" मध्यम मार्ग असेंही एक नांव आहे. "आर्यांचा आष्टां-गिक मार्ग"— मुख्य आठ तत्वांचा पुरस्कार केल्यावरून— असेंही नांव आहे.

बुध्दघोषाचार्यानें 'विशुध्दिमार्ग' नांवाचा ग्रंथ लिहिला आहे व त्यांत बुध्दधर्मांच्या सर्व तात्विक अंगांचा विचार करून "निर्वाण पद" कसें प्राप्त करून घेतां येईल तें सांगितलें आहे.

जगांत दुःख आहे. तृष्णेमुळें दुःख उत्पन्न होतें. तृष्णेवर जय मिळविला ह्मणजे दुःखाचा नाश होतो. संपूर्ण दुःखांचा नाश झाला ह्मणजे "निर्वाण" प्राप्त होतें हेंच बुध्दधर्मांचें मुख्य बीज आहे. निर्वाणाची कल्पना हिंदु लोकांच्या मुक्तीच्या कल्पनेप्रमाणें आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

निर्वाणपद प्राप्त होण्याकरितां शील, समाधि आणि प्रज्ञा अशा त्रयींची जरूरी असते. शील ह्मणजे तृष्णेवर जय मिळविण्याकरितां पाळावयाचे नियम. हे नियम फारच कठीण असत.



भगवान् बुद्ध (पृ. ४६)

तृष्णेवर पूर्ण जय मिळावा, सुखोपभोगाची यत्किंचित् इच्छा होऊं नये ह्मणून भिक्षु "आरण्यकशील" बाराही महिने अरण्यांत रहाण्याचे शील पाळीत. रुक्खमूलिकंगशील पाळणारांना वृक्षाच्या आश्रयाखेरीज कोणताही आश्रय घेण्याची परवानगी नसे. भिक्षु अशक्त किंवा आजारी असला तर त्यास गुहेंत राहण्याची परवानगी मिळे. ही जी अशक्त किंवा आजारी भिक्षूंस परवानगी मिळे त्यामुळें निरनिराळ्या डोंगरामध्यें गुहा तयार झाल्या व अजिंठा, वेरूळ वगैरे ठिकाणच्या लेण्यांचा उगमही या आरण्यकशीलांतच आहे. भिक्षूंवर नाना तऱ्हेची नियंत्रणें होतीं.

चित्ताची एकाग्रता कशी करावी. भौतिक जगाचा पूर्ण विसर पडण्यास काय करावे इत्यादि गोष्टींचा समाधिमध्यें विचार केलेला आहे. चित्ताची एकाग्रता व्हावी ह्मणून अग्नि, वायु, सूर्य इत्यादिकांवर चित्ताची एकाग्रता करावी, स्मशानांत जाऊन रक्त, मांस व अस्थि यांकडे पाहून हें सर्व शरीर नाशिवन्त आहे त्याच्या पोषणांत किंवा त्याला सुशोभित करण्यांत मानवीशक्ति खर्च करूं नये इत्यादि अनेक गोष्टींचा बारिक विचार समाधिमध्यें केलेला आहे.

बुध्द आणि त्याची सत्कृत्यें यांचें चिंतन करणें याचा अन्तर्भाव अनुस्सतिमध्यें होतो. आसन आणि प्राणायाम यांचा फारसा विचार कोठेंही केलेला नाहीं.

पान्तजल योगशास्त्र आणि बुध्दाचें समाधिशास्त्र यांचा अद्यापपावेतों तुलनात्मक अभ्यास कोणी केलेला दिसत नाहीं. तेव्हां कोणी अभ्यासकानें हा विषय अभ्यासास घेतल्यास फलदायक होईल.

बुध्दभिक्षु हा ईश्वराची प्रार्थना करीत नाहीं, किंवा ईश्वरानें आपणास पापाची क्षमा करावी किंवा आपल्यावर दया करावी असें कधींही ह्मणत नाहीं. त्याची कर्माबद्दल किंवा कर्मवादाबद्दल दृढश्रध्दा असते. तो शील आणि ध्यान यांच्या साहयानें तृष्णा ताब्यांत ठेवण्याचा किंवा तिचा नाश

करण्याचा प्रयत्न करीत असतो. ब्राह्मण, खिस्ती, किंवा मुसलमान यांचा समज असा असतो कीं, प्रार्थना केली म्हणजे पापाचा नाश होतो. एका पापाचा क्षय प्रार्थनेनें झाला ह्मणजे दुसरें पाप केलें तर त्याचा नाशही प्रार्थनेनें करितां येईल असेंही कांहीं लोक समजतात.

बुध्दधर्माच्या तत्वावर जे टीकात्मक ग्रंथ अन्यधर्मीयांनीं केलेले आहेत ते मूल ग्रंथांचें सांगोपांग अध्ययन केल्यानंतर लिहिलेले दिसत नाहीं. कांहीं ठिकाणची टीका पूर्ण तर्कशुध्द आहे असें दिसत नाहीं.

पुष्कळ लोकांचा असा समज आहे कीं, बुध्दानें अहिंसेचे तत्व प्रतिपादिलें व त्यामुळें यागीय हिंसा बंद झाली. पण हें मत खरें नाहीं. संहिताकरणकालींच ब्राह्मण धर्मांत स्थित्यंतरें घडून येऊन यागीय हिंसा बंद झालेली होती. बुध्दाच्या पूर्वींच महावीर—जैनधर्मांचा स्थापनकर्ता—यानें अहिंसेचा प्रसार केला होता. बुध्दाच्या दशशिक्षांमध्यें 'पाणातिपातावेरमणि इति शिख्खापदम्' प्राण्यांचा घात करूं नये अशी आज्ञा आहे. परन्तु बुध्द स्वतः मांसाशन करीत असे असें महापरिनिब्बानसुत्त— बुध्दाच्या निर्वाण कालाचें वर्णन असलेलें सूक्त— यावरून दिसतें. बुध्दाभिक्षूंनीं मांशासन केलेलीं किंवा त्यांस इतरांनीं मांस दिलेलीं अनेक वर्णनें बुध्दवाङ्मयांत वाचावयास सांपडतात.

बुध्दानें जातिभेद मोडला हें ह्मणणेंही फारसें खरें नाहीं. एक तर बुध्दाचे कालीं जातिभेद आतांच्या सारखा बध्दमूल झालेला नव्हता. याशिवाय दुसरें असें कीं, बुध्दाच्या कुलांत इतर कुलांशीं शरीरसंबंध होऊं नये म्हणून बहीण व भाऊ यांचेही विंवाह करण्यास परवानगी दिल्याचें अंबठ्ठसुत्तावरून दिसतें.

बुध्दधर्मानें अहिंसेचा प्रसार केला व त्यामुळें हिंदुस्थानांत शस्त्रवैद्यकाचा उत्कर्ष झाला नाहीं असा कांहीं लोकांचा समज झालेला आहे पण तो खरा नाहीं.

जीवक नांवाचा प्रसिद्ध शस्त्रवैद्य बुद्धधर्मीय होता तसेंच अष्टांग हृदयाचा कर्ता वाग्भट हाही बुद्धधर्मीयच होता असें वाटते, कारण अष्टांग-हृदयांत अगदीं पहिल्या अध्यायांतच 'अनुयायात् प्रतिपदं सर्व धर्मेषु मध्यमाम्' असें त्यानें सांगितलेलें आहे.

## रावणाची राजधानी

सीलोन मधून आम्ही परत आल्यावर रावणाची राजधानी कोठें होती, तिचे अवशेष कांहीं आहेत कीं नाहींत असा प्रश्न अनेक लोकांनीं केला. आमच्या एका विद्वान् मित्रानें तर एके दिवशीं माझ्याशीं बराच वादविवाद केला म्हणून या विषयाबद्दलची माझी मतें सविस्तर एथें मांडीत आहे.

रामायणाचा काल विद्वानांच्या-मतें खि. पूर्व ३ रें शतक हा होय. वाल्मिकीनें रामायण रचल्यावर त्या काव्याला राष्ट्रीय ग्रंथ ही योग्यता येण्यास निदान एक शतकाचा तरी काल लागला असावा. रामायण हा ग्रंथ तयार झाल्यावर त्यांतील कथा व विभूतिपूजा सीलोन मध्यें जाऊन पोंहोचण्याची क्रिया हिंदुधर्माच्या उपाध्यायांमार्फत किंवा क्षत्रियांच्या मार्फ-तच होणें शक्य होतें. अन्य-धर्मीय लोक रामाचें यश, लक्ष्मणाची त्याग-वृत्ति, सीतेचें पातिव्रत्य व हनुमानाची स्वामिनिष्ठा यांची स्तुति करतील ही गोष्टच अशक्य अशी आहे.

डॉ. गैजर यांच्यामतें सिंहली भाषा ही आर्य भाषा आहे. डॉ. गैजर यांचा सिद्धांन्त मान्य केल्यास आर्यांची सीलोनमध्यें वस्ति केव्हां झाली हा दुसरा प्रश्न येतो. ज्ञानकोशकार डॉ. केतकर यांचे मत असें आहे कीं, श्रौतधर्माचा विकास होण्याच्या अगोदर आणि ब्राह्मणजातीचा विकास होण्याचें अगोदर आर्यांची सीलोनमध्यें वस्ति झाली होती. डॉ. केतकरां-चें मत बरोबर आहें असें वाटतें.

रामचंद्राचे काळीं सीलोनमध्यें यज्ञसंस्था होती हें रावण व इंद्रजित् यांनीं केलेल्या यज्ञावरून स्पष्ट होतें. शिवाय रावण हा पुलस्त्यऋषींचा पुत्र होता असें रामायणांत सांगितलेलें आहे. रावण व इंद्रजित् यांनीं देवता प्रसन्न होण्याकरितां केलेले प्रयत्न व देवी जानकीचा वध केला आहे असें दाखविण्याकरितां केलेलें ऐन्द्रजाल पाहिलें म्हणजे अथर्ववेदाप्रमाणें अभिचारादिकर्मेंही तेथें होत असत असें दिसतें. रावण व त्याचे राक्षस यांनीं देवांस बंदिवासांत घातले, ते आर्यांच्या यज्ञांचा विध्वंस करीत, यावरून रावणाच्या कारकीर्दींत तरी ब्राह्मण व त्यांची यज्ञसंस्था लंकेतून हांकलली जात होती असें दिसतें. रावणाच्या कालापासून तों इ. स. पूर्वी सुमारें ५ व्या शतकापर्यंतचा इतिहासच उपलब्ध नाहीं यामुळें या मधल्या काळांत कोणती संस्कृति लंकेमध्यें नांदली हें समजण्यास मार्ग नाहीं.

हिंदुस्थानामध्यें रामायणाखेरीज कोणत्याही प्राचीन ग्रंथांत लंकेबद्दल उल्लेख नाहीं. लंकेतील सर्वांत जुने शिलालेख इ. स. पू. च्या शेवटच्या शतका-पासून ते इ. स. च्या ५ व्या शतकांतल्या काळाचे आहेत. तसेंच द्वीपस्थ वाङ्मयांतील सर्वांत जुनाग्रंथ इ. स. ३०४ ते ३२२ च्या दरम्यानचा आहे. कोणत्याही शिलालेखांत किंवा वाङ्मयांत रामरावणाचा उल्लेखच नाहीं.

अर्थात् रावणाच्या कालापासून तों विजयाच्या स्वारीपर्यंतच्या काळांत सीलोनमध्यें रावणाचें नांवही शिल्लक राहिलेलें दिसत नाहीं. खि. पू. ५४३ सालीं विजय लंकेत गेला पण त्यावेळीं लंकेतील लोक कोणत्याही जोरदार अशा धर्माचें अनुयायी नव्हते व त्यामुळेंच तेथें बुद्धधर्माचा रिघाव लवकर झाला व त्याची वाढही पुष्कळच झाली.

विजयाबरोबर किंवा महेन्द्राबरोबर ब्राह्मणी संस्कृति सलोनमध्यें गेली नाहीं. ब्राह्मण धर्माचा पूर्ण द्वेष करणारी बुद्धसंस्कृति लंकेंत शतकानुशतके नांदत होती. अर्थात् बुद्धलोक रामचंद्राच्या पराक्रमाचें जें स्थान (लंका)

तेथें रामचंद्राचें स्मारक ठेवतील हें अशक्य आहें.

ब्राह्मणांच्या वाङ्मयांतील नाना कथा घेऊन त्यांचें रूपांतर बुद्ध लोक करीत. पालिभाषेतील दशरथ जातकांत राम हा सीतेचा भाऊ होता असें सांगितलेलें आहें. राम व सीता असे दोघेजण वनवासास गेले व परत आल्यानंतर त्यांचें लग्न झालें, सीताहरण व रामरावण संग्राम यांचा उल्लेखच त्या जातकांत नाहीं.

या जातकावरून कांहीं पाश्चात्य पंडितांनीं असा तर्क लढविला आहे कीं, दशरथ जातकांतील कथानक घेऊन रामाच्या अंगीं अनेक सग्दुण आरोपित करून एक महावीर ब्राह्मण कवींनीं बनविला व सुंदर काव्य निर्माण करून बुद्धधर्माची पिछेहाट करण्याचा प्रयत्न केला. पाश्चात्य पंडितांनीं ब्राह्मणास नांवें ठेवण्याकरितांही कदाचित् हें तर्कट रचिलें असण्याचा संभव आहे. असो, या मुद्यावर आजपर्यंत बरेंच वाङ्मय तयार झालेलें आहे. लक्षांत ठेवण्यासारख्या मुख्यत: दोनच गोष्टी आहेत.

(१) रावणाच्या कालापासून तों अर्वाचीन ऐतिहासिक कालपर्यंतच्या कालांतील ग्रंथ सीलोनमध्यें नाहींत; त्यामुळें रावणनगरीचें स्थळ निश्चित होण्यास मार्ग नाहीं.

(२) ब्राह्मणी संस्कृति सीलोनमध्यें केव्हांही रुझली नाहीं, त्यामुळें रामचंद्राच्या विजय स्थानाचें स्मारक राहिलेलें नाहीं. विजयाबरोबर ब्राह्मणी संस्कृतीचा प्रवेश सीलोनमध्यें झाला नाहीं.

तथापि रावणाच्या राजधानी बद्दल काहीं अनुमान मात्र काढतां येण्यासारखें आहें व तें अनुमान पुढील दिलेल्या सिंहली कथा व रामायणांतील कांहीं वर्णनें यांवरच मुख्यत: अधिष्ठित आहें.

(१) ट्रिंकोमालीहून अनुराधपुरास जाणाऱ्या रस्त्यावर ५ व्या मैलां-

पलीकडे कन्या नांवाचे उष्ण झरे आहेत. त्यांचें उष्णतामान १०० ते ११० डिग्री असते. या झऱ्याबद्दल तामीळ लोक पुढील प्रमाणें दन्तकथा सांगतात.

" कन्या नांवाची रावणाची सापत्न माता होती. ती कुमारिका होती. रावण एकदां कांहींतरी अनिष्ट गोष्ट करण्यास निघाला. त्याला आपल्या हेतूपासून परावृत्त करण्याकरितां श्री विष्णु वृद्धाचें रूप घेऊन आले व त्यांनीं रावणास कन्या मृत झाली आहे असें सांगितले. यामुळें रावणानें पुढें जाण्याचें रहित केलें आणि तेथेंच मातेचें उत्तरकार्य करावें असें ठरविलें. विष्णु जेथें उभे होते तेथें उष्णोदकाचा झरा वाहूं लागला व विष्णु अदृश्य झाले. विष्णु अदृश्य झाल्यानंतर तेथें उत्पन्न झालेल्या झऱ्याच्या कांठीं रावणानें कन्येचें उत्तरकार्य केलें. यामुळें त्या उष्णोदकाच्या झऱ्यास कन्या असें नांव पडलें."

(२) नुवाराएलिया पासून ४ मैलावर सर सॅम्युअल बारकर नांवाचा जो प्रसिद्ध संशोधक होऊन गेला त्याचें स्मारक म्हणून बारकर फार्म आहे. तेथून पुढें २ मैलावर सीता एलया आहे. सीतेच्या नांवाचें किंवा सीता या नांवाचें " सीता एलिया " हें एकच ठिकाण सीलोनमध्यें आहे.

(३) हनुमानानें रावणाची नगरी जाळल्यावर खालील जमीन सोन्याची झाली अशी कथा हिंदूंच्या कांहीं पुस्तकांतून दिलेली आढळते.

वरील तीन्ही गोष्टींचा एकत्र विचार केल्यास थोडेसें अनुमान काढतां येतें. सीलोनमध्यें सोन्याची जमीन म्हणजे अत्यंत मूल्यवान् जमीन रत्नपुरम् जवळ आहे. तेथें आज कित्येक शतकें रत्नें सांपडत आहेत. अर्थात् जाळपोळीनें जी जमीन सोन्याची झाली असें म्हणतात तो भाग रत्नपुरचा असावा असें दिसतें. सीतेला अशोक वनांत ठेविलेले होते असें रामायणांत वर्णन आहे. अशोकवन म्हणजे ज्या ठिकाणीं दुःख उत्पन्न

होणार नाहीं, सदैव आनंदच उत्पन्न होईल असें अत्यंत रमणीय स्थल सीलोन मध्यें नुवारा एलिया खेरीज दुसरें कोणतेंही नाहीं. रामचंद्राबरोबरचे सैनिक दक्षिण हिंदुस्थानांतून लंकेत गेले त्यांनीं तेथें नुवारा एलियासारखें अत्यंत रमणीय स्थान पाहिल्यावर त्यास अशोकवन हें नांव दिलें असावे असें दिसते. नुवारा एलिया जवळच सीता एलिया आहे. रावणानें सीतेस जेथें ठेविले त्या ठिकाणास सीता एलिया (सीतेचा बाग किंवा सीतावन) असें नांव द्वीपस्थ लोकांनीं दिलें; तेंच अद्यापपर्यंत चालू राहिलेलें दिसते. अशोकवन हें नुवारा एलियास परकीयांनीं दिलेलें नांव असल्यामुळें तें द्विपस्थांत चालू राहिलें नाहीं व यामुळेंच आज अशोकवन या नांवानें कोणताच भाग सीलोनमध्यें प्रसिद्ध नाहीं.

कन्या नांवाच्या झऱ्यावरच रावणानें आपल्या सापत्न मातेचें उत्तर कार्य केलें या वरून रावणाचें निवासस्थान ट्रिंकोमालीपासून बरेंच दूर असावें असें दिसते. रावणाचें निवासस्थान जर जवळच असतें तर तो उत्तर कार्यास घरीं परत गेला असता. तेव्हां ट्रिंकोमालीहून बरेंच दूर असलेलें व जेथील भूमि सुवर्णमय म्हणजे अत्यंत मोलाची आहे असें सीलोनमधील ठिकाण रत्नपुरम् हें होय.

एवंच सर्व गोष्टींचा विचार केला असतां रत्नपुरम् येथें रावणाची राजधानी असावी व रत्नपुरम् जवळच म्हणजे कांहीं मैलावर असलेल्या नुवारा एलिया या अत्यंत रमणीय ठिकाणीं सीतेस ठेविलेलें असावें असें दिसते.

## सीलोन मधील शेतकी

### लागवडी खालील क्षेत्र

या बेटांतील जमीनीचें क्षेत्र सुमारें १६। दशलक्ष एकर आहे. त्या पैकीं ३। दशलक्ष जमीन प्रत्यक्ष लागवडी खालीं आहे. निरनिराळ्या पिकांचे क्षेत्र पुढील प्रमाणें आहे.


| | | | |
|---|---|---|---|
| भात | ८३८००० एकर | तंबाकू | १४००० |
| चीना | ७७००० | चहा | ४७००० |
| नारळ | १०००००० | रबर | ५३४००० |
| सुपारी | ६९००० | कोको | ३४००० |
| पायमरा | ५०००० | वेलदोडे | ६००० |
| भाजीपाला | ३२००० | धान्यें | २८००० |
| दालचिनी | २६००० | कापूस | २४०० |
| सिट्रोनेला | ३३००० | ऊंस | १००० |

यावरून सीलोनमध्यें कोणती पिकें होतात व निरनिराळ्या पिकांखालीं किती क्षेत्र आहे हें समजून येईल. सीलोनमध्यें नारळ, दालचिनी, सिंकोना, रबर इत्यादिकांचें उत्पन्न फारच मोठें आहे म्हणून मुख्य पिकाबद्दल पुढें सविस्तरवर्णन दिलें आहे.

## नारळ

सीलोनमध्यें नारळ हें एक महत्वाचें पीक आहे. कोलंबो पासून गॅली बंदरापर्यंत सुमारें ७० मैल लांबीच्या पट्यांत नारळाची फारच नामांकित अशी अखंडरायी आहे. सीलोनमध्यें जाणारा प्रवासी या सुंदर रायीकडे पाहून आश्चर्यानें चकित होऊन जातो. सर्व देशभर नारळाची लक्षावधि झाडें आहेत. नारळाच्यापिकां खालीं एकंदर १० दशलक्ष एकर जमीन गुंतलेली आहे. * सर्व जगांमध्यें जेवढा नारळ पिकतो त्यापैकीं ४२५ भाग फिलीपाइन बेटांत, ४१० भाग डच ईस्टइंडीजमध्यें, १५५ भाग सीलोनमध्यें, १०५ भाग ब्रिटिश मलायामध्यें व बाकीचा २५५ भाग हिंदुस्थान, लखदीव व मालदीव बेटें व झांजिबार इत्यादि भागांत होतो.

* टीप :—जगांतील नारळाची एकंदर पैदास १३५० दशलक्षटन आहे व या आंकड्यांस अनुसरून वरील आंकडे दिलेले आहेत.




पिकें दाखविणारा नकाशा (पृ. ५४)

वरील आकड्यावरून असें दिसून येईल कीं, सीलोनमधील नारळाची पैदास जगांतील एकंदर पैदाशीच्या एक नवमांशा इतकी आहे. फिलिपाईन बेटांतील ठेंगण्या जातीची लागवड सीलोनमध्यें बरीच केलेली दिसते.

नारळाची मुळें जमीनींत ३ किंवा ४ फुटांपेक्षां जास्त जात नाहींत व एकेका झाडाला सुमारें सात हजार पर्यंत मुळें असतात म्हणून फिलीपाइन बेटांत नारळाच्या रायीं मधून नांगरानें जमीन नांगरतात. सीलोनमध्यें नारळाच्या रायांतून नांगरण्याची चाल नाहीं. * खोबऱ्यामध्यें तेलाचें प्रमाण शेंकडा ६५ ते ७० असते. इतर गळितांत तेलाचें प्रमाण फार कमी असतें. नारळाची पैदास फार मोठी असल्यामुळें खोबरेल तयार करण्याचे सीलोनमध्यें ५०० चे वर कारखाने आहेत. खोबरे तयार करून परदेशीं पाठविणें, काथ्याची दोरखंडे व इतर पदार्थ करणें हे येथील लोकांचे दुय्यम धंदे आहेत.

सीलोन मधून खोबरे व तेल अल्पप्रमाणांत हिंदुस्थानांत येते. फ्रान्स् आणि जर्मनी येथें सीलोन मधून तेल व खोबरे फार जाते. खोबऱ्याचें तेल तिकडे काडलीव्हर व सिट्रोनेलातेल यांत मिसळतात. शिवाय त्यापासून लोणीही काढतात. हें लोणी गाईच्या किंवा म्हशीच्या लोण्यापेक्षां सरस असतें कारण तें मुळींच नासत नाहीं. पाव व बिस्किटें करण्याच्या कामीं हें लोणी पाश्चात्य देशांत वापरतात. शिवाय फ्रान्समध्यें हें लोणी सैनिकांना देण्यांत येतें यामुळें त्यास चांगला भाव येतो.

हिंदुस्थानांत कोंकण, मलबार, बंगाल, मद्रास इलाख्याचा पूर्व किनारा व काठेवाड येथें नारळ होतो. गोदावरीच्या मुखाजवळील भागां-

---

* एरंडी ४६ ते ५० ; तीळ ४५ ते ५०, भुइमूग ४४ ते ५० करडई ३० ते ३२, सरकी १६ ते १९

तला नारळ हिंदुस्थानांत सर्वांत उत्तम समजला जातो. हिंदुस्थानांत जरी बराच नारळ पिकतो तरी तो हिंदुस्थानास पुरेसा होत नाहीं. अन्दमान, सीलोन व विषुववृत्ताजवळील बेटें येथून तेल व नारळ यांची आयात होते. दरशनिवारीं शनीस नारळ फोडणारांनीं नारळाचा फाजील उपयोग केल्यानें परदेशी मालास आपण नकळत उत्तेजन देतो हें लक्षांत ठेवावें.

## चहा

महाराष्ट्रांतील अगदीं खेड्यापाड्यांतून चहाचा प्रसार झालेला आहे परन्तु चहा कोठें होतो, चहाचा व्यापार किती मोठा आहे, त्यांत हिंदी भांडवल व मजूर किती गुंतलेले आहेत याबद्दलची माहीती फारच थोड्यांस असते म्हणून येथें थोडीशी माहीती दिलेली आहे.

पूर्वी ईस्ट इंडिया कंपनी चिनी चहा बिलायतेस नेऊन अतोनात फायदा मिळवीत असे. सन १७८७ मध्यें चिनी चहाची लागवड हिंदुस्थानांत करण्याची कल्पना निघाली पण सन १८३४ पर्यंत या कल्पनेला विशेषशी चालना मिळाली नाहीं. लार्ड बुइल्यम बेंटिंगनें चीन मधून चहाचे बीं व तज्ञ मजूर आणण्याकरितां तीन वेळां प्रयत्न केला पण त्यांत फारसें यश न येतां पुष्कळ पैसा मात्र खर्च झाला. तथापि १८५२ सालापर्यंत हिंदुस्थानानें बरीच मजल मारून ८० लक्ष पौंड चहा परदेशीं पाठविण्यास सुरवात केली.

सन १८४० मध्यें दार्जिलिंग आणि चितगांव या जिल्ह्यांत प्रयोगादाखल प्रथमतः चहाची लागवड केली. त्यानंतर हिंदुस्थानांत चहाची लागवड एक सारखी वाढतच गेली. प्रस्तुत कालीं हिंदुस्थान व सीलोन येथें किती मळे आहेत तें पुढें दिले आहे.

| प्रांत | मळे | एकर | (पैदास पौंड) |
|---|---|---|---|
| आसाम | ९९८ | ४३१००४ | २४३२२९ |
| बंगाल | ३४६ | १९९०८१ | ८८४८२ |
| बिहार ओरिसा | २६ | ३६४२ | ८८६ |
| संयुक्तप्रांत | ३७ | ६२५४ | १३६६ |
| पंजाब | २४६४ | ९६९३ | १९०२ |
| मद्रास | ७७३ | ७२३५१ | २७५०८ |
| कुर्ग | १ | ४१५ | १७४ |
| त्रिपारा बंगाल | ४७ | ८५५२ | १६१४ |
| त्रावणकोर | १२५ | ७१८८६ | २८६७३ |
| म्हैसोर | १५ | ४०३४ | १८७ |
| कोचीन | ४ | ५२१ | ५९ |

उत्तर हिंदुस्थानांत डेहराडून, अलमोरा, कुमावन, गरवाल, नेपाळ, छोटानागपूर; पंजाबांत कांग्रा नदीचें खोरें, मंडी व शिरमूर संस्थान; दक्षिण हिंदुस्थानांत वायनद, निलगिरी, अन्नामलाई व त्रावणकोर मधील पर्वतांच्या रांगा येथें चहा पिकतो.

हिंदुस्थान व सीलोन या देशांतून ६०० दशलक्ष पौंडाहून जास्त चहा तयार होतो. चहाच्या जागतिक पैदासीपैकीं सुमारे १/७ ते १/८ भाग एकट्या सीलोनमध्यें होतो. हिंदुस्थानांतील बरेच मळे इंग्लंडांत स्थापन झालेल्या कंपनीचे असून तिची आफिसें लंडन, कलकत्ता लिव्हरपूल, व ग्लासगो येथें आहेत. हिंदिकंपन्यांच्या मालकीचे व वैयक्तिक मालकीचे

---

टीप :—जगांत एकंदर १८०० दशलक्ष पौंड चहा दरसाल पिकतो. त्यापैकीं ८८० द. ल. पौंड चीनमध्यें ३९२ द. ल. पौंड हिंदुस्थानांत २२८ द. ल. पौंड सीलोनमध्यें, १४७ द. ल. पौंड डच ईस्ट इंडीजमध्यें ८१ द. ल. पौंड जपानमध्यें व ७२ द. ल. पौंड इतर देशांत होतो.

मळे फार थोडे आहेत. चहाच्या मळ्यांच्या भांडवलापैकीं शेंकडा ९० भांडवल पाश्चात्य लोकांचें आहे. सीलोनमधीलही बहुतेक मळे युरोपियन लोकांच्या मालकीचेच आहेत.

कलकत्त्यास टी ब्रोकर्स ॲसोशियनच्या कचेरींत कलकत्ता टी ट्रेडर्स ॲसोशियन मार्फत हंगामाच्या दिवसांत ( जुलै ते डिसेंबर ) चहाचे लिलांव दर मंगळवारी होतात. सीलोनधध्यें चहाची देवघेव मुख्यत: कोलंबो येथें होते. लंडन येथेही चहाचे लिलाव होतात. मुंबईचा कपाशीचा भाव ज्याप्रमाणें अमेरिकेच्या न्यूयार्कच्या भावावर अवलंबून असतो त्या प्रमाणें कलकत्ता व कोलंबो येथील भाव लंडनच्या भावाप्रमाणें बदलत असतात.

हिंदि चहाच्या निर्गतीवर १०० पौंडास ६ आणे जकात आहे. जकात सरकार वसूल करिते व वसुलाच्या उत्पन्नाची व्यवस्था इंडियन टी सेस कमिटि कलकत्ता या संस्थेमार्फत होते. जकातीचें उत्पन्न सुमारें १३ लक्ष रु. येते व यांतील बहुतेक उत्पन्न यूरोप आणि अमेरिका येथें चहाचा प्रसार वाढविण्याचें कामीं खर्च होतें. चहास लागणारी खतें व जमीन आणि चहास होणारे रोग इत्यादि विषयांचे शास्त्रीय संशोधन करण्याची प्रयोग-शाळा आसाम मध्यें टोकलै येथें आहे.

चहा ही मूळची आसाममध्यें सांपडणारी वनस्पति आहे. चहाला उष्ण व सर्द हवा लागते. पाऊसही भरपूर म्हणजे ७०-८० इंच असावा लागतो. झाडाची मुळें कुजूं नयेत म्हणून चांगला निचरा होणारी जमीन लागते. या सर्व गोष्टींची अनुकूलता सीलोनमध्यें आहे. सुमारें ६०-७० वर्षांपूर्वी सीलोनमधील उच्च पर्वतराजीवर दाट अरण्यें होती. पाश्चात्य धनिकांनीं तीं अरण्यें तोडून चहाचे अनेक मळे तेथें तयार केलेले आहेत.

शंभर एकर चहाचा मळा प्रस्तुतकाळीं करावयाचा म्हटल्यास त्यास साधारणत: पुढील प्रमाणें खर्च येतो.

१ जमीन शंभर एकर :—दर एकरीं हजार रु. या प्रमाणें एक लक्ष. रु.

२ जंगल सफाई, बी वियाणें, यंत्रसामुग्री मंजुराकरितां चाळी वगैरेचा प्राथमिक खर्च, } साठ ते पासष्ठ हजार.

पहिल्या पांच वर्षांत मळ्याचा खर्च भागत नाहीं. पांच वर्षानंतर उत्पन्नावर मळ्याचा खर्च भागतो. सात वर्षानंतर उत्पन्न मिळूं लागते. दहा वर्षांनंतर शंभर एकराच्या मळ्यावर मिदान एकलक्ष रुपयांचें उत्पन्न राहते. एकदां मळा लावल्यावर त्याचें उत्पन्न अनेक वर्षें मिळत राहतें. येथपर्यंत दिलेल्या हकीकती वरून चहाचा धंदा किती मोठा आहे याची कल्पना येईल. हिंदुस्थानांतील मळेवाल्यांचा वार्षिक नफा सुमारें वीस कोटींचा आहे असें म्हणतात.

पाश्चात्य भांडवलवाल्यांनीं ही महत्वाची उत्पन्नाची बाब बहुतेक सर्वस्वी हस्तगत केलेली आहे. सीलोनमध्यें पर्वतावर जातांनां सर्वत्र चहाचे मळे दिसतात. चहाची लागवड कशी करितात हेंही समजणें जरूर आहे.

चहाचें बीं सुमारें मध्यंम आकाराच्या सुपारी एवढें असतें. प्रथमतः बीं रुजत घालतात. १२ ते १८ महिन्यांत रोप सुमारें पेन्सिली इतके जाडीचें होतें. नंतर तें रोप कायम जागीं नेऊन लावितात. पुढें १२-१३ महिन्यांनीं रोपाच्या मुख्य दांड्याची ६ ई. उंचीवर छाटणी करितात. या योगें बाजूच्या फांद्यांची फूट जोरानें होते; नंतर पुन्हां १॥ वर्षांनीं फूट दीड उंची राखून रोप खची करितात. या शेवटच्या छाटणीनंतर ५-६ महिन्यांनीं चहाची पत्ती गोळा करितां येते. चहाचें पान गुलाबाचें पानासारखें असतें.

चहाचें झाड कणखर असतें, त्यामुळें हवामानास दाद न देतां तें झपाट्यानें वाढतें. समुद्र सपाटीपासून कित्येक हजारफूट उंचीवर व विशेषतः निवाऱ्याच्या दऱ्यांतून चहाची पैदास फार चांगली होते.

लागवडीपासून ४ वर्षांनीं दर एकरी १३० ते २०० पौंड चहा होतो. पुढें झाडें जशी जून होतात त्या मानानें उत्पन्न वाढतें व दर एकरीं

४०० ते ७०० पौंड चहा होतो.

चहाचें झाड खची न केलें तर ३० फुटापेक्षांही जास्त उंच होतें. परन्तु पानें खुडण्यास सोयीचे जावे म्हणून ३—४फुटापेक्षां जास्त वाढ होऊं देत नाहींत व सुमारें १६ ते ४८ महिन्यांनीं झाडांची छाटणी करितात.

जमीनदार लोक मळ्यांतच बंगले बांधून रहातात. कामकरी वर्गाला मळ्यावर राहण्याकरितां चाळी बांधून दिलेल्या असतात. कामकऱ्यांना खाद्यपेय पदार्थ कपडा वगैरे सामान घेण्यास बाजारांत दूर जावें लागूं नये म्हणून मालक मळ्यावर दुकानें चालवितात. मजूरांनां बाहेर जाण्याची बंदी असते व बाहेरलि लोकांस मजुरांकडे जाऊन उगाच गप्पा मारूं देत नाहींत.

सूर्योदयाचें सुमारास ब्यूगल वाजतो व आवाजाबरोबर मजुरांचे तांडेचे तांडे हजेरी देण्याकरितां येतात. या मजुरांत तामील, पुरुष, स्त्रिया व मुलें यांचाच भरणा विशेषतः जास्त असतो दुपारीं १२ वाजण्याचें सुमारास १ तास जेवण्यास सुटी मिळते नंतर पुन्हां ४-३० वाजेपर्यंत त्यांचें कडून काम करून घेण्यांत येतें.

पानें नीट रीतीनें खुडतां यावींत म्हणून झाडें ३—४ फुटापेक्षां जास्त ऊंच वाढूं देत नाहींत. दर ८-१० दिवसांनीं पानांचा तोडा करितात. फुलांचा बहर येण्याच्या सुमारास ( मार्च ते जून हा मोठा मोसम, आक्टोबर ते नोव्हेंबर हा धाकटा मोसम ) पानें खुडण्याचें काम विशेष जोरानें चालतें. मजूर पानें व कळ्या खुडून त्यांच्या प्रति लावितात. १ पौंड पानें तोडली म्हणजे १ ते २ पै मजूरी मिळते. पूर्वीं मजूरीचें प्रमाण फारच अल्प पडत असे. गेल्या ८-१० वर्षांत सीलोन कौन्सिलनें मजूरीचें कमींत कमी प्रमाण दर महिन्यास १५ रु. असावें असें ठरविलें आहे. या पगारांतून अन्नसामुग्री व कपड्याची किंमत कापून घेण्यांत येते.

कायद्यानें पगाराचें किमानप्रमाण ठरविण्यापूर्वीं मजुरांची फारच हलाखीची स्थिति होती. मजुरांची रहाण्याची सोय चांगली नसणें, अजारी-

पणांत औषधपाण्याची योग्य सोय न होणें वगैरे गोष्टीबद्दल पुष्कळसा गवगवा वर्तमान पत्रांतून होत असे. दोन कुटुंबांतील ९ माणसें एका लहानशा खोलींत कशी कोंबण्यांत आली होती हें दाखविण्याकारितां सीलोन टाइम्स्‌मध्यें मागें एक फोटो प्रसिद्ध करण्यांत आला होता.

चहाची पानें खुडण्याचा ज्यावेळीं मोसम जोरांत नसतो त्यावेळीं झाडांची आळी तयार करणें, रोपें तयार करण्यास जमीन तयार करणें वगैरे कामें मजूरांकडून करून घेण्यांत येतात.

चहाची पानें खुडून तयार झाली म्हणजे प्रथमतः तीं सुकवितात. पानांचे पातळथर तरटावर पसरून ते हवेच्या उष्णतेनें सुमारें २४ तास सुकवितात. हवेंतील उष्णतेनें पानें सुकलीं म्हणजे तीं एका यंत्रांत घालतात. यंत्रामध्यें एक रोलर ( लोखंडी रूळ ) असतो त्यानें पानांतील राहिलेला ओलावा व टॅनिन ( कषायाम्ल ) काढून टाकितात. या यंत्रांतून पानें गुंडाळली जाऊन बाहेर पडतात. हे गोळे पुन्हां दुसऱ्या यंत्रांत घालून पानें वेगळी करतात.

ही क्रिया संपल्यानंतर पानें अंबविण्याची क्रिया सुरू होते. पानांचा पातळ थर पसरून त्यावर ओलें वस्त्र पसरितात. वस्त्राच्या ओलाव्यानें व हवेच्या उष्णतेनें पानें अंबून त्यांस काळा रंग येतो. अशा तऱ्हेनें अंबविलेला चहा ‘ काळा चहा ’ म्हणून विकला जातो व न अंबविलेला चहा हिरवा म्हणून विकला जातो.

अंबविण्याची क्रिया झाल्यावर पानांतील उरलेला ओलसरपणा काढून टाकण्यास सुरुवात केली जाते. लहान लहान परळांत पानें भरून त्यांस १८ फॅ. डिग्रीची उष्णता देतात व या उष्णतेनें २० मिनिटांत पानें कोरडी होतात व ठिसूळ आणि काळा चहा तयार होतो. नंतर निरनिराळ्या चाळण्यांतून चहा चाळून घेऊन चहाची प्रतवारी लाविली जाते. पूड ही

अत्यंत कमी दर्जाची असते. नंतर हा चहा डब्यांत किंवा पेट्यांत घालून विक्रीस पाठविला जातो.

सीलोन, आसाम, ब्रह्मदेश वगैरे ठिकाणीं यूरोपियन मळेवाल्यांच्या हातांत चहाचे मळे आहेत. बंगालमधील पुष्कळशा तागाच्या गिरण्याही यूरोपियन लोकांच्या ताब्यांत आहेत. चहा, ताग, मसाले वगैरे पदार्थांचा पौर्वात्य देशांना परमेश्वरानें जणू कांहीं मक्ताच दिलेला आहे. परंतु नवीन प्रदेश आक्रमणकरणें किंवा स्वतःचा मुलूख राखणें या कामीं जसे हिंदी लोक परकीयांच्या पेक्षां नीरस ठरले, त्या प्रमाणें निरनिराळीं व्यापारीक्षेत्रें आपल्या ताब्यांत ठेवण्याच्या कामींहीं नीरस ठरले आहेत. व्यापार ताब्यांत राहण्यास राजकीय सत्तेचें पाठबळ पाहिजे हें निर्विवाद आहे पण लोकांच्या अंगीहीं दूरदृष्टि, धाडस, सतत उद्योग करण्याची शक्ति आणि व्यापारी सचोटी हे गुण अवश्य असावे लागतात.

१ चहाचे मळेवाल्यांना मळ्यांच्या जमीनी पुष्कळदां मोफत किंवा अत्यल्प किंमतीस मिळाल्या.

२ मळ्यावर इमारती बांधण्यास लांकूडफांटा वगैरे सामान स्वस्त दरानें मिळालें.

३ एका विशिष्ट प्रकारच्या पद्धतीमुळे जरूर तितके मजूर नेहमीं काम करण्यास मिळूं लागले व त्यांजकडून ठराविक वेळ ( दररोज ) कांम करून घेतां आले.

४ मजूरीचे दर स्थिर राखतां आले व याचा फायदा मळेवाल्यांस मिळाला.

५ चहाचे मळे कांहीं थोड्या भांडवलवाल्यांच्या हातीं असल्यामुळें ांनां आपल्या मालांच्या किमती आपल्या इच्छेनुरूप ठरवितां आल्या व ामुळें वाटेल तितका नफाही मिळविता आला.

हिंदुस्थानांत मोठ्या प्रमाणावर शेती करावयाची झाल्यास जरूरीच्या वेळीं पुरेसे मजूर मिळणें कठीण पडतें. मजूर मिळालेच तर त्यांनां जबर वेतन द्यावें लागतें व जबर वेतन देऊनही त्यांना वेळेवर कामास हजर राहावयास लावणें व त्यांजकडून पुरेसें काम करून घेणें तर जवळजवळ अशक्यच होतें. गुन्हेगार लोकांच्या लहान लहान वसाहती करून त्यांनां एखाद्या धनिकाच्या शेतीवर कायद्यानें काम करावयास लाविलें तरच मोठ्या भांडवलांवर शेतीकरणें येथें किफाइतशीर होईल.

निसर्गाची व आधुनिक यंत्रसामुग्रीची अनुकूलता, मजुरांचे सांनिध्य, त्यांस द्यावें लागणारें अल्प वेतन अशा कारणसमुच्चयानें चहाचा धंदा या बेटांत फार किफाइतशीर होतो. जगांतील एकंदर चहाच्या निपजी पैकीं $\frac{1}{7}$ पेक्षां जास्त चहा एकट्या सीलोनमध्यें होतो. सीलोनमधील चहांत चिनी चहा पेक्षां टॅनिन जास्त असतें. पत्ती गोळाकरितांनां "कळी व दोहों-बाजूंचीं दोन पानें" निराळीच वेचतात व त्या पासून होणारा चहा सर्वांत उत्तम ( फ्लावरी ) म्हणून गणिला जातो. समुद्रसपाटी पासून चहाच्या मळ्याची उंची जितकी जास्त असेल तितका चहाला स्वाद जास्त असतो. चहाचा स्वाद नेहमीं चहांत असणारा कळीचा भाग व चहाच्या मळ्याची समुद्रसपाटीपासून उंची यांवर अवलंबून असतो.

कारखान्यांत चहा तयार झाल्यावर चहा अंबविण्याची क्रियाबरोबर झाली कीं नाहीं हें पहाण्याकरितां कारखान्याचा सेक्रेटरी प्रत्येक प्रतीच्या चहाचा थोडा चहा घेऊन तो करून पहातो व स्वाद बरोबर उतरला नसल्यास लागलींच कोणती क्रिया बिघडली तें पाहून काढतो व चूक दुरस्त करितो.

१ चहाच्या जातीः—हिरवा चहा रशियन आणि अमेरिकन लोक वापरतात.

अत्यंत कमी दर्जाची असते. नंतर हा चहा डब्यांत किंवा पेट्यांत घालून विक्रीस पाठविला जातो.

सीलोन, आसाम, ब्रह्मदेश वगैरे ठिकाणीं यूरोपियन मळेवाल्यांच्या हातांत चहाचे मळे आहेत. बंगालमधील पुष्कळशा तागाच्या गिरण्याही यूरोपियन लोकांच्या ताब्यांत आहेत. चहा, ताग, मसाले वगैरे पदार्थांचा पौर्वात्य देशांना परमेश्वरानें जणू कांहीं मक्ताच दिलेला आहे. परंतु नवीन प्रदेश आक्रमणकरणें किंवा स्वतःचा मुलूख राखणें या कामीं जसे हिंदी लोक परकीयांच्या पेक्षां नीरस ठरले, त्या प्रमाणें निरनिराळीं व्यापारीक्षेत्रें आपल्या ताब्यांत ठेवण्याच्या कामींहीं नीरस ठरले आहेत. व्यापार ताब्यांत राहण्यास राजकीय सत्तेचें पाठबळ पाहिजे हें निर्विवाद आहे पण लोकांच्या अंगींहीं दूरदृष्टि, धाडस, सतत उद्योग करण्याची शक्ति आणि व्यापारी सचोटी हे गुण अवश्य असावे लागतात.

१ चहाचे मळेवाल्यांना मळ्यांच्या जमीनी पुष्कळदा मोफत किंवा अत्यल्प किंमतीस मिळाल्या.

२ मळ्यावर इमारती बांधण्यास लांकूडफांटा वगैरे सामान स्वस्त दरानें मिळालें.

३ एका विशिष्ठ प्रकारच्या पद्धतीमुळे जरूर तितके मजूर नेहेमीं काम करण्यास मिळूं लागले व त्यांजकडून ठराविक वेळ ( दररोज ) काम करून घेतां आले.

४ मजूरीचे दर स्थिर राखतां आले व याचा फायदा मळेवाल्यांस मिळाला.

५ चहाचे मळे कांहीं थोड्या भांडवलवाल्यांच्या हातीं असल्यामुळें त्यांना आपल्या मालांच्या किमती आपल्या इच्छेनुरूप ठरवितां आल्या व त्यामुळें वाटेल तितका नफाही मिळविता आला.

हिंदुस्थानांत मोठ्या प्रमाणावर शेती करावयाची झाल्यास जरूरीच्या वेळीं पुरेसे मजूर मिळणें कठीण पडतें. मजूर मिळालेच तर त्यांनां जबर वेतन द्यावें लागतें व जबर वेतन देऊनही त्यांना वेळेवर कामास हजर राहावयास लावणें व त्यांजकडून पुरेसें काम करून घेणें तर जवळजवळ अशक्यच होते. गुन्हेगार लोकांच्या लहान लहान वसाहती करून त्यांनां एखाद्या धनिकाच्या शेतीवर कायद्यानें काम करावयास लाविले तरच मोठ्या भांडवलांवर शेतीकरणें येथें किफाइतशीर होईल.

निसर्गाची व आधुनिक यंत्रसामुग्रीची अनुकूलता, मजुरांचे सांनिध्य, त्यांस द्यावें लागणारें अल्प वेतन अशा कारणसमुच्चयानें चहाचा धंदा या बेटांत फार किफाइतशीर होतो. जगांतील एकंदर चहाच्या निपजी पैकीं $\frac{1}{7}$ पेक्षां जास्त चहा एकट्या सीलोनमध्यें होतो. सीलोनमधील चहांत चिनी चहा पेक्षां टॅनिन जास्त असतें. पत्ती गोळाकरितांनां " कळी व दोहोंबाजूंचीं दोन पानें " निराळीच वेचतात व त्या पासून होणारा चहा सर्वांत उत्तम ( फ्लावरी ) म्हणून गणिला जातो. समुद्रसपाटी पासून चहाच्या मळ्याची उंची जितकी जास्त असेल तितका चहाला स्वाद जास्त असतो. चहाचा स्वाद नेहमीं चहांत असणारा कळीचा भाग व चहाच्या मळ्याची समुद्रसपाटीपासून उंची यांवर अवलंबून असतो.

कारखान्यांत चहा तयार झाल्यावर चहा अंबविण्याची क्रियाबरोबर झाली कीं नाहीं हें पहाण्याकरितां कारखान्याचा सेक्रेटरी प्रत्येक प्रतीच्या चहाचा थोडा चहा घेऊन तो करून पहातो व स्वाद बरोबर उतरला नसल्यास लागलींच कोणती क्रिया बिघडली तें पाहून काढतो व चूक दुरुस्त करितो.

१ **चहाच्या जातीः**—हिरवा चहा रशियन आणि अमेरिकन लोक वापरतात.

काळ्याचहांबरोबर हा मिसळतात ( १/८ हिरवा + ७/८ काळा ) व त्यास हायसन, यंगहायसन किंवा गनपावडर असें म्हणतात. हिरवा चहा पंजाबमध्यें बराच होतो.

२ फ्लावरी किंवा ब्रोकन ऑरेंज पिको :—कळी व तिच्या जवळील कोवळी दोन पानें जमाकरून तयार केलेल्या चहास हें नांव आहे.

३ पहिल्या पानाच्या चहास ऑरेंज पिको म्हणतात.

४ दुसऱ्या पानाच्या चहास पिको म्हणतात.

५ जुनाट फांदीच्या पानापासून गेलेल्या चहास पीकोसूचांग म्हणतात. ऑरेंजपिको, पिकोसूचांग हे चिनी शब्द आहेत.

सन १८७३ सालीं सीलोन मधून फक्त २३ पौंड चहा बाहेर पाठविण्यांत आला होता व त्याची किंमत ५८ रु. आली. सांप्रत सुमारें ४७०००० एकरांत चहा पिकविला जातो व एकंदर १२३० चहाचे मळे ( टी इस्टेटस् ) आहेत व त्यांचे दरसालचें उत्पन्न २४,००,००,००० पौंड आहे. यावरून सीलोनमधील चहाची पैदास किती मोठी आहे तें दिसून येईल.

हिंदी चहाला इंग्लंड, फ्रान्स, कानडा व अमेरिका या देशांची मागणी फार मोठी असते. सीलोनच्या चहाला आस्ट्रेलिया व न्यूझीलंड या देशांतून फार मागणी असते. इंग्लंड व अमेरिका येथेंही सीलोन मधून पुष्कळ चहा जातो.

## रबर

सीलोनमध्यें सांप्रत रबराच्या लागवडीखालीं सुमारें ४॥ लक्ष एकर जमीन गुंतलेली आहे. रबराची झाडें ठिकठिकाणीं डोंगराच्या उतरणीवर, दऱ्यांमध्यें, पर्वत शिखरावर चहाच्या मळ्याच्या बाजूला वाढलेलीं दिसतात. जगांत दरसाल ६४० सहस्र टन रबर तयार होतो. त्यापैकीं ब्रिटिश-मलायांत ३०२; डच ईस्टइंडीजमध्यें २३३; सीलोनमध्यें ५७; सहस्र टन

रबर होतो व बाकीचा ४८ सहस्र टन इतर देशांत होतो. यावरून रबराच्या उत्पत्तिमध्यें सीलोनचा जगांत तिसरा नंबर आहे असें दिसून येतें.

आम्ही रबराचा कारखाना पहावयास गेलो होतो तेव्हां, त्या कारखान्यावरील युरोपियन मॅनेजर म्हणाला कीं "कांहीं वर्षांपूर्वी रबराचा व्यापार म्हणजे सोन्याचा प्रत्यक्ष झरा होता. पण आमच्या दुर्दैवानें आतां ते दिवस राहिले नाहींत. पूर्वी अगदीं कच्च्या रबरास दरपौंडी ३ किंवा ३॥ रु. आम्हांस मिळत असत." रबराचें झाड चांगलें वाढलें म्हणजे दरसाल ४० पौंड रबर मिळतो; म्हणजे एका झाडाचें वार्षिक उत्पन्न १२० रुपयांचें झालें. दरसाल १२० रुपये विनासायास मालकास देणारें कोणतेतरी झाड आहे कां याचा ज्याचा त्यानेंच विचार करावा. रबराच्या मळेवाल्यांना याप्रमाणें पूर्वी पैसा मिळाला व ते लक्षाधिपति झाले; रबराच्या मळ्यांचे शेअर्स ज्यांनीं घेतले होते त्यांना "डिव्हिडंडच्या रूपानें" पैसाही अतोनात मिळाला. तेव्हां प्रस्तुतकालीं रबर फार स्वस्त झाल्यामुळें रबराच्या मळे-वाल्यांना फार वाईट वाटत आहे. सीलोनमध्यें झाडांचा रस गोळा-करून तो घट्ट झाल्यावर यंत्रांत घालून पाणी काढून टाकितात व नंतर तो परदेशीं पाठवितात. सीलोनमध्यें रबराचे कोणतेही पदार्थ होत नाहीतसें दिसते. रबराच्या मळ्यांतून काम करणाऱ्या मजूरांत शेंकडा ९५ तामीळ आहेत. रबराची चीक गोळा करण्याची मजूरीच कायते तामीळ व सिंहली लोकांस मिळते.

रबराचे निरनिराळे पदार्थ तयार करण्याचे कारखानेच सीलोनमध्यें फारसे नसल्यामुळें औद्योगिक शिक्षण, उच्चदर्जाचें काम केल्याबद्दलची मजूरी किंवा जबाबदारीची कामें अंगावर घेतल्यामुळें येणारा अनुभव यापैकीं एकही गोष्ट सिंहली किंवा तामीळ लोकांना साध्य करून घेतां येत नाहीं.

अलीकडे सीलोन गव्हरमेंट व डच गव्हरमेंट यांच्यामध्यें रबराची लागवड नियमित करण्याबाबद कांहीं ठराव झाले आहेत. आम्ही सीलोन-

मध्यें गेलो त्यावेळीं बैलगाडीला रबरी चाकें लावून ती चालवून दाखविण्याचा प्रयोग कोलंब्रो येथें करण्याचें घाटत होते. रबराचा इतिहास फारच मनोरंजक आहे म्हणून तो पुढें दिला आहे.

**इतिहास**:—युरोपियन प्रवासी व वसाहतवाले यांना कांगो नदीच्या खोऱ्यांत रबराच्या झाडाची माहिती झाली. झाडाचा चीक काढून त्याचा चेंडू करून खेळावे एवढाच त्यावेळीं रबराचा उपयोग होत असे. रबरावर सुधारलेल्या जगाचें जीवित अवलंबून राहील हें त्यावेळीं कोणाच्या स्वप्नीं तरी आले असेल काय ?

या झाडाच्या सुमारें ६ मुख्य जाति आहेत. त्यापैकीं बकुल कुलांतील झाड एशिया खंडांत विशेष चांगलें वाढतें. सर्व प्रकारची रबराचीं झाडें विषुववृत्तापासून दक्षिण व उत्तर बाजूस १५ ते २० अंशापर्यंत चांगली वाढतात.

एका इंग्लिश प्रवाशानें प्रथमतः कांगोनदीच्या खोऱ्यांतून बरेंचसें बीं इंग्लंडांत नेलें व तेथें नानातऱ्हेचे प्रयोगकरून रबराची लागवड सीलोन बेटांत व त्याच्या जवळील प्रदेशांत चांगली होईल असें ठरविलें. लागलीच इंग्रज व्यापारी रबराचा धंदा करण्यास तयार झाले. १८७६ सालीं सुमारें ७००० रोपें सीलोनच्या किनाऱ्यावर उतरविली व २१ रोपें सिंगापूरकडे नेलीं. या रोपांपैकीं जीं रोपें जगलीं त्यांची संतति म्हणजेच आजच्या रबराच्या बागा होत. सन १८८१ सालीं सीलोन येथें रबर प्रथमतः तयार झालें.

रबराचें बीं एरंडीसारखें असतें, परन्तु आकारानें तें एरंडीच्या २५ पट मोठें असतें. बीं रुझूं घातल्यावर ६ महिन्यांत २।३ फूट उंचीचा रोपा तयार होतो. १॥ वर्षांनंतर हा रोपा उपटून दुसऱ्या जागीं (कायम जागीं) लावण्यांत येतो. ३०।३५ वर्षांनंतर झाडाचा बुंधा सुमारें ५।६ फूट परिघाचा होतो. झाड ५० तें ७५ फूट उंच वाढतें. झाड ५।७ वर्षांचें



सिंहली मुलगा रबर गोळा करितो (पृ. ६६)

जुनें झालें म्हणजे जमीनीपासून २।३ फूट उंचीवर खोडाचीसाल त्रिकोणाकृतींत कापली जाते. कापलेल्या भागांतून रस वाहूं लागतो, तो वाट्यांत धरून जमा करितात. प्रत्येक महिन्याला सुमारें १ इंच साल कापतात. चांगल्या झाडापासून दरसाल ४० पौंड रबर मिळतो.

रस उष्णतेनें घट्ट होऊं नये, म्हणून थंडीच्या वेळीं रस गोळा करण्याचें काम चालतें. रस गोळाकेल्यानंतर त्यांत किंचित् ॲसॅटिक ॲसिड मिश्र करितात व रसांत असलेला केरकचरा व सालींचे तुकडे काढून टाकितात. नंतर तो रस परळांत ओतून ते परळ पाण्यांत २४ तास ठेवितात. असें केलें म्हणजे रबर घट्ट होतो. पुढें यंत्रानें तो दाबितात व या योगें त्यांत असलेलें सर्व पाणी निघून जातें. यापुढें एका खोलींत रबराच्या वड्या शिड्यांवर ओळीनें ठेवतात व तेथें धूर सोडून सर्व दारें बंद करितात. या क्रियेनें रबरास काळसर रंग येतो.

गंधकाच्या संयोगानें रबरास काठिन्य येतें. प्रथमतः गंधकाच्या संयोगानें रबर कठीण करून त्याच्या 'धांवा' उपयोगांत आणित असत. पुढें " डनलाप " नांवाच्या गृहस्थानें रबराच्या ' पोकळ धांवा ' करण्याची युक्ति काढली. एबोनाइट हा पदार्थ रासायनिक पद्धतीनें रबरापासूनच तयार करितात. कार्यपरत्वें रबराच्या ठिकाणीं निरनिराळे गुण असावे लागतात व ते गुण प्राप्त होण्यास कराव्या लागणाऱ्या क्रियाही पुष्कळच आहेत.

रबराचें झाड हें आधुनिक जगांतील कल्पवृक्ष आहे. हा कल्पवृक्ष पाश्चात्यधानिकांनीं मोठ्या काळजीनें वाढविलेला आहे व त्याच्या संवर्धनास लागणारा भूपृष्ठ—विषुव वृत्तावरील प्रदेश—आपल्या ताब्यांत ठेविला आहे; हा कल्पवृक्षही पाश्चात्यलक्ष्मीपुत्रांना अनेक प्रकारच्या सुखांची प्राप्ति करून देत आहे.

रबराचे नानाविध उपयोग शब्दानें वर्णन करणें अशक्य आहे.

मोटारी, व सायकली यांच्यामुळें हिंदुस्थानांतील किती तरी संपत्ति खराचे मळेवाल्यांच्या घरीं जाऊन बसत आहे. प्रत्येक मोठ्यागांवीं टांग्याला खराची धांव लागल्यामुळें हिंदुस्थानची संपत्ति कशी धांव घेत परदेशीं चालली आहे याचा प्रत्येकानें विचार केला पाहिजे. खरी जोडे हातांत घेऊन विलासी श्रीमंतांचीं, आणि नौकरींतच आपले आयुष्य खर्च करणाऱ्या सुशिक्षांतांची डोकीं पाश्चात्यधानिक व शास्त्रज्ञ झोडपीत आहेत. हिंदुस्थानांतील लक्ष्मी खरीचाकांच्या रथांत बसून परदेशीं पळून जात असल्यानें कोणताच ध्वनि उत्पन्न होत नाहीं, म्हणून हिंदुस्थानांतील धनिक व सुशिक्षित जागे होत नाहींत असें दिसतें.

जगांत फिरतांनां महत्वाचे पदार्थ कोणते आहेत ते ओळखणें व त्यांचा आपल्या देशाकरितां उपयोग करून देण्याकरितां बुद्धिसर्वस्व चिकाटीनें खर्च करणें हे पुरुषार्थाचें एक प्रमुख लक्षण आहे.

## सिंकोना.

सीलोन मध्यें सिंकोनाची लागवड बरीच आहे व सिंकोनापासून क्विनीन काढण्याचे कारखानेही आहेत. क्विनीन कसें काढतात तें पहावें असा आमचा बेत ठरलेला होता. परन्तु उटकमंड येथें क्विनीनचा कारखाना असल्यामुळें उटकमंडला गेल्यानंतर क्विनीनबद्दलचा माहिती मिळवावी ह्मणून आह्मी सीलोनमध्यें कारखान्यांत गेलों नाहीं. उटकमंडवरून म्हैसोरला जातांनां वाटेंत आह्माला कारखाना लागला; तेव्हां सडकेच्या कडेला मोटारी उभ्या करून मी व श्री. वाघ असे दोघेजण कारखान्यांत गेलों व तेथें एका आफिसरला भेटून कारखाना दाखविण्याबद्दल विनंति केली. आफिसरनें विचारलें कीं, "क्विनीन कसें तयार करितात हें पहाण्यांत तुमचा काय हेतु आहे?" मी म्हणालों "आह्मी शास्त्रज्ञ नाहीं पण जिज्ञासु आहोंत, आह्मांस असें वाटते कीं, कारखाना पाहिल्यानें आमच्या ज्ञानांत थोडी भर पडेल." नंतर आफिसर पुन्हां ह्मणाल

"क्विनीन काढण्याची पद्धति गुप्त राखण्यांत येत आहे तुम्हांस माहीती देतां येणार नाहीं". यावर मीं चट्दिशीं उत्तर दिलें कीं, " तुह्मी पाश्चात्य लोकांनीं आह्मां ब्राह्मणांना, व्याख्यानांतून किंवा तुह्मी लिहिलेल्या पुस्तकांतून "ब्राह्मणांनीं आपली विद्या गुप्त राखिली इतर जातींना अज्ञानांतच ठेविलें" असा अनेकवार दोष दिला आहे. आह्मीं ब्राह्मणांनीं प्राचीनकाळीं जी चूक केली तीच चूक आज विसाव्या शतकांत तुह्मी करित आहां. आज तर कोणतेंही ज्ञान गुप्त राखूं नये असें सर्वत्र सांगण्यांत येतें." माझें उत्तर ऐकून तो आफिसर जरा गोंधळला व ह्मणाला "त्यांत काय आहे? डच लोकही आपली कृति गुप्त राखीत नाहींत कां? जावामध्येंही डच लोक आपल्या कारखान्यांतील पद्धति कोणास कळूं देत नाहींत." मी ह्मणालों "याचा अर्थच असा कीं, ज्ञान गुप्त ठेवण्याचें जें पातक ब्राह्मणांनीं केलें तेंच पातक डच लोक जावाबेटांत करितात व डच लोक जें पाप करितात तें आपण करण्यास हरकत नाहीं असा तुमचा समज आहे." याप्रमाणें मी वाद घालूं लागतांच तो गृहस्थ पुन्हां गोंधळला आणि त्यानें माझ्या मुद्यास पूर्णपणें बगल मारून उत्तर दिलें कीं, "माझा वरिष्ठ अधिकारी जंगल पहाणीस गेलेला आहे, त्याचे परवानगीशिवाय मला कारखाना दाखवितां येत नाहीं." हें उत्तर मिळाल्यावर आह्मींही मुकाट्यानें परत फिरलों.

सीलोनमध्यें सिंकोनाची लागवड केव्हांपासून झाली व क्विनिनचा प्रसार कसा झाला, क्विनीनमुळें नवीन प्रदेश आक्रमण करणें कसें सुलभ झालें इत्यादि गोष्टी माहीत असणें जरूर आहे ह्मणून सिंकोनाचा इतिहास पुढें थोडक्यांत दिला आहे.

पेरू प्रांतांतील लोकांना सिंकोनाच्या झाडाच्या सालीचें चूर्ण घेतल्यानें ताप थांबतो ही गोष्ट माहीत होती. एकदां पेरूच्या गव्हर्नराची बायको काउंटेस सिंकान ही तापानें अजारी पडली. युरोपियन डाक्टरांनीं तिला बरें करण्याचें नानाविध प्रयत्न केले परन्तु त्यांस यश आलें नाहीं. त्यावेळीं

तद्देशीय रानटी लोकांनीं या झाडाच्या सालीचें चूर्ण देऊन तिला बरें केले. यावरून काउंटेस सिंकानच्या नांवानें या झाडाची 'सिंकोना' ह्मणून प्रसिद्धि झाली.

या झाडाची प्रसिद्धि झाल्याबरोबर जेसुइट पंथाच्या परिव्राटांनीं ही साल यूरोपमध्यें पाठविण्याचा धडाका सुरू केला. शास्त्रज्ञांनीं आतांपर्यंत या झाडाच्या ३६ जाती शोधून काढिल्या आहेत त्या पैकीं सध्यां फक्त १२।१३ जातींचाच क्विनीनची पैदास करण्यास उपयोग केला जातो.

विषुववृत्ताजवळील १५ ते २० अंशापर्यंतच्या पर्वतश्रेणीमध्यें या झाडाची लागवड चांगली होते. समुद्र सपाटीपासून सुमारें ५ ते ८ हजार उंचीवर हीं झाडें चांगली वाढतात व कांहीं झाडें ११००० फूट उंचीवर चांगली वाढतात. हें झाड ८० फूट उंच वाढतें. पानें नेहमीं हिरवीगार असतात. फुलांचा रंग पांढरा, किंचित् गुलाबी छटा असलेला असतो. फळ अंडाकृति असून बिया चापट असतात.

या झाडाचा शोध लागल्यावर लोक रानांत जाऊन झाडें तोडीत व साल बाजारांत विकीत. यामुळें झाडांचा निष्कारण संहार होऊं लागला. अशा तऱ्हेनें झाडांचा संहार होऊं नये, अल्प किंमतींत साल मिळावी, सालीचा पुरवठा सतत करितां यावा ह्मणून १८४९ मध्यें अल्जेरियांत प्रथमत: झाडांची लागवड केली, पण तो प्रयत्न अपयशी ठरला. नंतर डच लोकांनीं जावा बेटांत लागवड केली व तेथून आज जगाला लागणाऱ्या क्विनीनचा निम्यापेक्षां जास्त पुरवठा होतो. जावा बेटांत साखर पुष्कळ होते. तोंड कडू झाल्यास साखर खावी, साखरेनें तोंडास मिठी बसल्यास क्विनीनची पूड तोंडांत टाकावी.

१८६० सालीं या झाडाची लागवड हिमालयाच्या उतरणीवर व निलगिरीवर करण्यांत आली व नंतर सीलोनमध्यें लागवड केली. झाड

तोडून त्यांची साल विकण्याचें बंद झाल्यावर दोन तीन वर्षांच्या जुन्या फांद्या तोडून त्यांतून क्विनीन काढण्यांत येऊं लागले. सांप्रत झाड थोडें जून झाल्यावर तोडतात, मग बुंधापासून नवीन धुमारे फुटतात. झाड तोडल्यावर बुंधावर एक प्रकारची शेवाळी बांधून ठेवितात, यामुळें सालीची वाढ चांगली होते व तींत औषधीचें प्रमाणही वाढतें.

जावा व सीलोन येथील जाति भिन्न आहेत. दोन्हींतही शेंकडा ६ प्रमाणें अल्कली सांपडते. परन्तु जावामधील जातींत क्विनीनचें प्रमाण ३·५ असतें तर सीलोनमधील जातींत हें प्रमाण १·५ असतें. एकाच जातीच्या साली निरनिराळ्याकाळीं ( भिन्न ऋतूंत ), व भिन्न स्थलीं घेतल्या तर त्यांतील औषधी प्रमाण भिन्न पडतें; असें आढळून आलें आहें. कांहीं सालींत हें प्रमाण शेंकडा १३ सांपडतें तर कांहीं सालींत औषधी गुण कांहींच असत नाहीं. आजपर्यंत या बाबतींत शास्त्रज्ञांनीं अनेक प्रयोग करून पाहिले आहेत. सालींतून क्विनीन, क्विनिडाइन, सिंकोनीन व सिंकोनिडीन असे चार पदार्थ सांपडतात. क्विनिडाइन हें क्विनीन पेक्षां जास्त जोरदार असें ज्वरघ्न औषध आहे. पण हें फार अल्प प्रमाणांत सांपडतें. क्विनीन ही कडू औषधींची राणी आहे व आधुनिक पाश्चात्य वैद्यांचें हातांतील तीव्र शस्त्र आहें. डाक्टरच्या हातांतील क्विनीन काढून घेतलें तर त्याचा निमा धंदा बसेल असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

१८२० सालीं क्विनीन प्रथमतः काढण्यांत आलें व मुंबई सरकारनें तें १ पौंडास १८ पौंड १० शि. ८ पेन्स या दरानें विकत घेतलें. क्विनीन त्यावेळीं फार महाग असें. क्विनीनची पैदास मोठ्या प्रमाणावर करण्याचें १८६१ सालीं ठरलें व तो प्रयत्न १८७४ च्या सुमारास यशस्वी झाला.

सन १९२२ मध्यें कुलंपुरच्या क्विनीनच्या कारखान्यावरील मुख्य डॉक्टर 'फ्लेचर' यांजकडे लंडन मधील हॉवर्ड आणि कंपनीनें अशी तक्रार

केली कीं, कारखान्यांतून येणारें औषध एकसारखें असत नाहीं व त्याचे रासायनिक घटकही अस्थिर असतात. या तक्रारी नंतर जावामधील अधिकाऱ्यांनीं क्विनीन अमुक एकाच तऱ्हेचें असले पाहिजे असें कायद्यानें ठरविलें आहे.

क्विनीन ही एका तऱ्हेनें अमृतवल्ली आहे. पाश्चात्यांनां ही अमृतवल्ली प्राप्त झाल्यावर अनेक देश पादाक्रांत करितां आले व अनेक ठिकाणची व्यापारी केंद्रें हस्तगत करितां आली. आफ्रिकेच्या कांगो व नाइल नद्यांच्या खोऱ्यांत कित्येक ठिकाणीं इतके डांस असतात कीं, डासांच्या थव्यानें एक प्रकारचा काळोख पडतो असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. या डांसांमुळें त्याप्रदेशांत जाऊन रहाणें अशक्य होई. परन्तु क्विनीनचा शोध लागल्यावर अशा प्रदेशांत जाऊन तेथील संपत्ति हस्तगत करणें व आपलें अधिराज्य स्थापन करणें हें पाश्चात्यांस सुगम झालें. क्विनीनच्या जोरावरच आसाममध्यें चहाची लागवड वाढवून अपार संपत्ति मिळवितां आली.

हिंदुस्थानामध्यें " सप्तपर्णी " हे क्विनीनच्या तोडीचें ज्वरघ्न औषध आहे; परन्तु धनिकांच्या व शास्त्रज्ञांच्या सहकार्याच्या अभावीं तें तसेंच डोंगरावर तिष्ठत राहिलें आहे. शार्ङ्गधारानें अमुक औषधांत १ तोळा गुळवेल घालावी असें सांगितले आहे म्हणूनच "कोकणी आणि खानदेशी" गुळवेल असा भेद करण्यास जे वैद्य लोक तयार नाहींत त्यानीं क्विनीनच्या इतिहावरून योग्य तो बोध घ्यावा.

परम्याःकरितां चंदनी तेल वापरण्याची पद्धति हिंदुस्थान व चीन या देशांत २००० वर्षांपासून सुरू आहे. पाश्चात्य लोक त्याचा ३०–४० वर्षांपासून उपयोग करूं लागले असें असतां आज फ्रान्स मधून " सॅडलमिडि " या नांवानें तें हिंदुस्थानांत कां व किती येतें याचाही प्रत्येकानें विचार करावा.

## कोका

सन १८७० पासून कोकाची झाडें सीलोन मधील चहाच्या मळ्यांत लावण्यास सुरवात झाली. हें झाड मूळ पेरु देशांतलें असून दक्षिण अमेरिकेंत याची लागवड बरीच आहे. या झाडापासून कोकेन काढितात व कोकेनचा शोध लागल्यावर यूरोपची कोकेनची मागणी येऊं लागली.

सीलोन, निलगिरीची उत्तरण, आसाम, हिमालयाच्या २००० फूट उंची पर्यंतचा कांहीं भाग व मद्रास इलाख्याचा कांहीं भाग येथें हीं झाडें वाढतात. या झाडांना धुक्याची फार भीति असते. जमीन कसदार व ओलसर ( पाऊस जास्त पडतो असा प्रदेश ) या झाडाच्या वाढीस असावी लागते. खत घालणें जरूर असतें. हें झाड ६ ते ८ फूट उंच असून अगदीं हिरवेगार असतें. झाडाला फुलांचे सुंदर झुपके येतात. झाडाचें पान खाल्लें असतां भूक कमी होऊन नवचैतन्य प्राप्त झाल्यासारखें वाटतें.

हिंदुस्थान सरकारनें या झाडाची माहीती अमेरिकेंतून आणविली. रोपें लावल्यापासून १६ महिन्यांनीं पानें तोडावयास सुरवात करितात. झाडें सुमारें ४० वर्षें टिकतात. पानें जून होऊन कडक झाली म्हणजे तोडतात व ती निर्वात ( एअर टाइट ) डब्यांत भरून यूरोपला पाठवितात, व तेथें त्यांतील अल्कलाइड व क्षार काढितात.

या झाडाच्या ५।६ जाती आहेत. कांहीं जातींच्या झाडापासून काढलेल्या कोकेनचें स्फटिकीभवन होत नाहीं. कोकेनच्या उत्पत्तिवर व व्यापारावर सरकारचें नियंत्रण आहें. कोकेनच्या शोधापासून शस्त्रवैद्यकाला फारच मदत झाली. सीलोनच्या पिकांपैकीं कोका हें एक महत्वाचें पीक आहें.

## सुपारी

सुपारी ही फार प्राचीन काळापासून हिंदुस्थानांत प्रसिद्ध आहे. सोप्पु-पान व अरिक-झाड या दोन कानडी शब्दापासून सुपारी हा शब्द झालेला आहे

हें झाड समुद्रापासून दूरच्या प्रदेशांत होत नाहीं. पिवळट तांबड्या व खोल पण चिकण नसणाऱ्या जमीनींत हीं झाडें चांगली वाढतात.

रोपें लावल्यापासून पांचव्या वर्षी पीक येतें. एका एकरांत सुमारें ८०० झाडें लावतात व दर झाडास सुमारें ३०० सुपारी येते. सुपारी पिकण्याचा हंगाम नोव्हेंबर तें जानेवारी पर्यंत असतो. सुपाऱ्या उतरल्यावर त्या पाण्यांत शिजवितात व पाणी तांबडेलाल होतें. अति जुन्या किंवा कोवळ्या सुपारीस रंग येण्याकरितां त्यांनां या लाल पाण्यांत शिजवून रंग देतात. सुपारी शिजवून जो अर्क निघतो तो घट्ट केला म्हणजे सुपारीचा कात होतो. कातडें रंगविण्यास या काताचा उपयोग होतो.

सीलोनमध्यें सुपारीची लागवड फार मोठ्या प्रमाणांत होते. लोकांच्या घराच्या आवारांतही सुपारीची झाडें आहेत. सुपारीच्या बागांमधून मिरे व नागवेल ( पानें ) यांचे वेल, वेलदोडे व अननस लावितात. अननस सीलोनमध्यें फार पिकतो. जुन्या जखमा भरून येण्याकरितां कोवळ्या सुपारीची पूड वापरण्याची चाल सीलोनमध्यें फार आहे.

मलबार, म्हैसूर, कारवार, गोवा, बंगाल, मद्रास इलाख्यांतील पूर्वकिनाऱ्या जवळील कांहीं भाग इत्यादि ठिकाणीं सुपारी फार पिकते तथापि हिंदुस्थानांत सुपारीचा खप फारच मोठा असल्यामुळें सुमारें १ कोटि रुपयाची सुपारी चीन, मलाया, सीलोन, स्ट्रेटसेटलमेंट व सुमात्रा इत्यादि ठिकाणाहून येते.

## कॉफी.

कॉफी हें सीलोनमधील एक महत्वाचें पीक होतें, परन्तु सांप्रत तेथें कॉफी थोडी पिकते. कॉफी हें झाड आफ्रिकेच्या उष्ण ( विषुववृत्ताजवळील ) प्रदेशांत समुद्रसपाटी पासून १।२ हजार फूट उंचीवर नैसर्गिक स्थितींत सांपडतें. तेथून त्यांची लागवड ॲबिसीनियांत झाली. नंतर त्याचा प्रसार अरबस्थानांत झाला. १६५० च्या सुमारास बाबाबुडन नांवाच्या

फकीरानें तें हैसोर प्रांतीं नेलें असें ह्मणतात.

१६९० मध्यें डच लोकांनीं सीलोनमध्यें प्रथमतः पद्धतशीर कॉफीची लागवड केली. ज्या ठिकाणीं हवा सर्द व गरम असते व वार्षिक पर्जन्य-मान सरासरी १०० इंच असतें तेथें कॉफी चांगली पिकतें. एका एकरांत सरासरी ४०० झाडें लागतात. अलीकडे सर्व जगभर संकर जातींचीं कॉफी लावण्याकडे प्रवृत्ति वाढत आहे. संकर जातींत रोगांची भीति कमी असते. लिबेरियन नांवाची जातें अशी आहे कीं तिच्या पासून नियमित आणि पुष्कळ उत्पन्न येतें.

सांप्रत हिंदुस्थानांत २ लक्ष एकरापेक्षां जास्त क्षेत्रांत कॉफी पिकते. म्हैसोरमध्यें यापैकीं निमे क्षेत्र असून मद्रास इलाखंत $\frac{1}{4}$ क्षेत्र आहे. पूर्वी हिंदुस्थानांतून ४ ते ५ कोटि पौंड कॉफी परदेशी जात असे. परन्तु अली-कडे * ब्राझील देशानें बहुतेक कॉफीचा व्यापार हस्तगत केलेला आहे. इतर व्यापाराप्रमाणें काफीच्या व्यापारालाही दिवसें दिवस ओहोटी लागलेली आहे.

काफीच्या झाडावर रोग आल्यापासून म्हणजे १८८७ साला पासून सीलोनमधील काफीची लागवड बंद झाल्यासारखीच आहे. सांप्रत तेथें फारच थोडे मळे आहेत.

## दालचिनी

दालचिनी ही सीलोनला ईश्वराकडून मिळलेली एक देणगी आहे. दालचिनीचें झाड मोठें असतें. सरासरी उंची २५।३० फूट असून बुंध्याचा

---

टीप :—जगांत दरसाल ३७५० दशलक्ष पौंड काफी पिकते, एकट्या ब्राझील देशांत २३८१ दशलक्ष पौंड काफी होते. कोलं-बियामध्यें ३३६ द. लक्ष पौंड व डच ईस्टइंडीजमध्यें २४७ द. लक्ष पौंड काफीचें पीक येते बाकी राहिलेले ७८६ द. लक्ष पौंडाचें पीक जगाच्या निरनिराळ्या भागांत होतें.

घेर सुमारें ८।१० फूट असतो. हें झाड वाढण्यास व उत्तम प्रतीची दालचिनी तयार होण्यास रेताड जमीन लागते.

पाश्चात्य लोक पूर्वेकडे आल्यावर त्यांचें लक्ष्य दालचिनीकडे गेलें व दालचिनीचा व्यापार आपल्या ताब्यांत राखण्याकरितां व ज्या प्रदेशांत दालचिनी पिकते तो प्रदेश ताब्यांत ठेवण्याकरितां त्यांनीं आटोकाट प्रयत्न केले एवढेंच नव्हे तर अनेक युद्धेंही केली. डच लोकांनीं हा व्यापार अनेक दिवस आपल्या ताब्यांत ठेविला व व्यापारांत मक्तेबाजी करून अचाट संपत्ति मिळविली. जर एखाद्या माणसानें झाडाची फांदी तोडली तर त्या माणसाचा हात तोडून टाकीत, प्रसंग विशेषीं या पेक्षांही कडक शिक्षा होई. डच लोक झाडांची काळजी फारच घेत असत.

सीलोन खेरीज दुसऱ्या फारच थोड्या ठिकाणीं दालचिनी पिकते. आजपर्यंत सीलोनच्या तोडीची दालचिनी पिकविण्याचा प्रयत्न झाला पण त्यांत फारसें यश अद्याप तरी आलेलें नाहीं. झाडें मोठी झाली म्हणजे त्यांच्या फांद्या तोडून साल काढितात. सालीवरील निरुपयोगी भाग खरडून ती वाळवितात व बाजारांत विकावयास पाठवितात.

कासिया नांवाचें झाड दालचिनीच्या वर्गांतीलच आहे व या झाडाची साल दालचिनींत भेसळ म्हणून घालतात. कासियाची भेसळ केली आहे कीं काय हें आयोडीच्या साह्यानें समजतें. खरोखर पाहिले तर सध्यां जगाला जितकी दालचिनी लागते तितकी ती पिकत नाहीं परन्तु वर सांगितलेल्या भेसळीमुळें पुरवठा कमी आहे ही गोष्ट सहजासहजीं समजून येत नाहीं.

## कोको

कोकोचें झाड चहाचें झाडापेक्षां जास्त सुंदर असतें. याची लागवड नारळांच्या बागांमधून असते. झाड हिरवेगार दिसतें व सुमारें ७।८ फूट वाढतें. झाड लावल्यापासून सहा सात वर्षांनीं त्याला फळें येतात व त्यांचा




चहाच्या मळ्यांत काम करणारी मुलगी (पृ. ५८)




(पृ. ७६)

रंग नारिंगी असतो. फळांत सुमारें ३०।३५ बिया असतात. फळें वेचल्यावर ती पानाखालीं थोडी अंबवितात नंतर स्वच्छ धुवून उन्हांत वाळवितात. पुढें फळें फोडून कोकोच्या बिया इंग्लंडांत पाठवितात. बिया पासून एक प्रकारचे स्वादिष्ट तेल निघतें त्यास 'कोको बटर' कोकोचें लोणी असें म्हणतात. तें तोंडांत चटकन् विरघळतें. कोकोची पूड चाकोलेट करण्याकरितां उपयोगांत आणितात. मलबारमध्यें व निलगिरीवर कोकोची लागवड केलेली आहे परंतु हिंदुस्थानांत हें झाड चांगलें वाढत नाहीं.

## वेलदोडे

वेलदोड्याचे पीक हिंदुस्थानांतील उत्तर कारवार, मलबार, कुर्ग निलगिरीवर कुन्नुरच्या जवळील टेकड्यांतलि खोरी, म्हैसार प्रांतांत हसन तालुक्यांतील कांहीं भाग, सीलोन व ब्रह्मदेश येथें होते. या पिकास सर्द-जमीन व थंड हवा पाहिजे असते. तसेंच दऱ्यांमधील निवाऱ्याची जागा पिकास चांगली मानवते.

वेलदोड्याच्या दोन जाती आहेत. मलबारी जातीचा वेलदोडा लहान असतो, म्हैसुरी जातीचा मोठा असतो. मुळांचे तुकडे लावून नवीन रोपें करितात. कधीं कधीं ८ फूट लांब व ४ फूट रुंद अशा वाफ्यांत २ तोळे बी पेरून रोपें करितात व या वाफ्यांतील रोपें १ एकरास पुरे होतात. रोपें कायम जागीं लावण्यापूर्वी दोन वेळां त्यांचें स्थलांतर करावें लागतें. दर एकरीं सुमारें ४०० झाडें लागतात. झाडाच्या बुंधाशीं फुलें येऊन वेलदोडे लागतात. ते एकदम सर्व तयार होत नाहींत. सर्व पीक निघण्यास सुमारें ३ महिने लागतात, एक एकरीं १५० ते २५० पौंड उत्पन्न होतें.

सीलोनमध्यें ६००० एकर जमीनींत वेलदोडे होतात व ते हिंदुस्थानांत येतात व खपतात. हिंदुस्थानांतील माल पुष्कळसा बेल्जम, फ्रान्स इंग्लंड व अमेरिका इकडे जातो. वेलदोड्यांचा खप सर्वांत जास्त फक्त

हिंदुस्थानांतच होते. सीलोन मधील चांगले मोठाले वेलदोडे आम्हीं खाऊन पाहिले पण त्यांना शिरसीच्या वेलदोड्या सारखा स्वाद नव्हता. तेथें स्वादिष्ट वेलदोडे फारसे होत नाहींत असें आम्हांस कांहीं लोकांनीं सांगितलें. वेलदोड्याचें झाड सरासरी ३।४ फूट उंच होतें. पानें लांब (केतकी प्रमाणें) असतात व झाडाला पांढरी घोंसदार फुलें येतात. फुलांना वास असत नाहीं.

हिंदुस्थानांत पुष्कळ ठिकाणीं वेलदोड्याची लागवड वाढविणें शक्य आहे व एखादी मोठी कंपनी काढून चीन, जपान, आफ्रिका व अमेरिका इत्यादि राष्ट्रांत खप वाढवून पुष्कळ नफा मिळविणेंही शक्य आहे.

## पामयरा ताड

हें ताडाच्या जातीचें झाड आहे व याची लागवड उत्तरेकडील प्रदेशांत म्हणजे जाफनाकडे विशेष आहे. कांहीं झाडांना पुष्कळच पानें असतात तर कांहींना फक्त शेंड्याला पानांचा गुच्छ असतो.

पानांचा उपयोग घरें शेकारण्याकरितां होतो, तसेंच त्या पासून चटया टोपल्या, छत्र्या, पंखे करितात. पानांचे खतही चांगलें होतें. या ताडपत्रांचा लेखनाचें कामींहीं उपयोग होतो.

याला मोठाली व स्वादिष्ट फळें येतात. फळें पिकली म्हणजे जंगलांतून रानटी हत्ती जाफनाकडे येतात कारण हत्तींनां हीं फळें फार आवडतात. फळांतील बियांचा उपयोग कढीकरितां होतो, तसेंच त्यांचें पीठ करूनही खातां येते. फळांतील रसापासून ताडी व एक प्रकारचा गूळ करितात.

तामील लोक याचे ८०१ प्रकारचे उपयोग आहेत असें म्हणून त्याची स्तुति करितात तर हिंदुलोक त्यास कल्पवृक्ष मानतात. याचें लाकूड फार कठीण असतें व खुर्च्या, कपाटे, इत्यादि सामान करण्यास उपयोगी पडतें. तामील लोक असें म्हणतात कीं हें झाड लावल्याबर एक लक्ष

वर्षें टिकतें व झाड तोडल्यावर लांकूड एक लक्ष वर्षें टिकतें. या लौकिक समजुतीवरून हें झाड फार टिकाऊ आहें ही गोष्ट मात्र मनावर पूर्णपणें बिंबते.

## सिट्रोनेला

हें एक प्रकारचें गवत आहें. मातरा गांवाजवळ हें पुष्कळ पिकतें लांबून याचा लिंबा ( कागदी लिंबू ) सारखा वास येतो. याचें तेल काढण्याच्या येथें पुष्कळ भट्या आहेत. तेल उर्ध्वपातनानें काढतात. याचा उपयोग सुगंधी तेलें व अत्तरें करण्याकरितां होतो.

## शेतकी

अलीकडे सीलोनमध्यें कापराच्या झाडाच्या लागवडीस सुरवात झालेली आहे. प्रस्तुतकालीं कापराची पैदास जपानच्या साम्राज्यांतच होते. सीलोनमध्यें कापूर पुष्कळ उत्पन्न होऊं शकेल व असें झालें तर त्याचा परिणाम जपानवर झाल्याशिवाय राहणार नाहीं.

जायफळाची झाडें ही थोडीशी आहेत. चांगले झाड असल्यास २ ते २॥ हजार जायफळें येतात. लवंगाची झाडें ही तुरळक आहेत पण यांची संख्या थोडी आहे.

अननसाची लागवड पुष्कळच आहे. हिंदुस्थानांत शेताच्या कडेला जसें घायपताचे कुंपण असतें त्याप्रमाणें सीलोनमध्यें अननसाचें कुंपण असतें.

भाकरीचा वृक्ष (Bread Friut Tree) एक मोठा वृक्ष आहे त्याला मोठाली फळें येतात. आम्ही सीलोनमध्यें होतो तेव्हां या झाडावर लहान लहान फळें सर्वत्र लागलेली होती.

या शिवाय थोडा कापूस व तंबाखु ही पिकेंही येथें होतात. सुपारीचे उत्पन्नही मोठे आहे.

नारळ, भात, तंबाखु, कोको वगैरे पिकांच्या जमीनी सामान्यत: सिलोनी लोकांच्या ताब्यांत आहेत. रबर व चहा ही पिकें सामान्यत: पाश्चात्यांच्या ताब्यांत आहेत.


तांदुळाची लागवड सामान्यत: नारळांच्या बागांच्या मधून असते. म्हणजे दोन्ही बाजूस प्रचंड बागा असून मधून एक पट्टी तांदुळाच्या लागवडी खालीं असते. सीलोनमध्यें बोंटकीं (सामान्यत: बाटोळी) अशीं तांदुळाची जात आहे. तांदूळ चवीस बरा परंतु शिजविल्यानंतर राठ होणारा असा आहे.

तंबाखूच्या जातींत सुधारणा करण्याचें प्रयत्न चालू आहेत असें दिसते. सिंगापूर कडील नारळाची ठेंगणी जातही अलीकडे बऱ्याच मोठ्या प्रमाणांत लाविलेली आहे.

आतांपर्यंत दिलेल्या माहीतीवरून सीलोनच्या शेतीच्या उत्पनांत किती विविधता आहे, रबर, चहा, क्विनीन, कोकेन वगैरे पदार्थांच्या विपुलतेमुळें सीलोनचें व्यापारी दृष्टीनें काय महत्व आहे व ब्रिटिश साम्राज्याचा एक घटक ह्मणून सीलोनचें काय महत्व आहे हें वाचकांस सहज समजेल असें वाटतें.

सीलोनचा निर्गत व्यापारही फार मोठा आहे. उदाहरणार्थ एथून दरसाल २६२५००० मण चहा (४० शेरांचा); ८६३८०० मण खोबरेल; २५५४६२५ मण रबर, १६१००००० मण खोबरे परदेशीं पाठविले जाते.

गहूं, तांदुळ, बाजरी वगैरे धान्यें पिकविणाऱ्या शेतकऱ्यांस भयंकर धडाओढ करावी लागते कारण ही धान्यें अनेक ठिकाणीं पिकतात. तसेंच एखादेंवर्षी पीक अवर्षणानें बुडालें म्हणजे त्या शेतकऱ्यांची आतिशय तारांबळ होते. परन्तु चहा, खोबरें व रबर यांची निपजकरणारांनां धंद्यांत एक प्रकारची मक्तेबाजी आहे. श्रम कमी असतात व पीक बुडण्याचें भय फारच अल्प असतें.



भाताचें शेत (पृ. ८०)

## हत्ती.

सीलोनच्या नैसर्गिक संपत्तिमध्यें हत्तीची गणना करावयास कांहींच हरकत नाहीं. प्राचीन काळीं हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व राजे हत्तींचा लढायांमध्यें उपयोग करीत. अलेक्झांडरच्या स्वारीपासून झालेल्या अनेक लढायांत, हिंदू राजांच्या सैन्यांत शेंकडो हत्ती असल्याची वर्णनें आहेत. हिंदुस्थानांत अनेक ठिकाणीं हत्ती सांपडत तरी सीलोनमधून हत्ती व हस्तिदंत यांची मोठी आयात हिंदुस्थानांत होत असे. विजापुरचे राजे गोवें बंदरामार्फत सीलोनशीं व्यापार करीत व तेथून एका गलबतांत १४ ते १६ हत्ती आणीत असत. विजापुरचे महंमदशहानें सीलोन मधून 'प्रभावती' नांवाच्या एका बाईस आणून तिला रक्षा म्हणून ठेविले होते, महंमदशहाचे वेळीं विजापुरीं शेंकडो हत्ती असत. तेथील दरबारचें वर्णन श्री. सरदेसाई यांनीं पुढीलप्रमाणें दिलें आहे. "ह्याच्यापुढें (सुल्तान महमद) नवरत्नखचित शिरपेंच लटकलेलें हजारो मानकरी आणि बडे लोक लीनतेनें उभे असत. रत्नभूषणांनीं शृंगारिलेलें शेंकडो हत्ती सज्ज असत. हा नुसता शहरांत फिरावयास गेला तरी ह्याजवर लोक सोन्यारुप्यांचीं फुलें उधळीत. ह्याच्या जिलिबीच्या हजारों घोड्यांच्या जिनांस हिरे, मोत्यें, पांच, माणकें वगैरे लटकलेलीं असत." विजयनगरच्या साम्राज्याचीही अशाचि वर्णनें वाचावयास सांपडतात.

प्रस्तुतकालीं कण्हेरीची फुलेंसुद्धां दुर्मीळ झालेली आहेत त्यामुळें प्राचीन काळची वर्णनें अतिशयोक्तीची असावीत असें पुष्कळांस वाटते. पण दक्षिणहिंदुस्थानांत पूर्वीं हत्ती अतिशय असत, तसेंच सोन्याच्या व रत्नांच्या खाणीही पुष्कळ असत. शिवाय सीलोनमधून अनेक हत्तींची व रत्नांची आयात हिंदुस्थानांत होत असे.

असो, आजही सीलोनमध्यें शंभर शंभर हत्तींचे कळप अरण्यांत फिरतात. आगगाडीच्या रुळावर कित्येक वेळां हे येतात व गाडीजवळ आली

तरी लवकर बाजूला हालत नाहींत. कोलंबोहून कँडीस जातानां आम्हांस वाटेंत अनेक हत्ती दिसले. हे हत्ती तेथील लोकांनीं कामाकरितां पाळलेले होते. महाराष्ट्रांत बैल सर्वत्र आहे. तेव्हां "बैलाचा गाडा" किंवा "लांकडी बैल" हें लहान मुलांचे सर्व सामान्य खेळणें झाले आहे. त्याप्रमाणें लांकडी हत्ती हें सीलोन मधील लहान मुलांचे खेळणें आहें. कोलंबो येथें अनेक दुकानांतून लहान मोठे हत्ती विक्रीस ठेविलेलें आढळतात.

व्हेलखेरीज इतर सर्व प्राण्यांपेक्षां हत्ती मोठा असतो. पूर्ण वाढ झालेल्या हत्तीचें वजन ६॥ टन म्हणजे १८२ मण असतें. सीलोन मधील हत्ती १० फूट उंच असतो. आफ्रिकन हत्ती १४ फूट उंच असतो. सीलोनमध्यें नराला मात्र सुळे असतात. आफ्रिकेंत नर आणि मादी या दोहोंसही सुळे असतात. सुळ्यांसच हस्तिदंत म्हणतात. हत्तीचे इतर दांत किंवा हाडें यांचा हस्तिदंतांत समावेश होत नाहीं. सीलोनमधील हस्तिदंत जुना झाला म्हणजे पिवळा होतो, आफ्रिकन हस्तिदन्ताचा रंग वापरानें बदलत नाहीं. अद्यापही सीलोनधून हस्तिदंताची बरीच निर्गत होते परन्तु त्याला पूर्वी इतका भाव येत नाहीं. याचें कारण असें कीं, प्रस्तुतकाळीं, सैबेरियांतून हस्तिदंताचा फार मोठा पुरवठा होतो. प्राचीनकाळीं सैबेरियांत फार मोठाली अरण्यें होतीं व त्यांत मोठाले हत्तींचे व हत्तीच्या जातींच्या प्राण्यांचे कळप होते. पुढें जेव्हां भूपृष्ठांत भूकंपादिकांनीं बदल झाला त्यावेळीं अरण्यें व त्यांतील हत्तींचे कळपही जमीनींत गाडले गेले-सध्यां या गाडलेल्या हत्तींचे दांत उकरून काढून बाजारांत विक्रीस पाठविले जातात. हस्तिदंताचा खपही फारच मोठा आहे. शेफील्ड येथील चाकू कात्र्याच्या एका कारखान्यांत दरसाल ४६००० हजार हस्तिदंताच्या जोड्या शस्त्रांच्या मुठी करितां खपतात. चांगल्या जोडीचें वजन सुमारें १४० पौंड म्हणजे ७० शेर भरते. १८७४ सालीं १८८ पौंडाचा एकच दांत लंडन येथें विकला होता.

हत्तीला उन्हाचा ताप सहन होत नाहीं म्हणून थंड वेळींच हत्तींचें कळप अरण्यांतून भटकतात. हत्तीला गोडफळें व गूळ फार आवडतो. पायमारा ताडाची फळें पिकलीं म्हणजे जाफनाकडे हत्तींचें कळप जातात हें मागें सांगितलेंच आहे. हत्तीला पोहोण्याची आवड फार; त्यामुळें सीलोनमध्यें तलावांत किंवा नद्यांत रानटी हत्ती पोहोण्यास आलेले दृष्टीस पडतात. हत्ती पाण्यांत तासचे तास पोहतो. सन १९०५ सालीं बंकिया नांवाचा बडोद्याचा हत्ती एका तळ्यांत ३६ तास पोहोंत होता. रानटी हत्तीमध्यें भयंकर युद्धें होतात, व त्यावेळीं तें सोंडेनें एकमेकांस जोरानें रट्टे मारतात, कित्येकदां हें युद्ध दोन दोन दिवस चालते व त्यांत त्यांचे सुळे मोडून पडतात. हत्ती बलाढ्य असून भित्रा आहे, कित्येकदा रानडुकरांना सुद्धां भिऊन पळून जातो. हत्तींचें घ्राणेंद्रिय इतकें तीक्ष्ण असतें कीं, ३ मैलावरून त्यास आपल्या शत्रूचा वास येतो. हत्तीण २४ महिन्यांनीं विते. हत्तीची आयुर्मर्यादा १२५ ते १५० वर्षांची आहे.

सीलोनमध्यें हत्ती चाललेले असतांना शिकारीलोक मागून मोठाले दोर त्यांच्या मागील पायांत टाकून त्यांना अडकवितात व पकडतात. पाळीव हत्तींचाही रानटी हत्ती पकडण्याच्याकामीं उपयोग करितात. कित्येकदां अरण्यांत मोठाले खड्डे करून ते पानपाचोळ्यांनीं झांकून टाकतात व त्यावरून जातांना हत्ती आंत पडले म्हणजे त्यांना पकडतात.

बडोद्यास पहिल्या प्रतीच्या हत्तीस पुढील प्रमाणें खाणें देतात.

| | | | |
|---|---|---|---|
| गव्हाचे पीठ | ५० पौंड | मीठ | ·॥· पौंड |
| तूप | ३॥· ,, | मसाला | १ ,, |
| गूळ | ३॥· ,, | गवत | ३०० ,, |

यावरून हत्तीला दररोज ५ मणापेक्षां जास्त खावयास लागते असें दिसून येईल. जंगलांत रानटी हत्तींचें कळप फिरतांना, दररोज प्रत्येक हत्ती ७।८ मण वजनाचें गवत खाऊन फस्त करतो व पायाखालीं किती तुडवितो व वाटेंत किती झाडें सोंडेंत धरून मोडून टाकतो याची तर गणतीच

नाहीं. तेव्हां सीलोनमध्यें ज्या भागांत शंभर शंभर हत्तींचे कळप फिरतात तेथील अरण्यें किती दाट असतील याची कल्पना हत्तीच्या आहारावरून सहज येईल.

## मोतीं.

सीलोनच्या वायव्य दिशेस किनाऱ्यांपासून सुमारें २० मैलांवर मोतीं सांपडतात. या ठिकाणीं अगदीं प्रथमतः मोतीं केव्हां काढण्यांत आले तें इतिहासाभावीं सांगणें कठीण आहे. उत्तरहिंदुस्थानांतून राजपुत्र विजय इ. सनापूर्वी ५४३ सालीं सीलोनमध्यें गेला. सीलोनमध्यें गेल्या-नंतर त्यानें आपल्या सासऱ्यास सुमारें दोन लक्ष किंमतीचें मोतीं व शंख पाठविले होते असा उल्लेख आहे. यावरून इ. स. पूर्वी कित्येक वर्षांपासून सीलोन हें मोत्याकरितां प्रसिद्ध होतें असें दिसतें. सन १९०६ सालीं लंडन मधील एका कंपनीला सीलोनमध्यें मोतीं काढण्याचा मक्ता मिळाला. पण पुढें कित्येक वर्षेंपर्यंत मोत्यांच्या कालवांनीं मोतीं तयारच केलें नाहींत. सन १९०६ पासून १९२४ पर्यंत मोतीं करणारे कालव कोठें गेले होते कीं काय कोण जाणें. सन १९२४ नंतर पुन्हां मोतीं काढण्याचें काम सुरू झालें. सध्यां मोती काढण्याचें ठिकाण (फिशरी) डॉ. पिअरसन "डिरेक्टर आफ कोलंबो म्यूझियम अँड मराइन बॉयालाजिस्ट" यांच्या ताब्यांत आहे. किनाऱ्या-जवळ मोत्याच्या व्यापारामुळें 'मरिचचुकडी' नांवाचें मोठें गांवच वसलें आहे.

प्राचीन काळीं सीलोन व इराणचें आखात येथूनच मुख्यतः सर्व जगास मोत्यांचा पुरवठा होत असे. रोमन आणि ग्रीक साम्राज्याचे भर-भराटींत अनेक पाश्चात्य व्यापारी मोत्यांकरितां हिंदुस्थानांत येत व मोतीं घेऊन जात. टालेमीची बायको, प्रख्यात विलासी राणी "क्लिओपाट्रा" एका सुंदर जहाजांत बसून अँटनीला भेटावयास सिसिली येथें गेली होती, त्यावेळीं तिच्या कर्णभूषणांत अत्यंत मौल्यवान् व तेजस्वी अशी मोतीं होती ती

हिंदुस्थनांतूनच नेलेलीं होतीं.

सीलोनमध्यें खलाशी लोक बरीच रात्र असतांना आपल्या होड्या घेऊन निघतात व सूर्योदयाचें वेळीं, समुद्रांत बुड्या मारून शिंपले गोळा करूं लागतात. पानबुडे नाकांत पाणी जाऊं नये ह्मणून नाकाला कांहीं तरी पदार्थ बांधतांत, तळाशीं लवकर जावे म्हणून एखादा दगडही बरोबर घेतात. समुद्राच्या तळाशीं गेल्यावर जेवढे शिंपले गोळा करवतील तेवढे गोळा केल्यानंतर दम निघेनासा झाला म्हणजे आपल्या कमरेस असलेल्या दोरास हिसका देतात व ही खूण मिळतांच बोटीवरील लोक पाणबुड्यास वर काढून घेतात. याप्रमाणें दुपार पर्यंत काम चालते. नंतर बोटी किनाऱ्यास येतात व शिपल्यांची निवड करून ते शिंपले मोतीं काढण्याकरितां कारागिराकडे दिले जातात. शिंपल्यांतून मोतीं काढण्यास फार कुशलता लागते. जरा धक्का लागला कीं, मोतीं बिघडते. मोतीं बाहेर काढल्यानंतर आकारमान व तेज यावरून मोत्यांचें वर्गीकरण करितात. सीलोनमध्यें मोतीं काढण्याच्या कामास मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यांत सुरवात होते व हें काम सुमारें दीड महिना चालतें. या दीड दोन महिन्याच्या अवधींत अनेक व्यापारी सीलोनमध्यें जातात व मोत्यांचा व्यापार करितात.

मोतीं तयार करणाऱ्या प्राण्यांना कालव असें म्हणतात. या प्राण्यांच्या शरिरांतून एक प्रकारचा रस बाहेर पडतो किंवा त्यांना तो रस बाहेर टाकतां येतो. कालव शिंपल्यांत असतांना जर एखादा प्राणी त्यांत शिरला किंवा एखादा वाळूचा बारीक कण आंत आला तर त्या प्राण्यावर किंवा कणावर आपल्या अंगांतून निघणाऱ्या रसाचा लेप देण्यास कालव सुरवात करितो व एकामागून एक दिलेल्या लेपांना घट्टपणा आला म्हणजे मोतीं तयार होतें. कांद्यांत जसे एकावर एक पापुद्रे असतात तसे खऱ्या मोत्यांत एकावर एक असे पातळ थर असतात. कल्चर्ड मोतीं एकाच

दाट थराचें बनलेलें असतें. शिंपल्यांतून मोतीं बाहेर काढल्यावर बारीक सामत्यानें त्यास भोंक पाडतात. सीलोनच्या किनाऱ्याजवळ असें आढळून आलें आहें कीं, मोतीं करणारे कालव आपलें स्थान सोडून जातात. डच लोकांच्या ताब्यांत हें बेट असतांना एकदां २७ वर्षें पर्यंत तेथील कालव नाहींसे झाले होते. कालव सरासरी पांच वर्षांचा झाला म्हणजे मोतीं तयार करितो.


हिंदुस्थानांत कराचीं जवळही थोडी मोतीं सांपडतात. इराणचें आखात, आफ्रिकेचा किनारा, कॅलिफोर्नियाचें आखात, पनामाचा उपसागर, आस्ट्रेलियाचा किनारा इत्यादि अनेक ठिकाणीं मोतीं सांपडते. चीनमध्यें कांहीं नद्यांतही मोतीं सांपडतें. अर्वाचीन काळीं, शास्त्रीय शोधांमुळें समुद्र तळाशीं गेल्यावर तेथें बराच वेळ काम करितां यावें व जलचर प्राण्यांमुळें त्रास होऊं नये याकरितां लागणाऱ्या अनेक साधनांची जोड पानबुड्यास देतां येते.

कालव पाळून त्याच्याकडून मोतीं तयार करवून घेण्याचें काम चिनी-लोक १३ व्या शतकांत करीत असत व हें काम मोठाल्या नद्यांतून चालें. चिनीलोक बुद्धाची लहानशी प्रतिमा शिंपल्यांत घालीत व पुढें या प्रतिमेवर मौक्तिक रसाचे थर बसले म्हणजे "बुद्धाची मूर्ति आंत असलेलें मोती" तयार होई. अशा मोत्याला किंमतही फार येई. जॅक्विन् नांवाच्या युरोपियन गृहस्थानें १६८० च्या सुमारास अशीच मोती प्रथमतः यूरोपमध्यें बनविली होती. इताली व जर्मनी येथें हा व्यापार कमी अधिक प्रमाणानें चाले. अलीकडे जपानीं शास्त्रज्ञांनीं या कलेचा उत्तम अभ्यास करून अतीशय मोठ्या प्रमाणावर मोत्यांची पैदास केली आहे व हिंदुस्थानच्या सर्व लहान मोठ्या शहरांतून तीं मोती " कलचर्ड पर्ल्स " म्हणून विकलीं जातात. व अशा तऱ्हेनें दरसाल कोट्यवधि रुपये हिंदुस्थानांतून परदेशीं जातात.

वेस्ट इंडीज जवळ कांहीं शंखांत गुलाबी रंगाची मोतीं सांपडतात.



पॅराडेनिया बागेंतील एक दृश्य (पृ. ११८)



मोतीं काढणें (पृ. ८७)

कृष्णवर्णाचीही मोतीं क्वचित् सांपडतात. जगांत सर्वांत मोठें मोती ३ औंस म्हणजे ७॥ तोळे वजनाचें आहे. त्याचा परीघ ४॥ इंच आहे. तें प्रस्तुत काळीं अल्बर्ट म्यूझियममध्यें आहें.

बाजारांत मोत्यांची किंमत चवावर सांगतात पण पुष्कळांस चव कसे काढितात तें माहीत नसते.

मोत्यांचें चव ठरविण्याकरितां प्रथम मोती वजन करितात. वजन करितांना रति (१ रति=३ ग्रेन) हें माप घेतात. मोती किती रति आहेत हें समजलें म्हणजे पुढील रीतीनें चव काढितात.

$$\frac{\text{रति}^{२} \times ५५}{९६ \times \text{मोत्यांची संख्या}}$$ = घेतलेल्या मोत्यांचें चव. उदाहरणार्थ ६ मोत्यांचें १० रति वजन भरलें तर

$$\frac{१०^{२} \times ५५}{९६ \times ६} = १३\frac{७५}{१४४}$$ चव होतात. एका चवाचें १०० दोकडे व एका दोकड्याचे १६ बदाम असें मानतात. चवांचा हिशेब लवकर करितां यावा ह्मणून चव दाखविणारें पुस्तकच व्यापारी लोकांजवळ असतें.

ब्राह्मण हे विद्यादेवीचें उपाक समजले जातात. त्यांच्या धर्मग्रंथांत म्हणजे वेदांत "सर्वाः समृद्धयः सुवर्णेऽस्मिन् समाश्रिता :" सर्व प्रकारच्या सिद्धि सुवर्णांत आहेत ह्मणून सुवर्णधारण व संचय कर असें सांगितलेलें असतांना ब्राम्हणांनीं धनार्जनाकरितां दीर्घ परिश्रम केलें किंवा करावीलें असें दिसत नाहीं. स्वाति नक्षत्राच्या पावसाच्या पाण्याचे थेंब शिंपल्यांत पडले ह्मणजे मोतीं होतें अशी समजूत अगदीं थोड्या वर्षांपूर्वी कितीतरी ब्राह्मणांची होती. ब्राह्मणांची विज्ञानशास्त्रांत एवढी प्रगति मग इतर जातीबद्दल तर बोलावयासच नको. आय. सी. एस. ची परीक्षा पास होणें हें संपत्ति मिळविण्याचें प्रमुख साधन आहे व सायंकाळीं ६ वाजतां लांडा पंचा नेसणें, दिव्याच्या वाती

बारीक करणें, स्नानास ऊनपाणी थोडें घेणें हे धन संचयाचे मार्ग आहेत या दृढ समजुतीनें वागणारे ब्राह्मण आजही थोडे थोडके आहेत असें नाहीं. यामुळें सीलोन सारख्या लहान बेटांत अक्षय्य वहाणारे संपत्तिचे झरे किती मोठाले आहेत व त्यांचा उपभोग इतरलोक कसा घेत आहेत याची कल्पनाही भारतीयांस येत नाहीं.

मोत्याचे शिपले गुंड्याकरितां, शोभेकरितां व हिंदुस्थानांत शौक्तिक भस्माकरितां तर यूरोपमध्यें कल्केरियाकार्ब या औषधांकरितां सीलोनहून निर्गत होतात. सीलोनच्या किनाऱ्या जवळ नाना प्रकारचे शंख सांपडतात. हिंदुस्थानांत शंखाची कोणत्याही तऱ्हेनें वाण नसतांना या देशांत शंखांची आयात होते. शंख कलकत्त्याकडून साफसूफ होऊन पुन्हां विक्री करितां रामेश्वरीं येतात. रामेश्वराचे देवळांत शंख व कवड्या विकत्या मुसलमानांची अनेक दुकानें आहेत. कुंकू हिंदूस्त्रियांनीं लावावे, व तें मुसलमानांनीं विकावे तद्वत् शंखाची पूजा हिंदूंनीं करावी व शंखाचा व्यापार करून मुसलमानांनीं नफा मिळवावा ही गोष्ट रामेश्वरीं स्पष्टपणें कळते. उत्तम शंखास किंमतही पुष्कळच पडते, चांगल्या दक्षिणावर्त शंखास चारशें ते पांचशें रुपये पडतात.

## रत्नें

प्राचीन काळीं दक्षिणहिंदुस्थानांत रत्नांच्या खाणी पुष्कळच होत्या व तेथूनच हिऱ्यांचा पुरवठा सर्व जगास होई. या खाणींचा मक्ता दिलेला असे व २५ कॅरटपेक्षां जास्त वजनाचे हिरे राजास द्यावे लागत. चंद्रगिरीच्या राजाजवळ १६१४ च्या सुमारास हिऱ्यांनीं भरलेल्या तीन मोठाल्या पेट्या होत्या.

पृथ्वीचा जो भाग अत्यंत प्राचनि असेल त्याठिकाणीं रत्नांच्या खाणी असतात व ज्या ठिकाणीं भूकंपानें नवीन पर्वत उत्पन्न झाले असतील त्या ठिकाणीं तेल आणि कोळसा सांपडतो असा भूगर्भशास्त्राचा नियम आहे.

आफ्रिकेचा दक्षिण भाग व हिंदुस्थान आणि हिंदुस्थान व आस्ट्रेलिया ही एकमेकांस जोडलेली होती; त्यांमध्यें समुद्र नव्हता असा शास्त्रज्ञांचा तर्क आहे.

सन १६५० च्या सुमारास हैदराबाद (निजाम) हें हिरेमाणकांच्या व्यापाराचें आदिस्थान होतें. सर्व पृथ्वीवर एवढा रत्नांचा व्यापार कोठेंही नव्हता. मीरजुम्ला नांवाचा एक सामान्य मुसलमान गृहस्थ १६३० मध्यें हिंदुस्थानांत आला आणि रत्नांचा व्यापार करूं लागला. या व्यापारांत त्याला अतोनात नफा झाला. पुढें त्याला गोवळकोंड्याच्या बादशहानें आपला प्रधान नेमिले. त्यानंतर मिरजुम्लानें अनेक मोठमोठीं देवालयें लुटून रत्नें व सुवर्ण यांचा संचय केला. शिवाय हिऱ्याच्या व सोन्याच्या नवीन खाणी शोधून व जुन्यांमध्यें नवीन काम करवून त्यानें अपरंपार संपत्ति मिळविली. गोवळकोंड्याच्या खाणी म्हणून ज्या खाणी होत्या त्या कृष्णा नदीच्या काठीं कर्नूल व अनंतपूर या प्रांतांत होत्या व मुख्यतः वज्रकरूर येथें त्या विशेष चांगल्या होत्या. रामरायाच्या (विजयनगरचा राजा) खास घोड्याचा तुरा हिरे व मोत्यें यांचा होता व त्यांत कोंबडीच्या अंड्याएवढा एक हिरा होता. कोहिनूर १६५६ सालीं कृष्णेच्या कांठीं कोलूर येथें सांपडला. त्यावेळीं त्याचें वजन ७५६ कॅरट होतें. हिरे, मोत्यें, पांचू, माणकें वगैरे दक्षिणहिंदुस्थानांत अतोनात असत. विजयनगरच्या साम्राज्यांत जे जे प्रवासी येऊन गेले ते ते ही संपत्ति पाहून आश्चर्यचकित झाले व त्यांनीं लिहून ठेविलेल्या हकीकतींत रत्नांचीं पुष्कळ वर्णनें आलीं आहेत.

१००८–१००९ मध्यें महमदानें नगरकोट येथील स्वारींत २० मण वजनाचे मोत्यें व हिरे नेले व १३१० मध्यें अल्लाउदीन यानें रामेश्वरावर स्वारी करून ६१२ हत्ती २०००० घोडे ९६००० मण सोनें व हजारो मोत्यें व हिरे नेले. विजयानगरच्या लुटींत तर सोनें व रत्नें किती परकीयांच्या हातीं पडलीं असतील याची गणतीच नाहीं. या शहराची

लूट ५ महिने चालली होती. दक्षिण हिंदुस्थान हा रत्नांनीं, मोत्यांनीं व सुवर्णांनी खचून भरलेला मुलूख पण तेथील अनेक लोकांनां केवळ सारभाता करितां मळेवाल्यांची गुलामगिरी पत्करावी लागली आहे, व याचें कारण एकच कीं या लोकांनीं बलोपासना केली नाहीं.

असो दक्षिण हिंदुस्थानाप्रमाणेंच सीलोन हें अत्यंत प्राचीन असल्यामुळें या बेटांत रत्नपुरच्या जवळ शेंकडो लहान मोठ्या खाणी आहेत; त्यांत हिरे, माणकें, पांच, गोमेद इत्यादि नाना तऱ्हेचीं रत्नें सांपडतात. सॅफायर नांवाचें रत्न विशेषतः फार सांपडतें. याचा रंग शुभ्र, पिवळा, हिरवा व गुलाबी असतो. पिवळ्या खड्याच्या किमती सामान्य माणसाला परवडण्याइतक्या कमी असतात. माणिक अगदीं रक्तासारखें लाल असतें. अलीकडे सीलोनमध्यें माणिक कमी सापडूं लागलें असून गेल्या ५।६ वर्षांत पूर्वीं पेक्षां जास्त सुंदर आणि किंमतवान असें सॅफायर फार सांपडतें. स्टार सॅफायर म्हणून जी जात आहे त्या जातीच्या खड्यावर ताऱ्याची आकृति दिसते. १९०७ सालीं जगांतील अत्यंत मोठा असा ४६६ कॅरट वजनाचा सॅफायर (कापून पैलू पाडल्यानंतरचें वजन) सांपडला. नीळ नांवाचें सीलोनी रत्न फारच सुंदर असतें व त्याला अमेरिकेंतून फार मागणी येते.

कृष्णानदीच्या मुखाजवळील प्रदेश व सीलोन येथूनच पूर्वीं सर्व जगास हिरे पुरविले जात असत. परंतु १७२५ मध्यें ब्राझील देशांत रत्नांच्या खाणी सांपडल्या आणि सांप्रत डयुटोइटस् पान, डी. बेअर्स, किंबर्ले, वेसल्टन, न्यू प्रिमियर या खाणींतून हिरे काढण्याचें काम चालू आहे. लंडन सिंडिकेट नांवाच्या संस्थेनें सर्वजगांतील खाणींत सापडणारे हिरे खरेदी करण्याचा मक्ताच घेतला आहे. यामुळें वाटेलत्या व्यापाऱ्याला हिऱ्याच्या खरेदीविक्रींत लुडबुड करितां येत नाहीं.

हिरे खाणींतून काढल्यावर त्यांनां तेज असें फारच कमी असतें. रत्नांना पैलू पाडून साफ केले ह्मणजे प्रकाशाचें वक्रीभवनानें हिऱ्याचें तेज वाढतें. हिरा कापणें व पैलू पाडणें हें अत्यंत कुशलतेचें काम आहें. अँटवर्प व ॲमस्टरडॅम या ठिकाणीं उत्तम पैलू पाडणारे कुशल कारागिर आहेत व त्यांचे * मोठाले कारखाने आहेत. हे कारखानदार लोकही हिऱ्यांच्या निगतीवर नियंत्रण ठेवितात.

अलीकडे "परफेक्ट कट" ह्मणून ज्या पद्धतीस नांव दिलें आहें त्या पद्धतीनें हिरा कापला ह्मणजे त्याला वरच्या बाजूस ३३ व खालीं २५ असे एकंदर ५८ पृष्ठभाग (Facets) असतात. रत्नाच्या मध्यास कैवरस् म्हणतात. रत्नाची उंची, पृष्ठभाग वगैरेचें एकमेकांशीं असणारें प्रमाण ठरलेलें असतें.

सीलोनमध्यें गेल्यावर ज्याला रत्नाची पारख नाहीं अशा माणसानें रत्नें खरेदी करूं नयेत कारण अनेक लोक खोटे खडे विकीत असतात. रत्नें घ्यावयाचीच झाल्यास चांगल्या कंपनीकडे तरी जावे. एन्. गोपाळदास अँड को. नांवाच्या कंपनीचीं दुकानें त्रिचनापाल्लि, तंजावर वगैरे ठिकाणीं आहेत, तेथें चांगला माल मिळतो. तसेंच कोलंबो येथें कॉटेज इंडस्ट्रीज सोसायटि लिमिटेड, मकन मार्कर वगैरे प्रसिद्ध दुकानें आहेत. सीलोनमधून हिंदुस्थानांत रत्नें आणावयाची झाल्यास शेंकडा ३० जकात पडते.

---

* हिंदुस्थानांत दरसाल एक दशलक्ष पौंड किंमतीचीं आफ्रिकन रत्नें येतात. आफ्रिकेंतून हीं रत्नें अँटवर्पला जातात व तेथून हिंदुस्थानांत येतात. या द्राविडी व्यापारी पद्धतीनें जकात, व्याज व इन्शुअरन्स यापायीं हिंदुस्थानचें बरेंच मोठें नुकसान होतें. शिवाय पैलू पाडण्याची कारागिरी शिकण्याचा तरुणांचा मार्गही बंद झाला आहे.

सध्यां उत्तम आफ्रिकन हिऱ्याचा भाव २५० ते ३०० रु. कॅरट असा आहे*

अमेरिकेंत न्यूयार्क शहरीं म्यूझियम मध्यें ४००० निरनिराळ्या जातींचीं रत्नें एकत्र ठेविलेलीं आहेत. त्यापैकीं एका रत्नावर कुराणांतील २००० शब्द असलेला एक सुरा लिहिलेला आहे. या समूहांत हिंदतारा ( Star oi India ) नांवाचें सीलोनी रत्न ५४३ कॅरट (९ तोळे) वजनाचें आहें. दुसरें एक सीलोनमधील रत्न आहें त्याचें वजन ६१५ कॅरट आहे. आजपर्यंत जीं रत्नें पृथ्वीच्या उदरांतून मनुष्याच्या हातीं लागलीं, त्यापैकीं आफ्रिकेंतील न्यू प्रिमियर खाणींत सांपडलेलें क्युलियन रत्न सर्वांत मोठें होतें. हें रत्न खाणींत सांपडलें त्यावेळीं त्याचें वजन ३०२५·७५ कॅरट ह्मणजे ५० तोळे होतें. तें रत्न ट्रान्सवाल सरकारनें १० लाख डालर्सला विकत घेऊन १९०७ सालीं मरहूम सातवे एडवर्ड बादशाह यांस नजर केलें.

ढेकणाच्या रक्तानें हिरा भंगत नाहीं. हिरकणी हें विष नाहीं. हिरकणी खाऊन आत्महत्या केली, अशा ज्या गोष्टी आपण वाचतो त्यावर विश्वास ठेवूं नये. एखाद्या खड्याला तीव्र धार असली तर तो आतड्यांतून

---

* अलीकडे विशेषतः जर्मनींतून कृत्रिम रत्नें फार येतात. त्यांची परीक्षा करितांनां हुषार जव्हेरीही फसण्याचा संभव आहे. हिरा पारखण्याच्या मुख्य रीति पुढें दिल्याप्रमाणें आहेत. (१) खऱ्या हिऱ्यास कानशीनें घासल्यास त्यावर खांच पडत नाहीं. (२) तोंडानें फुंकर घातल्यास आलेला ओलसरपणा खोट्या हिऱ्यावरील लवकर नाहींसा होत नाहीं, खऱ्या हिऱ्यावरील ओलावा ताबडतोब नाहींसा होतो. (३) एका बशींत पाणी घेऊन खरा हिरा आंत टाकिला तर त्याचें तेज कमी होत नाहीं. खोट्या हिऱ्याचें तेज कमी होतें. (४) खऱ्या हिऱ्यावर पाण्याचा लहान बिंदु टाकून त्याला सुईनें स्पर्श केला तर त्या बिंदूचा वर्तुळाकार मोडत नाहीं परंतु खोट्या किंवा कृत्रिम हिऱ्यावरील जलबिंदु पसरतो.

जातांना इजा करील एवढेंच. हिंदुस्थानांतून निरनिराळ्या वेळीं इतकी रत्नें व मोत्यें हिंदुस्थानांतून परक्या लोकांनीं लुटून नेलीं आहेत कीं त्यांचा इतिहास अत्यंत मवाळ अशा हिंदी तरुणास संतप्त करील असा आहे.

## ग्रॅफाइट किंवा प्लंबॅगो.

परमेश्वरानें सीलोनला ज्या अत्यंत मूल्यवान् देणग्या दिल्या आहेत त्यापैकीं प्लंबॅगो धातू ही होय. प्लंबॅगोपासून शिस्पेन्सिली करतात. प्लंबॅगो व शिसें यांचा अर्थाअर्थी कांहींएक संबंध नाहीं. सीलोनमध्यें १५० पेक्षां जास्त प्लंबॅगोच्या खाणी आहेत. सीलोनमधील ग्रॅफाइट इतकें उत्तम व शुद्ध ग्रॅफाइट जगांत कोठेंच सांपडत नाहीं.

इलीझाबेद राणीच्या वेळीं यूरोपमध्यें प्रथमतः ग्रॅफाइट उपयोगांत आलें आणि ग्रॅफाइटची पहिली खाण कंबरलंड येथें सांपडली; व १६६३ च्या सुमारास या धातूपासून पेन्सिली होऊं लागल्या. यंत्राचे निरनिराळें भाग अत्यंत मऊ राखून त्यांमधील यांत्रिक घर्षण (Mechanical Friction.) कमी करणें या धातूनें सुलभ झाल्यामुळें यंत्रशास्त्रांत एक प्रकारची क्रांति झाली आहे.

हिंदुस्थानांत त्रावणकोर, तिनेवेल्ली, विजगापट्टम्, कृष्णा व गोदावरी यांच्या कांठचा प्रदेश येथें ग्रॅफाइट सांपडतें. ज्या धंद्यांत ग्रॅफाइटचा उपयोग होतो त्या धंद्याबद्दल हिंदुस्थानांत अज्ञान असल्यामुळें हिंदुस्थानाला या संपत्तीचा उपयोग करून घेतां आला नाहीं. कोरियामध्यें ग्रॅफाइट सांपडतें, परन्तु तें अशुद्ध असतें; यामुळें जपानची फार मोठी मागणी सीलोनला पुरवावी लागत असे. परन्तु अलीकडे जगांतील भिन्न भिन्न भागीं नव्या खाणी खणण्याचें काम चालू आहें, शिवाय कृत्रिम ग्रॅफाइटही तयार होऊं लागलें आहें.

कोलंबो येथील म्यूझियममध्यें ग्रॅफाइटचे नमुने ठेविले आहेत. आम्ही

सीलोनमध्यें गेलों, त्यावेळीं ५६ खाणी बंद झाल्याबद्दल व जपानची मागणी कमी झाल्याबद्दल तेथील वर्तमानपत्रांतून चर्चा चाललेली होती. प्लॅंबॅगोच्या खाणी पहावयाच्या असल्यास "मिरिगामाकडे" जावें. कोलंबो ते गॅलीमधील दक्षिण पट्यांतही बऱ्याच खाणी आहेत. कँडी व मस्केलिया भागांतही खाणी आहेत. खडकांमधून ६ ते १२ फूट रुंदीच्या शिरा गेलेल्या सांपडतात. खाणीची खोली ५०० फूटापेक्षां जास्त असत नाहीं. अद्यापपर्यंत जुन्या पद्धतीनें हातांत दिवा घेऊन दोराच्या साह्यानें खालीं उतरून ही धातू काढितात.

## शिकार.

सीलोनमध्यें डोंगराळ व जंगलानें व्यापलेला भाग बराच असल्यामुळें शिकारीची सोय चांगली आहे. नोव्हेंबर ते जूनचे आरंभापर्यंत शोकी लोक शिकारीकरितां येथें जात असतात.

सीलोनमध्यें बंदरावर पाय ठेवतांच जवळ असलेलीं हत्यारें व दारुगोळा कस्टम अधिकाऱ्यांस दाखवावा लागतो, व बंदुक वापरण्याबद्दलची फी भरावी लागते. फीचा आकार बंदुकीची जात व आकार यावरून ठरविलेला आहे. शिकारीच्या परवानगीस परकीयांस ३०० रुपये पडतात. हत्तीची शिकार करण्यास स्पेशल परवाना लागतो.

सीलोनमध्यें रानटी रेडे फार आहेत व ते कधीं कधीं रेल्वे लाइनवरही जाऊन बसतात. गाडी आली तरी दूर न जाण्याइतका उद्दामपणा करून प्राणास मुकतात. तथापि रेड्याची शिकार करण्यास परवानगी मिळत नाहीं. रानडुकर सर्वत्र आहे. तसेंच निरनिराळ्या तऱ्हेचे हरीण व पक्षी हेही पुष्कळच आहेत. शिकारी लोकांचें असें मत आहे कीं, जगांत शिकारीकरितां अत्युत्तम असे जे प्रदेश आहेत त्यांत सीलोन हा एक आहे.

सीलोनमध्यें वाघही आहेत. चांगला वाघ ७ फूट लांबीचा सांपडतो.

व याची वस्ति बहुतेक सर्व पर्वतावर आहे. नद्यांमधून वीस वीस फूट लांबीच्या सुसरी आहेत. मोत्यें सांपडतात तेथील समुद्रभागांत शार्क मासे बरेच आहेत.

दाट जंगलामध्यें हत्तींचे कळप राहातात. कधींकधीं एका कळपांत १०० चे वरही हत्ती असतात. कधींकधीं हे एखाद्या खेड्याजवळ येऊन शेतीचें भयंकर नुकसान करितात. अशावेळीं या कळपांचे मागें लागून कित्येक हत्ती पकडण्यांत येतात. हा हत्ती पकडण्याचा प्रसंग इतका बहारीचा असतो व त्यावेळीं ही गम्मत पहणारांचीही इतकी गर्दी होते कीं, ज्यानें हा रोमांचकारी प्रसंग प्रत्यक्ष डोळ्यानें पाहिला असेल त्याच्या अंतःचक्षूपुढून तो जन्मभर जाणार नाहीं. हत्तींना पकडण्याचा प्रसंग पहाण्यास परवानगी काढावी लागते.

## मजुरांची स्थिति.

पाश्चात्य लोकांनीं आफ्रिका, अमेरिका व भूमध्यसमुद्रांतील बेटें या ठिकाणीं वसाहत करावयास सुरवात केल्यानंतर त्यांनां मजुरांची वाण पडूं लागली. मजूर असल्याशिवाय फॉरेस्ट तोडून जमीनी तयार करणें व शेती करणें अशक्यच होतें.

कांहीं ठिकाणीं हीं कामें प्रथमतः गुलामाकडून करून घेत असत. नंतर हिंदुस्थानसारख्या देशांतून कांहीं मुदतीनें मजूर परदेशीं जाऊं लागले व विशेषतः मॉरिशस, नाताळ, फिजी, कॅनडा इकडे हजारो मजूर दरसाल कामाकरितां बाहेर जातात. या मुदतबंदि पद्धतींत पुढील गोष्टींचा मुख्यतः समावेश होई.

(अ) मुदत संपेपर्यंत मजुराला स्वतंत्रपणें रहातां येत नसे.

(ब) मजूर ही मालकाची मालमत्ता समजली जाई व मालकाची नौकरी करण्यास मजूर बांधलेला असे व त्याचे मजूरीचे दरही ठरलेले असत.

या दोन गोष्टीमुळें गुलामगिरी आणि मुदतबंदी यामध्यें एक प्रकारचें साम्य उत्पन्न झालें आहे. गुलामगिरीचे अनिष्ट परिणाम मुदतबंदी पद्धतीस उत्पन्न होऊं नयेत ह्मणून सरकारनें वेळोवेळीं कायदे केले व अनेक वेळां कमिशनेंही बसविली, तथापि भूतदयेचा पूर्ण अभाव असणारे कित्येक मालक व बेइमानी दलाल यांच्या कारस्थानामुळें अनेक चांगले कायदे पुस्तकांतले पुस्तकांतच राहून मजुरांवर फारच अन्याय होऊं लागला ह्मणून १९१० मध्यें ना. गोखले यांनीं ही पद्धति निदान नाताळपुरती तरी बंद करावी असा ठराव आणिला आणि तो हिंदुस्थानसरकारनें मान्यही केला. त्या-नंतर १९१९ मध्येंही पूर्वीची मुदतबंदी पद्धतिबद्दल निराळीच पद्धति उत्पन्न करण्याकरितां लंडनमध्यें एक कमिटी बसून तिचाही एक रिपोर्ट प्रसिद्ध झाला व तिच्या रिपोर्टांतील कित्येक सूचना मान्य होऊन त्याप्रमाणें मजूरांच्या निर्गतीवर नियंत्रण ठेवण्यांत येऊं लागले तथापि परदेशांतील मजूरांची स्थिति अद्याप बरीच असमाधानकारक आहे. वर्तमानपत्रांतून कित्येकदां मजुरांच्या हीन परिस्थितीचीं वर्णनें येतात, व त्यामुळें सीलोन-मध्यें मजूरांची स्थिति कशी आहे, याबद्दल बऱ्याच लोकांनीं मला प्रश्न विचा-रिले. तेव्हां सीलोनमधील मजूरांबद्दल मला थोडीसी माहीती देणें जरूरच आहे.

हिंदी मजूर आणि त्यांचें परदेशगमन आणि वास्तव्य याबद्दल पुष्कळशा सुशिक्षितांस फारच थोडी माहीती आहे. त्यांनीं मुदतबंदी व बिनमुदतबंदी मजूर परदेशांत कां व कसे जातात व परदेशीं त्यांनां कसें वाग-विण्यांत येतें याबद्दल माहिती जरूर मिळवावी कारण मजुरांचा प्रश्न सध्यांचा राजकारणांत विशेष महत्व पावलेला आहे.

सीलोनमध्यें मद्रास इलाख्यांतूनच विशेषतः मजूर जातात. ते तेथें मुदतबंदी पद्धतीनें जात नाहींत. या मजुरांची लोकसंख्या सुमारे ५।६ लाख असते. मजुरांची भरती करणारे कित्येक लोक मद्रास इलाख्यांत फिरतात व ते नानाप्रकारच्या गोष्टी मजुरांच्या मनांत भरवून त्यांना मळ्यांवर घेऊन



चहाच्या मळ्यांतील काम करणारी मद्रासी स्त्री (पृ. ९६)

जातात. प्रत्येक मजूरामागें मजूरभरत्यास पैसा देऊन मजूरांस सिलोनमध्यें पाठविण्यास मदत केली जाते असें दिसतें. मजूरभरत्यांच्या भलत्या थापांना भुलून कित्येकदां सुशिक्षित लोकही मजुरांमध्यें सांपडतात. सन १९१३ मध्यें एका महाराष्ट्रीय गृहस्थाचें पत्र केसरींत प्रसिद्ध झालें होतें व त्याबद्दल नामदार परांजपे यांनीं मुंबई सरकारास प्रश्नही विचारले होते.

मजुरांच्या सुखसोयीकरितां सीलोन सरकारनें अनेक कायदे केले आहेत. उदाहरणार्थ किमान मजुरीचे दर ठरविले आहेत, मजुरांच्या चाळी कशा असाव्यात याचे नियम ठरविलेले आहेत, मुलांचें शिक्षण, स्त्रियांची प्रसूति, वैद्यकीय मदत, इत्यादि बाबीबद्दल कायदे आहेत परंतु बहुतेक कायदे पुस्तकांतच रहातात आणि मजुरांना अनेक प्रकारें त्रास भोगावा लागतो.

आजारीपणांत औषध मिळत नाहीं. पुरेशी मजूरी पदरांत पडत नाहीं. एवढेंच नव्हे तर कर्ज वाढतच जातें आणि या कर्जामुळें स्वदेशीं परत येता येत नाहीं व मळ्यांतलि जीवन अत्यंत कष्टमय होतें. मजुरांच्या स्थिती-बद्दलची प्रत्यक्ष पहाणी करून अनेक लोकांनीं वरीलप्रमाणें वस्तुस्थितीचें चित्र रेखाटलेलें आहें.

आम्ही सीलोनमध्यें गेल्यानंतर प्रत्यक्ष मजुरांच्या चाळींत जाऊन प्रत्यक्ष स्थिति अवलोकन करणें व ८।१० वर्षांपूर्वी मजुरांची जी स्थिति होती तिच्यांत कांही बदल झाला आहे कीं नाहीं हें पहाणें आम्हांस शक्य नव्हतें; म्हणून जे जे हिंदी व सीलोनी सुविद्य असे लोक भेटले त्यांचेजवळ मजुरांच्या स्थितीबद्दल आम्ही चौकशी केली. चौकशी करितांना बहुतेकांनीं अलीकडे थोडी सुधारणा झाली आहे असें सांगितलें.

सांप्रत व्यापारधंद्यांत थोडी पिछेहाट झाल्यामुळें सीलोन मधून बरेच मजूर स्वदेशीं परत जात आहेत. आह्मांस दररोज सीलोन मधून परत जाणारे मजूरांची गाडी दिसे. त्या गाडींत विवस्त्र, कृश आणि सर्वप्रकारें

कंगाल असें मजूर दिसत! मजुरांच्या जवळ संसाराचें सामानही फारच अल्प असे. त्यांच्या बरोबर असणारी मुलें खुजी व रोगट दिसत. सध्यां व्यापार मंदीमुळें सर्व ठिकाणाहून मजूर स्वदेशीं परत येत आहेत व त्यांची स्थिति फारच हलाखीची झालेली दिसते.

**भौतिक शिक्षण**–प्राथमिक शिक्षणाचा प्रसार सीलोनमध्यें चांगलाच झालेला आहे. सीलोनमध्यें बुद्धधर्म प्रचलित असल्यामुळें इंग्लिश अमदानीपूर्वी तेथें बुद्धविहारांची संख्या फारच मोठी होती व त्या विहारांतून बुद्धभिक्षु प्राथमिक शिक्षणाचें कार्य करीत, यामुळें सिलोनमध्यें साक्षरतेचा प्रसार बराच झालेला होता. ज्या ज्या देशांत बुद्धधर्म प्रचलित होता किंवा आहे तेथें तेथें साक्षरतेचा प्रसार जास्त आहे. इंग्लिश अमदानीनंतर हिंदुस्थानांतील शाळा खात्या-सारखें शाळाखातें तेथेंही सुरू झालें व त्यामुळेंही साक्षरता वाढली. सीलोनचा वाढता व्यापार हाही साक्षरतेच्या प्रसाराला एकप्रकारें उपकारक झाला. पुरुषांमध्यें शेंकडा ७० लोक साक्षर आहेत. स्त्रियांमध्येंही साक्षरतेचें प्रमाण बरेंच मोठें आहे. प्राथमिक शाळांच्या इमारती बहुतेक ठिकाणीं चांगल्या आहेत. सुमारें शंभर ते हजार विद्यार्थ्यांस शिक्षण देतां येईल एवढ्या शाळांच्या इमारती आहेत. प्राथमिक शाळांत शिक्षणोपयोगी साहित्य पुष्कळ असतें. प्रत्येक शाळेला बाग बहुधा आहेच. प्राथमिक शाळांतून इंग्रजी शिकविण्याची सोय असते. मुलगा तिसऱ्या इयत्तेंत गेला कीं, त्यास इंग्रजी शिकावें लागतें. मद्रास इलाख्यांतही इंग्रजी शिक्षणाची सुरुवात प्राथमिक शाळांतच होते. यामुळें बहुतेक शिक्षित लोकांस थोडेफार इंग्रजी समजते. नऊ दहा वर्षांचीं मुलें इंग्रजी कितपत जाणतात हें पहाण्याकरितां मी अनेक मुलांबरोबर संभाषण केलें, व त्यावरून सिंहली मुलांना इंग्रजी भाषेचें ज्ञान चांगल्या तऱ्हेनें प्राप्त झालेलें असतें असें माझें मत झालें. सिंहलद्वीपांत प्राथमिक शिक्षण सक्तीचें आहे. माध्यमिक शिक्षणाकरितां मिडलस्कूल्स् व हायस्कूल्सही बरींच आहेत.

हिंदुस्थानांत माध्यमिक शिक्षणाकरितां जितकी फी द्यावी लागते तिच्या तिप्पट फी सिलोनमध्यें द्यावी लागते. औद्योगिक शिक्षणाची उत्तम सोय कोठेंही नाहीं. या द्विपांत युनिव्हर्सिटि सुरू होण्यापूर्वी विद्यार्थी 'केंब्रिज स्कूल सर्टिफिकेट एक्झॅमिनेशन,' 'लंडन मॅट्रिक्युलेशन' व 'इंटरमिजिएट एक्झॅमिनेशन' या परीक्षांना बसत. लंडन बी. ए. किंवा बी. एस्. सी. च्या परीक्षेकरितांही कांहीं विद्यार्थी खासगी तऱ्हेनें तयारी करीत. १९३० च्या सुमारास सीलोन मध्यें युनिव्हर्सिटी स्थापन झालेली आहे. गेल्या दोन तीन वर्षांत सीलोनमध्यें सुशिक्षित तरुणांत बेकारी माजलेली आहे व बेकारीच्या प्रश्नाकडे तेथील जनतेचें व सरकारचें लक्ष्य गेलेलें आहे.

**धार्मिक शिक्षणः**—बुद्ध धर्माचा प्रसार या द्वीपांत फार प्राचीनकाळीं झाला पण पोर्तुगीजांची सत्ता स्थापन झाल्यावर त्यांनीं बुद्धधर्माचा पाडाव करण्याकरितां नाना प्रयत्न केले. पोर्तुगीजांनीं एक कायदा असा केला होता कीं, ज्यांचीं लग्नें क्याथोलिक धर्माप्रमाणें झालीं नसतील त्यांच्या संततीस त्यांचे कायदेशीर वारस समजण्यांत येऊं नये. यामुळें अनेक गृहस्थ जरी बौद्ध धर्मास मानीत तरी वारसहक्काकरितां ते आपला लग्नविधि पाद्यांकडून करवीत व तो चर्चमध्यें नोंदवीत. याचा साहजिक परिणाम असा झाला कीं, कोलंबोसारख्या पोतुर्गीज वस्तीच्या ठिकाणीं बौद्धभिक्षूंचें दर्शनही मिळणें कठीण झालें.

इंग्लिशांच्या अमदानींत बौद्ध धर्माला कोणत्याही प्रकारें त्रास झाला नाहीं; एवढेंच नव्हे तर बौद्ध विहारांना पूर्वीच्या राजांनीं दिलेलीं इनामें कायम झालीं व इंग्लिश अधिकाऱ्यांनीं बुद्धधर्मीय उत्सवादिकांस व्यत्यय येऊं दिला नाहीं. पुष्कळशा इंग्रज विद्वानांनीं बुद्धधर्मावर इंग्रजींत पुस्तकें लिहिलीं व पालीटेक्स्ट बुककमिटीनें तिपिटक [ बुद्धधर्मग्रंथांचें नांव ] रोमन लिपींत छापून प्रसिद्ध केलें. या सर्व गोष्टीमुळें बुद्धधर्माच्या अध्ययनास चालना मिळाली व कोलंबो येथें "विद्योदय विद्यालय" नांवाचा मठ स्थापन झाला व तेथें पाली व संस्कृत भाषांचें अध्ययन करण्याची सोय

करण्यांत आली. या विद्यालयामुळें सिंहलद्वीपांतील भिक्षुवर्गांत धर्मज्ञानाचा चांगलाच प्रसार झाला आहे. बुद्धधर्माचा अभ्यास करण्याकरतां, येथें हिंदुस्थान, जपान व यूरोप आणि अमेरिका येथून अभ्यासक येतात. सयामच्या राजाचे बंधु येथें भिक्षु होऊन राहिले होते.

येथपर्यंतच्या माहितीवरून या द्वीपांत भौतिक व धार्मिक शिक्षणाबद्दल काय स्थिति आहे याची वाचकांस सामान्य कल्पना येईल असें वाटते. चहाच्या मळ्यांत जाणाऱ्या मजुरांच्या मुलांचें शिक्षण हा एक शिक्षणांतील महत्वाचा भाग असल्यामुळें त्याबद्दलचीही थोडी माहिती पुढें दिली आहे.

**मजुरांच्या मुलांचें शिक्षणः**—चहाचे व रबराचे मळ्यांवर जी मजुरांची मुलें असतात त्यांचे शिक्षणाबाबत १९२० च्या आर्डिनन्स नंबर १ प्रमाणें काम चालतें. या आर्डिनन्सची बजावणी १९२४ नंतर विशेष होऊं लागली.

या आर्डिनन्सनें मळेवाले व मजूर यांजवर पुढील प्रमाणें नियंत्रणें घातलीं आहेत.

१) ज्या इस्टेटीवर २५ किंवा त्याहून जास्त मुलें ६ ते १० वर्षांच्या वयाची आहेत तेथें सुपरिंटेंडटनें.

[ अ ] मुलांच्या प्राथमिक शिक्षणाची सोय केली पाहिजे
[ ब ] योग्य शिक्षक नेमिले पाहिजेत
[ क ] शाळागृह बांधून दिलें पाहिजे किंवा योग्य इमारत दिली पाहिजे.
[ ड ] शाळेंत येणाऱ्या लायक मुलांचें रजिष्टर ठेवण्यास शिक्षकांस मदत दिली पाहिजे.

२) (अ) शिक्षकानें दर महिन्याच्या १० व्या तारखेच्या आंत शाळेंत येण्यास लायक अशा मुलांचें रजिष्टर दुरुस्त करून बरोबर केलें पाहिजे.

( ब ) दररोजचें हजेरी पत्रक बरोबर ठेविलें पाहिजे.

( ३ ) मुलें दररोज शाळेंत पाठविण्याची जबाबदारी पालकांवर असते.

ज्या ठिकाणीं २५ मुलें नाहींत अशा मळ्यांतील मुलांनीं शेजारच्या गांवच्या शाळेंत जावें, किंवा दोन मळेवाल्यांनीं डायरेक्टरची मंजुरी घेऊन समाईक शाळा चालवावी. मुलांनां कित्येकदां २ ते ३ मैल पर्यंतही शाळेकरितां जावें लागतें.

कायद्याची अंमलबजावणी बरोबर व्हावी म्हणून पुढील प्रमाणें शिक्षाही ठरविल्या आहेत.

( १ ) पालकांनीं मुलें पाठविलीं नाहींत तर त्यांना दंड होतो.

( २ ) रजिष्टरें बरोबर राखिलीं नाहींत तर शिक्षक व सुपरिंटेंडंट हे दंडास किंवा शिक्षेस पात्र होतात. दंड २० रु., शिक्षा १ महिना.

( ३ ) सुपरिंटेंडंटनें शाळागृह बांधून देण्याची टाळाटाळ केली तर गव्हरनरला कोणीतरी अधिकारी नेमून शाळागृह बांधवून घेतां येतें व झालेला खर्च मळेवाल्यांच्या मालावर जप्ति नेऊन वसूल करितां येतो.

सामानः—

( १ ) शाळेंत येणाऱ्या प्रत्येक मुलाकरितां डेस्क व बेंच असलेंच पाहिजे असा नियम आहे. या नियमाची बजावणी इन्फंट क्लासाबाबत मात्र सक्तीनें केली जात नाहीं.

( २ ) पुस्तकें, नकाशे वगैरे शाळेला सुपरिंटेंडंटनें पुरवावीत असा नियम आहे.

शाळांची वेळः—दहा वर्षांच्या आंतील मुलाला मळ्यावर कोणतेही कामास लावण्याची मनाई आहे. म्हणून सुमारें ८ ते १ पर्यंत (५ तास)

शाळा भरतात. ५ तासांपेक्षां जास्त शाळा चालविण्यास डायरेक्टरची मनाई नाहीं. वेळापत्रकें, अभ्यासक्रम इत्यादि बाबतींत सुपरिंटेंडंटला शाळखातें सल्ला देतें. १० वर्षांच्या आंतील मुलांना दुपारीं ४ नंतर शाळेंत ठेवतां कामा नये असा नियम आहे. दुवक्त पद्धतीनेंही शाळा भरविल्या जातात.

या मळ्यावरील शाळांना सरासरी हजेरीवर प्रत्येक मुलास ७ रु. प्रमाणें सरकारी ग्रँट मिळते. शाळेच्या परीक्षांच्या निकालावरही ग्रँट मिळते.

सिंहली शिक्षकांची सातवी यत्ता तरी पास झालेली असावी लागते. हिंदुस्थानांतून मद्रासी शिक्षकही सीलोनमध्यें पुष्कळ जातात. अनपास शिक्षकास वार्षिक पगार २४० रु. मिळतो, ट्रेंड शिक्षकास ४८० पर्यंत पगार मिळतो. दुवक्त पद्धतीनें शिकविणाऱ्या शिक्षकास जास्त पगार मिळतो.

इस्टेटीवरील शाळांत पांच यत्ता पर्यंत शिक्षण मिळतें. ज्या ठिकाणीं शाळा नसल्यामुळें किंवा शाळा फार दूर असल्यामुळें मुलांस शाळेंत पाठवितां येत नाहीं तेथें मुलांची शिक्षणाची सोय 'खासगी पद्धतीनें केली आहे' अशी पालकास डायरेक्टरची खात्री पटवावी लागते. एवंच कोणतेंही मूल निरक्षर राहूं नये याबद्दल सीलोन सरकार काळजी घेतें असें दिसते.

## सिंहलद्वीपांतील प्रसिद्ध शहरें व प्रेक्षणीय स्थळें

येथपर्यंत सीलोनची शेतकी, त्यांत होणारीं नानाप्रकारची पिकें, खनिज संपत्ति इत्यादि विषयांची माहिती दिल्यानंतर या पुढें प्रेक्षणीय शहरें व स्थळें यांचें वर्णन दिलेलें आहे. या वर्णनावरून मुख्य मुख्य शहरांबद्दल वाचकांस माहीती मिळेल.

**कोलंबो**:—हें सीलोनमधील मुख्य शहर आहें. तेथील लोकसंख्या २॥ लाखावर आहे. रस्ते मोठाले असून डामरी आहेत. लहान गल्या मात्र आपल्याकडील रस्त्याप्रमाणें खडीच्या आहेत. शहराच्या जुन्या भागांत

वस्ति थोडी दाट आहे पण असा भाग थोडा आहे. रस्त्यांच्या कडेला नानाप्रकारचीं झाडें आहेत त्यामुळें पुष्कळशा रस्त्यांवरून सावलींतून जातां येतें. पुष्कळशा घराभोंवतीं मोकळी जागा असून त्यांत पोफळी, केळीं, नारळी वगैरेंचीं झाडें आहेत.

या ठिकाणीं नाना धर्मांचे लोक आहेत. कोलंबो हें मोठें बंदर असल्यामुळें नानादेशचे लोक येथें प्रत्यहीं येत असतात. शहर अगदीं पाश्चात्य पद्धतीचें दिसतें. समुद्राच्या पूर्व किनाऱ्यास गॅलिफेस हॉटेल नांवाचें प्रसिद्ध हॉटेल आहे. सीलोनचें सेक्रेटेरियेट बिल्डींगही तेथें जवळच आहे. बंदराच्या पश्चिम बाजूस 'सी-रोड'(एका भागाचें नांव) आहे तेथें केवळ शाकाहारी लोकांची रहाण्याची व जेवणाची सोय असणारी हाटेलें आहेत.

बंदर दाक्षिण बाजूस आहे व बंदराचे दक्षिणेस डच लोकांनीं बांधलेला किल्ला होता. कोलंबो येथें अरमार आणि फौज आहे. बंदरापासून उत्तरेकडे जाणाऱ्या मोठ्या रस्त्यावर नानातऱ्हेचीं दुकानें आहेत. कांहीं दुकानांतून सीलोनमध्यें सांपडणाऱ्या रत्नांचें निरनिराळे दागिने व सुटी रत्नें विक्रीकरितां ठेविलेली दिसतात. रस्त्यांतून रत्नांची विक्री करणारेही फिरत असतात. रत्नांची परीक्षा नसणारे परकी लोक आपला खिसा रिता करून परत जाणारे व नंतर पश्चात्ताप पावणारे मधून मधून दिसतात.

शहराचा विस्तार सुमारे ८।१० मैल लांबीचा आहे. स्टेशनपासून सुमारें ७ मैलांवर 'वेलावटि' ह्मणून एक भाग आहे तेथें कापडाची एक गिरणी आहे. प्रत्येक वाण्याच्या दुकानांत किंवा धान्याच्या दुकानांत सुकी मासळी विक्रीकरितां असतेच. त्यामुळें शाकाहारी माणसास जरा कसेसेंच वाटते. सिंहली लोक विडा खाणारे वस्ताद आहेत पण त्यांचा विडा काता शिवाय तयार केलेला असतो व सुपारी बहुधा ओली असते. लहान लहान दुकानांतून मोठमोठाले केळीचे घड विक्रीकरितां टांगून ठेविलेले दिसतात. कोलंबो येथें एक म्यूझियन आहे. हें रोज सकाळीं १०

ते सायंकाळीं ६ पर्यंत खुलें असतें. रविवारीं मात्र दुपारीं ३ ते ६ पर्यंतच खुलें असतें. त्यांत निरनिराळ्या काळच्या बुद्धाच्या मूर्ति, सिंहली लोकांचे अलंकार, रुप्याचे व हस्तिदंति काम, वगैरे नानाविध पदार्थ आहेत. तसेंच एक प्राणि संग्रहालय आहें तेथें बरेच प्राणी आहेत, मुंबई व मद्रास येथील संग्रहांचें मानानें हें फारच कमी दर्जाचें आहें. येथें सीलोन-मध्यें सापडणारा ' बोवा ' नांवाचा एक सर्प आहे, त्याचें वजन १८७ पौंड असून लांबी २७ फूट आहे.

कोलंबो येथें मोटार सर्व्हिसनें एका भागांतून दुसऱ्या भागांत जातां येते. मोटारीचे दर सरकारनें आंखून दिलेले आहेत. दिवसापेक्षां रात्रीं १० नंतर भाडें अधिक पडते. पुणे, मुंबई शहरासारखे येथें टांगे नाहींत. जपानमधील रिक्षा मात्र शहरभर मिळतात. रिक्षेंत एका माणसासच बसतां येतें. शिवाय हें वाहन माणसानें ओढिलें जाणारें असल्यामुळें २।३ मैलाच्या प्रवासास थोडेसें निरुपयोगीच पडतें.

बैलगाड्या फारच मोठ्या असतात. त्यांच्या वरच्या तक्त्यावर बहुधा माडाचीं पानें असतात, पाण्याचें तुषार गाडींत येऊं नयेत म्हणून पुढील आणि मागील बाजूस तक्त्याचें टोक बरेंच पुढें आणिलेलें असतें.

कोलंबो येथें गोड्या पाण्याचें मोठें तळें आहे. त्याचें क्षेत्रफळ ४१६ एकर आहें. तळ्याच्या कांठाला निरनिराळ्या प्रकारची ताडांची व माडांची झाडें आहेत. या तळ्यांत मध्यभागीं एक लहानसें बेट आहें. डच लोक 'कैद्यांनीं पळून जाऊं नये' म्हणून त्यांस रात्रीं येथें ठेवीत असत व यावरून त्या बेटास गुलामां बेट असें म्हणतात. सध्यां तें बेट लहानसा पूल बांधून जमीनीस जोडलें आहें.

केलनी नदीच्या कांठीं बुद्धाचे प्राचीन असें " केलनी " नांवाचें मंदीर आहें या देवळाचा जीर्णोद्धार १३०१ मध्यें झाला. कोलंबोपासून हें देऊळ अगदीं जवळ आहें. तेथें रेल्वेनें किंवा मोटारनें जातां येते.

पौर्णिमेच्या दिवशीं ( बुद्धलोक पौर्णिमेस पोया म्हणतात ) हजारों लोक हातांत फळें व फुलें घेऊन या देवळाकडे जातांना दिसतात. या देवळांत बुद्धाची प्रचडमूर्ति ( आडवी ) आहे.

कोलंबो पासून सुमारें ९ मैलावर "माऊंट लॅव्हिनिया" नांवाची समुद्र-कांठीं एक सुंदर टेकडी आहे. तेथून समुद्राचा व एकंदर सृष्टिसौंदर्याचा फारच नामी देखावा दिसतो. कोलंबोस येणारे प्रवासी बहुधा येथें गेल्या-शिवाय राहात नाहींत.

गॅलिफेस हाटेल जवळील पटांगण ह्मणजे मुंबईची 'चौपाटी' आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. रमजान सारख्या सणाचे वेळीं या ठिकाणीं अफगाण व पठाण लोकांचे नाच होतात. तसेंच एप्रिल तेरालाही ( सिंहली लोकांचें नवीन वर्ष या दिवशीं सुरू होतें ) हें पटांगण उत्सवानें खुलून गेलेलें दिसतें.

ग्रँट ओरिएंटल हाटेलच्या शेजारीं " मकन मार्कर " च्या इमारतींत खालचा एक सबंध मजला रत्नांकरितां राखून ठेविलेला आहे. व त्यांत नानातऱ्हेचीं रत्नें व रत्नांचे दागिने ठेविलेले आहेत. तेथील रत्नें व दागिने कोलंबोला गेल्यानंतर पाहिल्या शिवाय राहूं नये. हा रत्नांचा संग्रह विक्रीकरितां नाहीं.

ग्रँट ओरिएंटल हाटेलजवळ ' अबदुल गफूर जव्हेरी ' यांची एक इमारत आहे. या इमारतींतही नानाप्रकारचीं रत्नें व मोत्यें आहेत. हा संग्रह फुकट पहाण्यास मिळतो. या ठिकाणीं मालाची विक्रीही कारितात.

कोटॅज इंडस्ट्रीज सोसायटीचें एक दुकान आहें तेथें सीलोनी पद्धती-च्या नानाप्रकारच्या वस्तु मिळतात. हें दुकान हाटेलमध्येंच आहें.

## कँडी

समुद्र सपाटीपासून १७६० फूट उंचीवर एका रम्य अशा दरींत सुमारें ३५ हजार वस्तीचें हें गांव वसलेलें आहे. भोंवतालीं सर्वत्र उत्तम


वनश्री आहे. कँडीच्या शेवटच्या राजानें गांवाजवळील एका दरीचें तळें बनविलें, सांप्रत या तळ्याचे शेजारींच बुद्धभिक्षूंचा मठ आहे. तळ्याचें दक्षिण अंगास बुद्धाचा दांत असलेलें प्रसिद्ध देवालय व क्रीकेटचें क्रीडांगण आहे. या तळ्यांतही एक बेट होतें व त्या बेटावर राणीनें कांहीं अपराध केला ह्मणजे राजा तिला कोंडून ठेवीत असें.

सन १८१५ सालीं कँडी इंग्लिशांच्या ताब्यांत आलें. त्यावेळीं कँडीच्या सरदारांस इंग्लिशांकडून कांहीं जहागिर देण्यांत आली. सीलोनच्या गव्हरनरांच्या हस्तें त्यांना पदकें मिळालेलीं आहेत. हीं पदकें सरदार लोक कांहीं विशिष्ट प्रसंगीं धारण करितात. कँडीच्या सरदारांचा दरबारी पोषाख फारच थाटामाटाचा असतो. सुमारें ३० ते ४० वार लांबीचे जरीकांठीं शालू ते कमरेस बांधतात. डोक्यावरील पागोटें किंवा शिरोभूषणही मोठें विचित्र असतें. भडक रंगाचें सुंदर जाकीट ते अंगांत घालतात. या सरदारांच्या अंगावर नानातऱ्हेची रत्नें असतात, ते आपले शरीर रत्नांनी मढवून काढितात असें ह्मणण्यास हरकत नाहीं. या सरदारांच्या तरवारींच्या मुठींही रत्नखचित अशा आहेत.

कँडीच्या भोंवतालीं उंच टेकड्या असल्यामुळें बशींत पडलेल्या माशाप्रमाणें हें शहर आहें असें वर्णन एका लेखकानें केलें आहें. कोलंबोहून कँडीस मोटारनें जाण्यास उत्तम डामरी सडक आहे. यूरोपियन प्रवाशाकरितां उत्तम हाटेल आहें. केवळ वनस्पत्याहारी लोकांकरितां ब्राह्मणाची खाणावळ आहें. रस्ते फारच चांगले असून इमारती सुंदर आहेत. येथें व्यापारही बराच मोठा चालतो.

**कँडीः— दळद मलिगव — [ दळद—दन्तावशेष, मलिगव —देऊळ ]**

जगांतील अत्यंत प्राचीन असें जे ऐतिह्य अवशेष आहेत त्यापैकीं भगवान् बुद्धाचा दांत हा एक आहे. कीर्तिश्री मेघवर्ण राजाचें कारकीर्दीत ३०४ ते ३२४ च्या सुमारास कलिंग देशाहून हा दांत सीलोनमध्यें



विक्रमराजसिंहानें बांधलेला कँडी येथील तलाव (पृ. १०६)

आणिला असें म्हणतात. हा दांत उजव्या बाजूचा सुळा आहे असें ह्मणतात. त्याची लांबी २॥ इंच आहे, यावरून हा दांत माणसाचा नसावा असें अनेकांचें मत आहें. 'हा दांत' एका रत्नजडित पेटींत ठेविलेला आहे, व तो लोकांना क्वचितच दाखविण्यांत येतो.

ही पेटी ज्या खोलींत ठेविली आहे ती फक्त सकाळीं व सायंकाळीं आराधनेच्या वेळीं उघडली जांत. दरवर्षी आगस्ट महिन्यांत मोठा उत्सव होऊन या पेटीची मिरवणूक निघते. या उत्सवास 'पेरहारा' असें ह्मणतात. उत्सव १० दिवस ( पंचमीपासून पौर्णिमेपर्यंत ) असतो. त्यावेळीं कँडीचे सरदार सर्व लव्याजम्यानिशीं हजर असतात. ही मिरवणूक रात्रीं निघते व त्यावेळीं फारच उत्तम शोभा दिसते. बुध्दधर्मीयांचा या दांताबद्दल फारच मोठा आदर आहे त्यामुळें लक्षावधि लोक या दांताच्या दर्शनास येतात. या उत्सवास चीन, जपान, ब्रह्मदेश येथूनही कांहीं लोक येतात. वाद्यें व त्यामुळें होणारे दंगे—बुध्दलोक आणि मुसलमान यांचे- येथेंही होतात त्यामुळें ज्या दिवशीं ही मिरवणूक निघते त्या दिवशीं पोलिसास कामही जास्त असतें.

ज्या देवळांत हा दांत ठेवलेला आहे त्यास "दलद मलिगव" असें म्हणतात. देवळाचा कांहीं भाग तेराव्या शतकांतला आहे. दांत एकांत-एक बसणाऱ्या सात पेट्यांत आहे. पेट्या सोनेरी असून सर्व रत्नखचित आहेत. दांत सोनेरी कमळाला सोन्याच्या सांखळीनें गुंतविलेला आहे. उत्सवाचेवेळीं दांत देवळांत असतो, फक्त पेटीचीच मिरवणूक हत्तीवरून सोन्याच्या पालखींतून काढितात.

देवळाला जोडून " ओरिएंटल लायब्ररी " आहे या ग्रंथसंग्रहालयांत पुष्कळ जुने ग्रंथ व ताडपत्रावरील पोथ्या आहेत.

देवळाच्या शेजारीच "कँडियन आर्ट सोसायटी" नांवाची निमसरकारी संस्था आहे. तेथें अगदीं जुन्या पध्दतीनें व जुन्या तऱ्हेचें काम केलें

जातें, कारागिरांची वस्त्रें विणण्याची व दागिने करण्याची हत्यारें सुध्दां (ज्या वेळीं कँडीचे राजे येथें राज्य करित होते त्यावेळची म्हणजे सुमारें ७।८ शतकांतलीं ) पूर्वींच्या पध्दतीचीं आहेत. यामुळें पूर्वींची कारागिरी कशी होती, काम कसें केलें जात असे तें येथें प्रत्यक्ष पहावयास सांपडतें व जुन्या सीलोनी पध्दतीचें पदार्थही खरेदी करितां येतात.


सध्यांच्या सरकारी कचेरी समोर पूर्वींचा सभामंडप आहे. कँडीच्या प्राचीन शिल्पशास्त्राचा नमुना म्हणून ही इमारत प्रसिध्द आहे. कँडीच्या जुन्या राजवाड्यांत सांप्रत सरकारी आफिस आहें. सध्यां जेथें कँडीच्या न्यायाधिशाची बसण्याची जागा आहे तिच्या समोरच्या बाजूस पूर्वीं राजाचें सिंहासन होतें.

## कँडीच्या भोवतालची देवळें.

कँडीपासून जवळच तेथील राण्यांनीं बांधलेलीं ' नटदेवळ ' ' महादेवळ ' ' कटरागमदेवळ ' व " पटनी देवळ " या नांवांची प्रसिध्द देवळें आहेत. ही द्राविडी पध्दतीची असून तेथील नक्षीकाम पहाण्यासारखें आहें. कांहीं कांहीं मूर्तिमध्यें अनेक रत्नें आहेत.

तेथील देवळांत एक सोन्याचें पिंपळाचें झाड बनविलेलें आहें व त्याचीं पानें खऱ्या पांचूंची बनविलेलीं आहेत. हा पिंपळाचा वृक्ष पाहिल्यावर प्राचीन काळीं हिंदुस्थानांतील देवळांतून किती संपात्ति असेल याची कल्पना येते. देवळांतून ही जी संपात्ति असे ती नेण्याकरितांच प्रथमतः हिंदुस्थानावर परकीयांच्या स्वाऱ्या येऊं लागल्या.

असागिरिया नांवाचें फार प्राचिन असें एक देवालय आहें व त्यांत बुध्दाची प्रचंड मूर्ति आहे. तेराव्या शतकांतील गदलदेन्या आणि लंकातिलक नांवाची सुंदर मंदिरें कँडीपासून ९ मैलावर आहेत. आणि तिकडे जाणारी सडक " पेराडेनिया " नांवाच्या बागेजवळून जाते. लंकातिलक देऊळ उंच टेकडीवर आहे व तेथून अप्रतिम सृष्टिसौन्दर्य दिसतें. या



दळदमळिगव (बुद्धाच्या दांताचें देऊळ) कँडी (पृ. १०८)

देवळांकडे जाण्यास मोटारी व बाटाडे मिळतात.

कोलंबोहून कँडीस जातांना बहुधा हत्ती दृष्टीस पडतात. हे हत्ती लोकांनीं शेतावरील कामाकरितां बाळगिलेले असतात. कँडीजवळील नदींत ' कटुगस्तोला " येथें सायंकाळीं ३ ते ५ चे दरम्यान पुष्कळसे हत्तीस स्नानाकरितां आणितात. त्यावेळीं या प्रचंड प्राण्यांची जलक्रीडा पहाण्यासारखी असते.

कँडी येथील रविवारचा बाजार, तसेंच येथील ट्रिनिटि कॉलेज व बुध्द भिक्षूंचे विहार पहाण्यासारखे आहेत. कँडी येथें मुक्काम ठेऊन रबर, कोको, चहा यांचे मळे, नारळाच्या बागा व तेल काढण्याचे कारखाने बघतां येतात. कँडी हा सिंहली शब्द आहे या शब्दाचा अर्थ टेकडी असा आहे. अर्थात् कँडी-ह्मणजे टेकडी जवळील गांव, कँडियन लोक ह्मणजे डोंगरी लोक.

## शिगिरी

एका टेकडीवर अगदीं सरळ ४०० फूट उंचीचा असा हा एक खडक आहे. वरच्या बाजूला सुमारें एक एकर अगदीं सपाट जागा आहे. या खडकाच्या सर्व बाजू अगदीं बरोबर कापल्या सारख्या आहेत. फक्त पूर्वेच्या बाजूनें चढण्यास अत्यंत कठीण अशी एकच वाट आहे.

दत्तुसेन राजाचा त्याच्या मुलानें खून केला व नंतर तो 'पहिला काश्यप' असें नांव धारण करून (दत्तुसेनाचा मुलगा) राज्य करूं लागला. प्रजेनें या पितृघातकी राजाविरूद्ध बंड केलें व त्यास राज्यत्याग करावयास भाग पाडलें. नंतर या काश्यपानें शिगिर येथें किल्ला बांधून इ.स. ४९५ पर्यंत राज्य करण्याचा प्रयत्न केला. पुढें काश्यपाचा भाऊ मोग्गलान हा हिंदुस्थानांत आपले हद्दपारीचे दिवस घालवीत होता तो परत सिंहलद्वीपांत आला व त्यानें काश्यपास पदच्युत करून राज्य मिळविलें.

या शिखरावर दगडाचें एक सिंहासन आहे. या शिवाय विस्तीर्ण असे हौद आहेत, व अजिंठ्याप्रमाणें येथें उत्तम लेणी

आहेत. येथील लेण्यांतील रंगित काम अद्याप पर्यंत नव्यासारखें दिसत आहे.

## नुवारा एलिया

हें 'टी इस्टेटोचें'* केंद्र आहे व याची उंची ६२४० फूट उंच आहे. सर्वत्र उंच गिरिशिखिरें, गिरिशिखरावर सर्व बाजूंस चहाचे पसरलेले हिरवेगार मळे व नानाप्रकारच्या वृक्षांनीं आच्छादिलेलें दऱ्याखोऱ्यांचे कांठ यामुळें हें ठिकाण फारच रम्य आहें. नानाप्रकारच्या फळझाडांची व फुलझाडांची अनुपम शोभा सर्वत्र दिसते. स्वच्छ पाण्याचे वाहणारे झुळझुळ प्रवाह सर्वत्र आहेत.

या भागांत युरोपियन मळेवाल्यांची बरीच मोठी वस्ति असल्यामुळें क्रिकेटची क्रीडागणें, टेनिसकोर्टें, गोल्फग्राउंडस् यांची कमतरता कोठेंच नाहीं. येथील हवा इंग्लंडच्या हवेपेक्षांही चांगली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. इंग्लिश लोकांना पाहिजे इतका हवेचा थंडपणा आहे पण बर्फाचा त्रास नाहीं. पर्जन्य बाराही महिने आहे पण पावसाची चिकचिक नाहीं. इंग्लंडमधील सर्व प्रकारची फळें व पुष्पें उत्तम रीतीनें वाढण्यास अनुकूल अशी परिस्थिति आहे. शिवाय उष्ण प्रदेशांतील फळें व फुलेंही येथें मिळूं शकतात. शिकारीची सोयही या ठिकाणी चांगली आहे.

असा हा निसर्गरमणीय प्रदेश युरोपियन लोकांनीं आधुनिक शास्त्राच्या साह्यानें नंदनवन बनविलेला आहे. सीलोन मधील निरनिराळ्या भागांतील लोक येथें चैनी करितां व हवा पालट करण्याकरितां येत असतात. हिंदुस्थानांतील उटकमंड, महाबळेश्वर इत्यादि ठिकाणापेक्षां हें ठिकाण फारच रम्य आहें. प्रत्येक नूतन परिणित जोडप्यास या भागांत हनिमून करितां जावेंसें वाटतें. बोअर युद्धाचेवेळीं येथें शेकडों बोअर कैद्यांस ठेवण्यांत आलें होतें. हिंदुस्थानांतील अनेक युरोपियन आफिसर्स व व्यापारीही तेथें नेहमीं जात असतात.

* चहांचे मळे



' नुवारा एलिया ' येथील एक तळें (पृ. ११०)

कोलंबो पासून हें ठिकाण १३५ मैल आहे. रेल्वे उंच उंच गिरिशिखरें चढत जातांना मनांत आनंद आणि भीति यांचे तरंग एकसारखे उठत असतात. येथें मोटारीनेंही जातां येतें. मोटारीनें प्रवास करितांना जेव्हां मोटार रांबोडो घाटाजवळ येतें त्यावेळीं तेथील अवर्णनीय वनश्रीपाहून प्रवासी तल्लीन होऊन जातो.

हार्टन प्लेन नांवाचे मैदान नुवारा एलिया पासून १६ मैल आहे व त्याची उंची नुवारापेक्षां ८५० फुटांनीं जास्त आहे. येथें शिकार चांगली मिळते असें ह्मणतात. कँडी जवळील परॅडेनिया बागेची ‘ हकगल ’ नांवाची शाखा नुवारा पासून ६ मैलावर आहे.

नुवारा एलया येथें थंडी वरीच असते. रात्रीं घरांत शेंगडी असल्याशिवाय सुखानें झोप घेतां येत नाहीं. सकाळीं धुकेंही दाट पडलेले असतें. विषुववृत्ताच्या अगदीं जवळ असलेल्या प्रदेशांत असें शीत स्थल असल्यामुळें मनाला एक प्रकारचा अचंबा वाटतो.

नुवाराला जाण्याकरितां कोलंबोहून रोज दोन गाड्या सुटतात. एक सकाळीं निघते व एक रात्रीं निघते. कोलंबोहून नुवारास जातांना वाटेंत “ डेव्हन ” नांवाचा अत्यंत प्रेक्षणीय असा धबधबा आहे.

## श्रीपाद

७२६० फूट उंचीच्या पर्वत शिखरावर श्रीपाद नांवाचें सीलोन मधील प्रसिद्ध क्षेत्र आहे. पूर्वीं ४ फूट लांब मध्य डोंगरांतील पश्चिम बाजूस
व दोन इंच खोल अशी या ठिकाणीं खांच होती. पुढें टांकीनें या ठिकाणीं मनुष्याच्या पावलाचा बरोबर आकार तयार केला आहे.

लागलें हें समजण्यास मार्ग नाहीं. तथापि हें ठिकाण वलंगबाहु राजा हरणाचा शिकार करण्यात गेला असतां या स्थळीं खिस्तपूर्व ९० सालीं येथें गेला व हें ठिकाण त्यानें पाहिलें होतें असें ह्मणतात. या ठिकाणास पावित्र्य केव्हां आलें व येथें यात्रेकरू कधींपासून जाऊं

श्रीपाद येथें जाण्यास दोन मार्ग आहेत. एक रस्ता खालील नीच प्रदेशाकडून गेलेला आहे, परन्तु रस्ता अत्यंत अरुंद व चढाचा आहे. यात्रेकरू वर चढत असतांना पडूं नयेत ह्मणून जागजागीं रस्त्याच्या बाजूनें लोखंडी सांखळ्या लाविलेल्या आहेत, दुसरा रस्ता हॅटनच्या बाजूनें आहे. रस्ता चांगला आहे व हॅटनपासून अगदीं श्रीपादजवळ जाईपर्यंत त्याची लांबी १४ मैल आहे.

शिखरावर पावलाच्या खुणेवर लहानसें देऊळ बांधलेलें आहे. श्रीपाद हें एकच ठिकाण असें आहे कीं, जेथें भिन्नभिन्न धर्मांचे लोक एकाच उपास्याच्या उपासनेकरितां एकत्र जमतात. हिंदु लोकांची अशी कल्पना आहे कीं, श्रीपाद ही शिवाच्या पायाची खूण आहे. खिस्ति लोक असें ह्मणतात कीं, 'थामस' नांवाचा साधु प्राचीनकाळीं हिंदुस्थानांत आला असतांना त्याच्या पावलाची खूण येथें उमटली आहे. मुसलमान लोक असें ह्मणतात कीं, ॲडम यांस स्वर्गांतून बाहेर घालविल्यानंतर तो या ठिकाणीं एका पायावर उभा राहून तपश्चर्या करीत होता, त्याच्या पायाची ही खूण आहे. बुद्धधर्मीयांचे मतें हें बुद्धाचें पाऊल आहे.

अशा भिन्नभिन्न समजुतीमुळें हिंदु, बुद्ध, मुसलमान खिस्ति अशा चारी धर्मांचे लोक श्रीपादाच्या दर्शनाकरितां मोठ्या भक्तीनें जात असतात. ७२६० फूट उंचीवर जाण्याचें काम सामान्य नव्हें. इतक्या उंचीवर थंडी फारच जोराची असते. कित्येकदां मध्येंच पाऊसही येतो. यामुळें दुर्बल किंवा वृद्ध यात्रेकरू या प्रवासांतच प्राण सोडतात. अलीकडे हा प्रवास सुखकर करण्याकरितां पुष्कळच सोयी करण्यांत आलेल्या आहेत.

हें देऊळ बुद्ध भिक्षूंच्या ताब्यांत आहे व तेथील व्यवस्था भिक्षूंच पहातात. अशा प्रकारच्या पायाच्या खुणा पेगु, आवा व आराकान येथें आहेत सयाम येथें सुवण्णपब्बत ( सुवर्णपर्वत ) नांवाच्या पर्वतावर प्रसिद्ध असें श्रीपादस्थान आहे.

बुद्ध लोक असें ह्मणतात कीं, जी स्त्री श्रीपाद पर्यंत पायीं चालत जाईल ती मरणोत्तर पुरुषाचा जन्म पावेल. ज्या स्त्रियांना प्रसूतिसमयीं यातना होत असतील त्यांनीं स्त्रीचा जन्म पुन्हां मिळूं नये म्हणून वाटल्यास श्रीपादची यात्रा करून पहावी.

श्रीपाद येथें जावयाचें झाल्यास रात्रीं मुक्कामास जावें म्हणजे शांतता येथें कशी नांदते याचा अनुभव येतो व सूर्योदयाचा अप्रतिम देखावाही दृष्टीस पडतो. सूर्योदयानंतर पश्चिमेस या शिखराची गर्दनिळी अशी छाया पडते. तो रंग प्रत्यक्ष पाहिल्यास नेत्राचें पारणें फिटल्यासारखेंच वाटते. श्रीपादच्या पर्वत शिखरास इंग्लिश लोक ॲडॅम्स्पीक असें म्हणतात.

## अनुराधपुरम्

ही सीलोनची अत्यंत प्राचीन राजधानी होय. इ. स. पूर्वी ४०० सालीं पडुकभय नांवाच्या राजानें हें शहर स्थापिलें असें म्हणतात. पुढें १४०० वर्षें हें राजधानीचें शहर होतें. रोम शहराच्या भरभराटीच्या अगोदर किंवा रोमच्या उदयापूर्वी हें शहर भरभराटींत होतें. या शहराचें प्राचीन वैभव नष्ट झाल्यावर कित्येक शतकें पर्यंत या ठिकाणीं एकसारखें अरण्य वाढत गेलें व कित्येक वर्षें या ठिकाणीं शहर होतें हेंही लोक विसरून गेले. सुमारें ५० वर्षांपूर्वी या ठिकाणीं उत्खननाचें कार्य झालें व त्यावेळीं निरनिराळीं चित्रें, शिलालेख, डागोबा व इतर अनेक अवशेष या ठिकाणीं सापडले. येथील शिलालेखांवरून सीलोनच्या प्राचीन इतिहासावर बराच प्रकाश पडला आहे.

अनुराधपुरास कोलंबोहून जाण्यास रेल्वे आहे. तसाच उत्तम मोटारचा रस्ता आहे. रस्त्यांत दाट अरण्य आहे त्यामुळें रस्त्यावर कदाचित् रानटी हत्ती येण्याचा संभव असतो. गावांत उतरण्यास धर्मशाळा व हॉटेलें आहेत सर्वत्र चांगल्या सडका असून गांवाभोंवतालीं पाटाचें पाण्याखालीं निरनिराळीं पिकें होतात. बुद्ध लोकांच्या यात्रेचें हें ठिकाण अस-

त्यामुळें येथें व्यापारही बराच चालतो. शाकाहारी लोकांकरितां मात्र येथें कांहींच सोय नाहीं.

ज्यावेळीं येथें उत्खनन झालें त्यावेळीं २० फूट लांबीच्या दगडी डोणी सांपडल्या आहेत. यांचा उपयोग काय करीत असत तें समजणें कठीण आहे. कांहीं लोक म्हणतात कीं, राजांच्या हत्तीला खाणें घालण्याकरितां त्यांचा उपयोग करीत असत; कोणी ह्मणतात कीं, यांत भिक्षूलोक आपले कपडे रंगवीत असत; कांहीं लोक असें म्हणतात कीं भिक्षूंना भात वाढण्याकरितां यांचा उपयोग करीत असत. अशाच तऱ्हेची एक मोठी डोण विजयानगर येथें आहे.

या ठिकाणीं प्राचीन स्नानगृहें आहेत. तीं पाहून सांप्रत कोणास कांहींच आश्चर्य वाटणार नाहीं परन्तु प्राचीनकाळीं संस्कृति किती पुढें गेली होती तें या स्नानगृहावरून दिसतें. बुद्धांच्या विनयपिटक ग्रंथांत यांचें वर्णन आढळतें. प्राचीन विषयाच्या अभ्यासकाला ईजिप्तमधील प्राचीन स्नानगृहाशीं यांची तुलना करितां येण्यासारखी आहे.

अनुराधपुरास गेल्यावर थूपाराम, अभयगिरिडागोबा, थोलुविय विहार, वगैरे प्राचीन अवशेष पहावेत.

## रुनवेल्ली पॅगोडा

अनुराधपुरांतील बुद्ध मंदिराच्या सुमारें १ फर्लांगावर पश्चिमेस हा पॅगोडा आहे. ही इमारत टेकडीप्रमाणें वर्तुळाकार आहे व वरती एक कळस आहे. ही विटांनीं बांधलेली इमारत आहे. तिचा घेर एक हजार फूट असून उंची २७० फूट आहे. भोवतालची भिंत सध्यां पडलेली आहे. ही इमारत सांपडल्यापासून तिच्यांत पुष्कळच फेरबदल करण्यांत आलेले आहेत. या इमारतीच्या उत्तर बाजूस देऊळ वजा एक खोली आहे. तेथें दत्तुगामिनी राजाचा एक पुतळा असून तीन बुद्धाचे पुतळे आहेत. या ठिकाणीं अनेक लोक येऊन उपासना करितात. दत्तुगामिनीनें

हा पॅगोडा बांधावयास सुरवात केली पण बांधकाम पुरें होण्याच्या आंतच तो आजारी पडला. पुढें दत्तुगामिनीच्या भावानें (तिस्स राजानें) तो पुरा केला. हें काम ख्रिस्तसनापूर्वी दुसऱ्या शतकांत झालें.

## ब्रेझन पॅलेस

तामील राजा एलया यानें म्हैसोरकडून येऊन सिंहलद्वीपावर स्वारी केली त्याचा पराभव दत्तुगामिनी राजानें केला व या विजयाचें स्मारक म्हणून खि. पूर्व दुसऱ्या शतकांत त्यानें हा राजवाडा बांधला. हा राजवाडा नऊ मजली होता नंतर त्याचा उपयोग भिक्षु लोकांना राहण्याकरितां होऊं लागला व तेथें एक हजार भिक्षु राहात असत.

या राजवाड्यास वज्रतुंडी दगडाचे १६०० खांब होते. प्रत्येक खांबामध्यें ६ फुटाचें अंतर राखून ४०।४० खांबांची एकएक रांग होती. सध्यां जे अवशिष्ट खांब आहेत त्यांची उंची १२ फूट आहे. खांबांना ब्रांझ धातूच्या व तांब्याच्या पत्र्यांनीं मढवून काढिलेले होते. या ठिकाणीं एकंदर १००० खोल्या होत्या.

खालचा मजला जास्त उंच, त्याच्या वरचा कमी उंच अशी या राजवाड्याची रचना होती. वरच्या बाजूस भोवताली गच्ची असून वरील छपरावर ब्रांझ धातूचे पत्रे घातले होते. या राजवाड्यांत एक मुख्य दिवाणखाना होता तेथें दरबार भरत असे. त्याच्या खांबावर सोन्याचे पत्रे बसविले होते व छतही सोनेरी होतें. येथील सिंहासन हस्तिदन्ति असून त्याचे पाय सिंहाच्या पायासारखे व सोनेरी होते.

इ. स. च्या चौथ्या शतकांत या इमारतीचे दोन मजले कमी होऊन ती सात मजली झाली. महासेन राजा बुद्धधर्मद्वेष्टा असल्यामुळें या इमारतीचा त्यानें नाश केला. या राजानें पुढें बुद्धधर्मांचा स्वीकार केल्यावर पुन्हां पांच मजले बांधले. तत्कालिन बौद्धविहारापैकीं हा विहार सर्वांत मोठा होता. अनुराधपुराहून राजधानी दुसरीकडे गेल्यावर या मठाचें महत्व

दिवसोंदिवस कमी होऊं लागलें आणि शेवटीं हा राजवाडा दाट अरण्यामध्यें पूर्णपणें बुडून गेला होता.


## पवित्र पिंपळ

अनुराधपुरांत शिरतांच पश्चिमाभिमुख बुद्धदेवालय आहे. आंत गेल्यावर मोठें पटांगण लागतें. त्या पटांगणांत पूर्वाभिमुखी भागांत बुद्धाची मूर्ति आहे व उत्तरेच्या बाजूस एका मोठ्या ओट्यावर लहानसा पार आहे. पारावर पिंपळाचें झाड आहे. झाडाची जाडी अगदीं बेताची ह्मणजे फार तर १।२ फुटाची आहे. पाराकडे चढून जाण्यास पायऱ्या आहेत व पाराभोंवतीं गजांचें कुंपण असून दारास कुलूप असते. भक्त लोक समोर उभे राहून त्या पवित्र वृक्षाचें दर्शन घेतात. हा पिंपळ २२५० वर्षांपेक्षां जास्त जुना आहे असें ह्मणतात.


सम्यक्ज्ञान प्राप्त करून घेण्याचे नाना उपाय केल्यानंतर भगवान् बुद्ध निरंजना नदीचें तीरीं पिंपळाचें झाडाखालीं ध्यानस्थ बसला व तेथें त्यानें आपलें ध्यान चालविलें. बुद्ध ध्यान करीत बसला असतांना मारानें ( ख्रिस्त धर्मांत ज्याप्रमाणें सैतान आहे त्याप्रमाणें बुद्ध धर्मांत मार आहे ) त्यास ध्यानभ्रष्ट करण्याकरितां अनेक प्रकारें मोह पाडण्याचा प्रयत्न केला. पण बुद्ध विजयी झाला व त्यास सम्यक्ज्ञान प्राप्त होऊन त्यास बुद्धपण प्राप्त झालें.

यामुळें बुद्धलोक पिंपळाच्या झाडास फार पवित्र मानतात. ज्या झाडाच्याखालीं बुद्धास सम्यक्ज्ञान प्राप्त झालें त्या झाडाची खांदी संघ-मित्रानें ख्रिस्त पूर्व २८८ सालीं सीलोनमध्यें नेऊन लाविली. या झाडाच्या दर्शनाकरितां लक्षावधि लोक जातात. यात्रेकरू या झाडाचें पान मोठ्या श्रद्धेनें प्रसाद ह्मणून नेतात व हें पान मिळणेंही मोठ्या वशिल्याचें काम होऊन बसतें.

या देवळांत पूर्व बाजूच्या भिंतीजवळ एक झाड आहे त्या झाडाला पत्र्यानें मढविलेलें असून त्याची पानेंही पत्र्याचीच आहेत.



पवित्र पिंपळ–अनुराधापुरम् (पृ. ११६)



पोलोन्नुरुवा येथील 'सत् महाल' (पृ. ११७)

देवळाच्या पूर्वेस देवळाच्या आवारांतच " ओरिएंटल लायब्ररी " अशी पाटी असून एका इमारतींत कांहीं ग्रंथ आहेत. ही लायब्ररी १।२ कपाटांचीच आहे.

अनुराधपुर येथील पिंपळाचें झाड जगांतील ऐतिह्य वृक्षांपैकीं अत्यंत जुनें असें आहे.

## पोलोन्नरुवा

अनुराधपुरापासून ४० मैलावर नैऋत्येस हें शहर आहे. अनुराधपुर येथून सीलोनची राजधानी हालल्यानंतर ती या ठिकाणीं नेण्यांत आली होती. या शहराचें वैभवाचा अस्त झाल्यानंतर अनुराधपुराप्रमाणें हेंही गांव निबिड अरण्यांत बुडालें होतें.

सुमारें ५० वर्षांपूर्वी येथें उत्खनन करून अनेक प्राचीन अवशेष बाहेर काढिलेले आहेत. या अवशेषांत नानातऱ्हेच्या मूर्ति व खोदीव काम आहे.

भगवान् बुद्धाची निद्रित अशी ४५ फूट लांबीची एक मूर्ति येथें आहे. या मूर्तीच्या शेजारी बुद्धाचा प्रिय शिष्य आनंद याची उभी असलेली मूर्ति आहे. अजिंठा येथें अशीच बुद्धाची २५ फूट लांबीची मूर्ति २६ व्या लेण्यांत आहे. पोलोन्नरुवा येथें उत्खननाचेवेळीं मोठाले डागोबा, देवळें व राजवाडे सांपडलेले आहेत व यावरून प्राचीन काळीं, शिल्प, स्थापत्य वगैरे शास्त्रांत सिंहली लोकांनीं किती प्रगति केली होती तें दिसून येतें. बुद्ध लोकांचें हें यात्रेचें ठिकाण आहे व हजारो बुद्धधर्मीय लोक दर्शनाकरितां येत असतात. पोलन्नरुवा येथें शिरतांच पूर्वीच्या राजांचे दरबारगृह लागतें जवळ प्राचीन असें शंकराचें दगडी मंदीर आहे. वटगडे नांवाची इमारत फार प्राचीन असून सुंदर आहे. गलपोत (दगडी पोथी) नांवाचा २५ टनाचा मोठा शिलाखंड आहे व त्यावर शिलालेख आहेत. जेतवनाराम नांवाचें फार मोठें बुद्धाचें देऊळ आहे व त्यांत बुद्धाच्या अनेक मूर्ति आहेत.

गलविहाराच्या भोंवती जंगल आहे व येथें बुद्धाची ४५ फुटाची मूर्ति आहे. वाटाड्याबरोबर घेऊन ही स्थलें एकदां पाहून यावे.

## कँडीजवळील पॅराडेनिया येथील वनस्पतींची बाग

कँडीपासून सुमारें ३ मैलावर पॅराडेनिया येथें अतिशय मोठी अशी सरकारी बोटॅनिकल गार्डन आहे. बागेचें क्षेत्र १४३ एकर आहे. बाग पहावयास जावयाचे असल्यास प्रथमतः तेथील आफिसमध्यें जाऊन परवानगी घ्यावी लागते. बाग दाखविण्याकरितां एक वाटाड्या मिळतो. बाग पहाण्याकरितां फी द्यावी लागत नाहीं.

या बागेमध्ये लवंग, वेलदोडे, जाळफळ, मिरी, सिंकोना, दालचिनी इत्यादि नाना प्रकारची उपयुक्त झाडें आहेत. तसेंच नाना जातीचें ताड, फुलझाडें वगैरे अनेक प्रकारची झाडें आहेत. वनस्पतिशास्त्राचा अभ्यास करणारे विद्यार्थी व प्रोफेसर येथें येत असतात. सर्व बागेंतून फिरून येण्यास कमींतकमी ४।५ तास लागतात.

आपले हिंदुस्थानचे मरहूम एडवर्ड बादशहा यांच्या हस्तें लाविलेलें एक झाड आहे; तसेंच प्रस्तुतचे बादशहा पांचवे जार्ज यांच्या हस्तें लाविलेलेंही एक झाड आहे. सीलोनमध्यें गेल्यानंतर एकदां या बागेंत जाऊन येणें ज्ञानार्जनाचे दृष्टीनें फायदेशीर आहे.

राक्षसी बांबू ( जायंट बाम्बू ) म्हणून जी बांबूची जात आहे ती एका रात्रींत २ फूट वाढते असें डाक्टर लॉक नांवाच्या संशोधकानें १९०४ सालीं सप्रयोग सिद्ध केलें आहे. ताडपत्राचें पान इतकें मोठें असतें कीं त्या खालीं २०।२५ माणसें राहूं शकतात.

बागेंतून फिरतांना विशेषतः नदीकडेला गवतांतून फिरतांना जळवांना जपावें. कित्येकदां अनेक जळवा पायाला चिकटून रक्त पिऊं लागतात. बागेमध्यें सापाची भीति फारशी नाहीं.

——०——

# शुद्धीपत्र

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २ | ९ | नाक्कि | नक्की |
| २ | २२ व २३ | दोन हजार | एक हजार |
| ४ | शेवटची | यवस्था | व्यवस्था |
| ५ | ११ | तिकिटेंही | तिकिटें |
| ,, | १५ | तपासणीस | तपासणींत |
| ,, | २० | गोळे | गोळा |
| ,, | २४ | रोज | रोग |
| ,, | २५ | येर्यल | येईल |
| ७ | २१ | भागची | मागची |
| ८ | १४ | स्पेम्सर आणि आणि कंपनी | स्पेन्सर आणि कंपनी |
| १३ | १४ | हार्ती | हातीं |
| १५ | १९ | आही | आम्हीं |
| १६ | १६ | थियेटर | थिएटर |
| १८ | २ | ज.ाजोजाग | जागोजाग |
| ,, | ७ | ओळखतां येणें पडत असें | ओळखतां येणें कठीण पडत असें |
| १९ | १० | आलि | आली |
| ,, | १४ | माठे | मोठें |
| ,, | २४ | मिळण्याचें | मिळविण्याचें |
| २० | १ | ठऊन | ठेऊन |
| ,, | १४ | अपरिज्ञ्रांतं | अपरिज्ञातं |
| २७ | २ | नरेत्ये | नैऋत्ये |
| २९ | १६ | भाजा | भाज्या |
| ३२ | १८ | अनुष्याचा | मनुष्याच्या |
| ,, | २४ | हिंदुस्थानातून | हिंदुस्थानांतून |
| ३३ | ११ | लाका | लोकां |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३६ | शेवटची | समति | संमति |
| ३८ | ५ | महापनिब्बान | महापरिनिब्बान |
| ४१ | ११ | नार्ही | नाहीं |
| ,, | १६ | भलमाऱ्याचा | मलवाऱ्याचा |
| ,, | ,, | डायव्हर | ड्रायव्हर |
| ४३ | १२ | आरमार | आरमार |
| ४५ | १२ | पोटुगीजास | पोर्तुगीजास |
| ४६ | २२ | हरकता | हरकत |
| ५१ | ८ | सग्दुण | सद्‌गुण |
| ,, | ९ | कवीर्नी | कवीनीं |
| ५४ | ३ | नारल | नारळ |
| ५७ | १ | एकस | एकर |
| ५८ | ६ | सीलोनधध्दे | सीलोनमध्यें |
| ५९ | १९ | फूट दीड उंची | फूट दीड फूट उंची |
| ६८ | शेवटची | ह्मणाल | ह्मणालें |
| ७२ | १७ | शार्डगधरानें | शार्ङ्‌धरानें |
| ,, | १९ | इतिहावरून | इतिहासावरून |
| ,, | २२ | सॅडल | सँडल |
| ७५ | १ | हैसोर | ह्मैसोर |
| ७६ | १२ | पिकबिण्याचा | पिकविण्याचा |
| ,, | १८ | आयोडीच्या | आयोडीनच्या |
| ७७ | ११ | ब्रह्महेश | ब्रह्मदेश |
| ७८ | १ | होते | होतो |
| ७९ | १३ | षरिणाम | परिणाम |
| ८० | १६ | व्यापाराही | व्यापारही |
| ८२ | ६ | निक्रीस | विक्रीस |
| ८३ | १४ | चाललेले | चालले |
| ८५ | १ | हिंदुस्थनांतून | हिंदुस्थानांतून |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ८७ | ६ | बजन | वजन |
| ८८ | २३ | प्राचानि | प्राचीन |
| ९१ | ६ | निगतीवर | निर्गतीवर |
| ९२ | ५ | os | of |
| ९४ | १५ | शिकरिाच्या | शिकारीच्या |
| १०४ | २१ | गुलामा | गुलामांचें |
| १०५ | ३ | प्रचड | प्रचंड |
| १०७ | २२ | ओरिएटल | ओरिएन्टल |
| १११ | २४ | सालीं येथें गेला | सालीं गेला |

E
179